नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४थे | अंक : २८५ | किंमत : ४ रूपये
Gmail : aklgavakari@gmail.com
Gmail : punegavkari@gmail.com




# महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक समर्थ गांवकरी

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे
POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026




बुधवार, दि. ३० सप्टेंबर २०२६

मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

# भारतीय मुलींची मोठी कामगिरी!

## आशियाई क्रीडा स्पर्धेत सहावे सुवर्णपदक, पदक तालिकेत मिळालं मानाचं पान

### बहरीन संघाने या स्पर्धेत दुसरे स्थान पटकावून रौप्यपदक जिंकले



मुंबई : (स. गांवकरी)

आशियाई क्रीडा स्पर्धेत भारतीय महिलांना उल्लेखनिय कामगिरी केली आहे. महिलांच्या 4 x 400 मीटर रिले शर्यतीत सुवर्णपदक जिंकले आहे. 2026 च्या आशियाई क्रीडा स्पर्धेतील भारताचे हे सहावे सुवर्णपदक होते. सुवर्णपदक विजेत्या भारतीय संघात किरण, मचेत्तिरा पूवम्मा, प्राची आणि विथ्या रामराज यांचा समावेश होता. भारतीय संघाने ही शर्यत 3:29.69 मिनिटांत पूर्ण केली. बहरीन संघाने या स्पर्धेत दुसरे स्थान पटकावून रौप्यपदक जिंकले. बहरीनच्या खेळाडूंनी 3:30.21 मिनिटांत शर्यत पूर्ण केली. भारत आणि बहरीन यांच्या वेळेत 0.52 सेकंदांचे अंतर होते. चीन संघाने तिसरे स्थान पटकावून कांस्यपदक मिळवले. चीनच्या खेळाडूंनी 3:31.02 मिनिटांत शर्यत पूर्ण केली. दरम्यान, भारताने आशियाई क्रीडा स्पर्धेत उत्तम कामगिरी केली आहे. यामध्ये भारतीय महिलांनी उल्लेखनिय कामगिरी केली आहे. भारताला एकूण 6 सुवर्णपदक आत्तापर्यंत मिळाले आहेत. भारताने क्रिकेट, कबड्डी आणि नेमबाजीमध्ये सुवर्णपदक जिंकले होते. आता अॅथलेटिक्समध्येही सुवर्णपदकाची भर पडली आहे. यासह भारताने पदक तालिकेत 50 चा आकडा पार केला आहे. धावपटू वित्या रामराजचे आशियाई क्रीडा स्पर्धेतील हे दुसरे पदक होते. यापूर्वी तिने 400 मीटर अडथळा शर्यतीत कांस्यपदक जिंकले होते. आता तिने सुवर्णपदकही पटकावले आहे. स्पर्धेदरम्यान पाऊस पडत होता, तरीही भारतीय खेळाडूंनी चांगली कामगिरी केली. पावसामुळे त्यांना कोणताही अडथळा आला नाही. अनेकदा पावसात धावताना खेळाडूंना अडचणी येतात.

### भारताचे १०वे स्थान

सहाव्या सुवर्णपदकासह भारताने पदक तालिकेत 10 वे स्थान पटकावले आहे. एकूण पदकांची संख्या 51 झाली आहे. यामध्ये 6 सुवर्ण, 21 रौप्य आणि 24 कांस्य पदकांचा समावेश आहे.

# कल्याण, ठाणे आणि मुंबईत सायंकाळी पावसाच्या जोरदार सरी

मुंबई : (स. गांवकरी)



राज्यात पावसाचा जोर कमी होत असून मंगळवारी कोकण, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यातील काही जिल्ह्यांमध्ये हलका ते मध्यम पाऊस पडला आहे. काही दिवसांच्या विश्रांतीनंतर कल्याण-डोंबिवली, ठाणे आणि मुंबईत पुन्हा पावसाने हजेरी दाखवल्याने वातावरणात गारवा निर्माण झाला आहे. सकाळपासूनच कल्याण येथे ढगाळ वातावरण असून सायंकाळी अचानक पावसाला सुरुवात झाल्याने कामावरुन घरी परतणाऱ्या नागरिकांची तारांबळ उडाली. रिमझिम सरींसह राज्यातील अनेक भागांत वीजांच्या कडकडाटासह पावसाने चांगलेच धुमशान घातल्याचे चित्र आहे. तत्पूर्वी पावसाआधी अचानक आलेल्या सोसाट्याच्या वाऱ्यांमुळे नागरिकांची आणि वाहनचालकांची चांगलीच धावपळ उडाली. कामावरून घरी परतणाऱ्या नागरिकांना पावसाचा फटका बसताच आसरा शोधावा लागला. वाऱ्यांच्या संगतीने आलेल्या पावसाने शहरात पुन्हा एकदा बदललेल्या वातावरणाचा अनुभव नागरिकांनी घेतला आहे. कल्याण, ठाणे, मुंबई, नाशिक (घाटमाथा), रायगड, रत्नागिरी, पुणे, सातारा, कोल्हापूर, सांगली, शहापूर, नगर, सोलापूर या जिल्ह्यांमध्ये अनेक ठिकाणी विजांच्या कडकडाटासह हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस झाला असून उद्याही या ठिकाणी हलका ते मध्यम स्वरुपाचा पाऊस होऊ शकतो असा हवामान खात्याचा अंदाज आहे. सध्या बंगालच्या उपसागरात तसेच अरबी समुद्रात कुठेही कमी दाबाचे क्षेत्र निर्माण झाले नसल्याने राज्यात सर्वदूर पावसाची शक्यता दिसत नाही. येत्या दोन दिवसांत पश्चिम महाराष्ट्र तसेच मराठवाड्यातील काही भागात मेघगर्जनेसह पावसाची शक्यता आहे. मात्र ती सर्वदूर नसणार आहे. येणाऱ्या पाच दिवसात राज्यात मुसळधार तसेच सर्वदूर पावसाची शक्यता नाही. मराठवाड्याची सर्व जिल्ह्यात पावसाची तुट सर्वाधिक आहे. रब्बी हंगामात पाऊस चांगला राहील अशी आशा करणे चांगले राहणार नाही.पुणे परिसरात मेघगर्जनेसह पावसाची शक्यता असली तर ती सर्वदूर नाही. अमरावती जिल्ह्यात सोयाबीन पाठोपाठ आता कपाशीच्या पीकही नुकसानीच्या उंबरठ्यावर आहे. पाऊसच नसल्याने कपाशी पिकावर लाल्या, कोकळा, मावा तुडतुड्यासारख्या रोगांचा मोठा प्रादुर्भाव झाला आहे. पावसा अभावी कपाशीची वाढ ही खुंटली असून कपाशीची पीक वाळायला सुरुवात झाली आहे. सरसकट हेक्टरी 50 हजार रुपयांची नुकसान भरपाई द्यावी शेतकऱ्यांची मागणी आहे.

## थोडक्यात...

### स्वतंत्र नोंद होणार

मुंबई (स. गांवकरी) : कोकणाची ओळख असलेल्या हापूस आंब्यासह महाराष्ट्रातील प्रमुख आंबा जातींची ई-पीक पाहणीमध्ये स्वतंत्रपणे नोंद करण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. चालू वर्षी शासनाच्या वतीने 'डीसीएस' अॅपद्वारे ई-पीक पाहणी करण्यात येत असून, या अॅपमध्ये हापूस, केशर, रत्ना, सिंधू आणि पायरी यांसारख्या आंब्याच्या प्रमुख जाती स्वतंत्रपणे नोंदविण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. त्याचबरोबर काजू, नारळ आणि सुपारी या फळपिकांसाठीही आवश्यक पर्याय उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. सध्या ई-पीक पाहणी करताना आंबा पिकाची नोंद करण्यासाठी प्रमुख जातींचे स्वतंत्र पर्याय उपलब्ध नव्हते. त्यामुळे प्रत्यक्ष शेतात कोणती आंबा जात लागवडीखाली आहे, याची अचूक नोंद करणे सहाय्यकांना शक्य होत नव्हते. विशेषतः कोकणची ओळख असलेल्या हापूस आंब्याचाच स्वतंत्र पर्याय अॅपमध्ये नसल्याने शेतकऱ्यांमध्ये नाराजी होती. ही बाब लक्षात घेऊन कोकणातील मंत्र्यांनी मंत्रिमंडळ बैठकीत हा प्रश्न उपस्थित केला. ई-पीक पाहणीसाठी वापरण्यात येणाऱ्या अॅपमध्ये 'कोकण रुची' या नावाने पर्याय दिसत असल्याने इतर आंबा जाती तसेच कोकणातील अन्य फळपिकांची अचूक नोंद करण्यात अडचणी येत असल्याचे त्यांनी निदर्शनास आणून दिले. त्यानंतर शासनाने याबाबत तातडीने कार्यवाही करण्याचा निर्णय घेतला.

### सिंहस्थासाठी खासगी 'टेंट सिटी'

नाशिक (स. गांवकरी) : सिंहस्थ कुंभमेळ्याच्या काळात नाशिक-त्र्यंबकेश्वरमध्ये होणारी भाविकांची मोठी गर्दी लक्षात घेऊन निवासाची अतिरिक्त व्यवस्था उभारण्यासाठी नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरणाने खासगी जमिनीवर 'टेंट सिटी' उभारण्यासंदर्भात सविस्तर कार्यपद्धती (एसओपी) निश्चित केली आहे. खासगी जमीनमालक तसेच जमीनमालकाशी सामंजस्य करार (एमओयू) केलेल्या संस्थांना या सुविधांसाठी अर्ज करता येणार असून, भाविकांना सुरक्षित व सुविधायुक्त निवास मिळावा यासाठी विविध निकष निश्चित करण्यात आले आहेत. कुंभमेळ्याच्या काळात शहरातील कायमस्वरूपी पायाभूत सुविधांवर येणारा ताण कमी करण्यासाठी या टेंट सिटी उभारण्यात येणार आहेत. निवासासोबतच स्वच्छतागृहे, स्नानगृहे, पाणी, वीज, कचरा व्यवस्थापन, वाहनतळ, भोजन व्यवस्था, सुरक्षा आणि आपत्कालीन सुविधांचा समावेश या तात्पुरत्या वसाहतींमध्ये करणे बंधनकारक राहणार आहे.

### कार्यालयांच्या फेऱ्या थांबणार

मुंबई (स. गांवकरी) : विमुक्त जाती आणि भटक्या जमातींच्या नागरिकांना आवश्यक ओळखपत्रे आणि प्रमाणपत्रे सुलभतेने उपलब्ध करून देणे, विविध शासकीय योजनांचा लाभ मिळवून देणे तसेच त्यांच्या अडचणी प्रत्यक्ष जाणून घेण्यासाठी सरकार आता तुमच्या घरापर्यंत पोहोचणार आहे. 'राष्ट्रनेता ते राष्ट्रपिता'विशेष अभियानांतर्गत 27 सप्टेंबर आणि 28 सप्टेंबर 2026 रोजी विशेष 'भटके-विमुक्त हक्क व प्रमाणपत्र अभियान'राबविण्यात आले. शिवाय'सेवा संकल्प अभियान'मध्ये आतापर्यंत राज्यभर 4 हजार 589 प्रमाणपत्रे आणि कागदपत्रांचे वितरण करण्यात आल्याची माहिती इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे यांनी दिली. 'राष्ट्रनेता ते राष्ट्रपिता' विशेष अभियान केवळ शिबिरे आयोजित करण्यापुरते मर्यादित न राहता भटके-विमुक्त समाजाच्या वस्त्या, तांडे आणि नागरिकांच्या घरी जाऊन त्यांची माहिती गोळा करणे, त्यांच्या अडचणी जाणून घेणे, शासकीय योजनांची माहिती देणे आणि आवश्यक कागदपत्रे लाभार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यावर भर देण्यात आला.

# मी महेश भट्ट यांचा मुलगा नाही, राहुल भट्टचं वक्तव्य चर्चेत

मुंबई : (स. गांवकरी)



चित्रपट दिग्दर्शक महेश भट्ट त्यांच्या प्रोफेशनल आयुष्यासोबतच वैयक्तिक आयुष्यामुळे चर्चेत असतात. त्यांचं आयुष्य अनेक वादांनी वेढलेलं होतं. या सगळ्याचा त्यांच्या मुलावरही परिणाम झालं. एका मुलाखतीत, राहुल भट्टनं आपल्या बालपणाबद्दल आणि वडिलांसोबतच्या नात्याबद्दल मनमोकळेपणानं सांगितलं. राहुल म्हणाला की, त्याच्या बालपणीच्या काळात त्याला वडिलांच्या उपस्थितीची आणि मार्गदर्शनाची उणीव जाणवली. राहुल हा महेश भट्ट आणि त्यांची पहिली पत्नी किरण यांचा मुलगा आहे, तर अभिनेत्री पूजा भट्ट ही त्याची बहीण आहे. राहुल लहान वयातच स्वतःला कुटुंबाचा प्रमुख मानू लागला. सिद्धार्थ कन्ननला दिलेल्या मुलाखतीत राहुल म्हणाला की, त्याचे आई-वडिल विभक्त झाल्यानंतर त्याला लहान वयातच आपल्या कौटुंबिक जबाबदाऱ्यांची जाणीव झाली. राहुल म्हणाला की, तो स्वतःला कुटुंबाचा प्रमुख मानू लागला आणि त्याला आपल्या आई व बहिणीच्या सुरक्षेची जबाबदारी जाणवू लागली. बालपणी त्याला एका खंबीर पुरुष मार्गदर्शकाचा पाठिंबा मिळाला नाही, ज्याचा परिणाम नंतर त्याच्या वागणुकीवर झाला.त्यावेळी पूजा भट्टला चित्रपटसृष्टीत लोकप्रियता मिळाली. जेव्हा कोणी त्याच्या बहिणीबद्दल अपमानास्पद कमेंट करायचे किंवा तिला अयोग्यरित्या काहीतरी म्हणायचे, तेव्हा राहुल अनेकदा हिंसक प्रतिक्रिया द्यायचा.

# प्रत्येकाने आपापला मतदार संघ सांभाळावा

## श्वेता महालेंकडून शिंदेंच्या आमदाराला सूचक शब्दात समज, बाहेरचे येऊन नासवतात



मुंबई : (स. गांवकरी)

बुलढाण्यामध्ये सध्या स्थानिक राजकारण तापलं आहे. चिखलीच्या भाजप आमदार श्वेता महाले विरुद्ध बुलढाण्याचे एकनाथ शिंदे शिवसेनेचे आमदार संजय गायकवाड यांच्यात सामना रंगला आहे. दोन्ही बाजूंनी परस्परांवर आरोप-प्रत्यारोप सुरु आहेत. बुलढाण्याचा बिहार झाला आहे असं श्वेता महाले म्हणाल्या. त्याला लगेच आमदार संजय गायकवाड यांनी "रात्री बारा वाजता एकटी मुलगी बुलढाण्यामध्ये फिरू शकते आणि याला जर ते बिहार समजत असतील तर मला त्यांच्या बुद्धीची कीव येते" असं प्रत्युत्तर दिलं. त्यानंतर श्वेता महाले आता पुन्हा एकदा बोलल्या आहेत. "महायुती धर्माचं पालन सगळ्यांनी करावं. बाहेरचे लोक येऊन माझ्या मतदार संघात अराजकता माजवत आहेत. चुकीची माहीती देत आहेत" असं त्या म्हणाल्या.

"बुलढाणा विधानसभेची वस्तुस्थिती सांगितली पण कुणाला वाटत असेल की त्यांच्याबाबतीत बोलले तर काय करणार?" असं श्वेता महाले म्हणाल्या. "हा जिल्ह्यातील विषय आहे. प्रत्येकाने आपापला मतदार संघ संभाळावा. माझ्या मतदार संघात भाजप शिवसेना चांगेल संबंध आहेत. बाहेरचे येऊन नासवतात. शिवीगाळ करणं, पातळी सोडून बोललं की त्रास होतोच" असं श्वेता महाले म्हणाल्या.

"वस्तूस्थिती काय ते सगळ्यांना माहितीय. माणूसकी, नैतिकता ठेवून राजकारण करायला हवं. गुंडागर्दी करणं, मारामारी करणं, बाप काढणं, कॉलर पकडणं हे योग्य नाही. कुणी लढायचं नाही, लढायचं ह्याचा निर्णय पक्ष घेईल" असं त्या म्हणाल्या. "जिजाऊंचा जिल्हा म्हणून बुलढाणा प्रख्यात आहे. जाणिवपूर्वक यायचं, महिलांना लज्जा निर्माण होईल असं वक्तव्य करायचं हे योग्य नाही" असं श्वेता महाले म्हणाल्या.

### संजय गायकवाड काय म्हणाले?

"बुलढाण्याचा बिहार झाला म्हणतात, पण कमीत कमी आरोप करताना इतिहास पाहिला पाहिजे. ज्या माणसाने मुलींचे संसार बसवण्यासाठी स्वतःचे रक्त सांडले. साडेसात हजार मुलींचे संसार बसविले" असा दावा संजय गायकवाड यांनी केला. "जिल्ह्यातील अनेक पळून गेलेल्या मुली मी परत आणल्या" असं संजय गायकवाड म्हणाले.

# ठाकरे बंधुंच्या मोर्चावर चित्रा वाघांचा हल्लाबोल

## मराठी माणसाला फसवलं! मंगळसूत्र गहाण ठेवण्याची वेळ आणणारेच ढोंगबाजी करतायेत

मुंबई : (स. गांवकरी)



विरोधकांनी मोर्चे काढण्यापूर्वी आत्मपरीक्षण करावे असा टोला भाजप आमदार चित्रा वाघ यांनी ठाकरे बंधूंना लगावला. मराठी माणसाला फसवून ढोंगबाजी करणाऱ्यांनी आता आत्मपरीक्षणाची गरज आहे. महायुती सरकार खऱ्या अर्थानं शेतकऱ्यांच्या पाठीशी आहे. विरोधकांकडून केवळ दिशाभूल सुरु असल्याचे वाघ म्हणाल्या. ठाकरे बंधूंच्या मोर्चावर भाजप आमदार चित्रा वाघ यांची जोरदार टीका केली आहे.

संविधानाने प्रत्येकाला आवाज उठवण्याची ताकद दिली असली, तरी मोर्चे काढण्यापूर्वी सर्वांनी आत्मपरीक्षण करायला हवे असे चित्रा वाघ म्हणाल्या. केरळ, कर्नाटक आणि इतर राज्यांमधील निवडणुकांमध्ये पराभव झाल्यानंतरही हे विरोधक असल्याचा दावा कसा करु शकतात, असा सवाल त्यांनी केला आहे. महाविकास आघाडीच्या काळात शेतकऱ्यांना दिलेली आश्वासने पूर्ण झाली नाहीत, मात्र आज महायुती सरकार खऱ्या अर्थाने शेतकऱ्यांच्या पाठीशी उभे राहून त्यांना मदत करत आहे असे वाघ म्हणाल्या. मराठी माणसाला फसवून त्यांच्यावर मंगळसूत्र गहाण ठेवण्याची वेळ आणणारेच आज मोर्चे काढून ढोंगबाजी करत आहेत. हे महाराष्ट्राची जनता ओळखून असल्याचे वाघ म्हणाल्या.

इंडिया आघाडी बैठकीसंदर्भात बोलताना वाघ म्हणाल्या की, विरोधी पक्षांनी पराभवाचं आत्मपरीक्षण करणं गरजेचं आहे. काँग्रेस जिंकली तर आयोग चांगला, भाजप जिंकला तर वाईट, ही भूमिका चुकीची असल्याचे वाघ म्हणाल्या. फक्त समोरच्यावर बोलण्यापेक्षा स्वतःच्या त्रुटी तपासा असा सल्ला त्यांनी महाविकास आघाडीला दिला. आपल्यात काय कमी आहे हे न बघता फक्त समोरच्यावर टीका करणे योग्य नाही, असा टोमणा त्यांनी महाविकास आघाडीला लगावला. अधिकार असला तरी विरोधकांना एकत्र येण्याचा आणि आवाज उठवण्याचा अधिकार आहे, परंतु त्यांनी स्वतःच्या चुकांवरही नजर टाकली पाहिजे, असे चित्रा वाघ यांनी स्पष्ट केले. महायुतीचे नेते भक्कमपणे एकत्र काम करत असल्यानं इतरांच्या टीकेला फारसं महत्त्व देण्याची गरज नाही असेही वाघ म्हणाल्या. महायुतीचे सर्व नेते व कार्यकर्ते जनतेच्या आणि शेतकऱ्यांच्या समस्या सोडवण्यासाठी प्रयत्न करत आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि सुनेत्राताई पवार यांच्यात उत्तम समन्वय व संवाद आहे, असे म्हणक चित्रा वाघ यांचा शिवसेना आमदारांना इशारा दिला आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि सुनेत्राताई पवार यांच्यात उत्तम समन्वय व चांगला संवाद असल्याचे चित्रा वाघ यांनी स्पष्ट केले. पक्षाचे वरिष्ठ नेते एकत्र येऊन काम करत असताना इतरांच्या टीकेला फारसे महत्त्व देण्याची गरज नाही.

महायुतीचे नेते व कार्यकर्ते थेट जनतेपर्यंत पोहोचत असून शेतकऱ्यांच्या समस्या जाणून घेत त्यांच्या मदतीसाठी प्रयत्नशील असल्याचे त्यांनी सांगितले. रवींद्र धांगेकर आणि आमदार नरेंद्र भोंडेकर यांच्या विधानांवर प्रतिक्रिया देताना चित्रा वाघ यांनी महायुतीमधील सर्व आघाड्यांचे नेतृत्व मजबूत असून खालच्या पातळीवरील वक्तव्यांकडे लक्ष देण्याची गरज नाही, असे ठामपणे स्पष्ट केले आहे.

# पुण्यातील 'रामा'ला कोण वाचविणार? विरोधीपक्षाकडून निषेध

पुणे : (स. गांवकरी)



पुणे महापालिकेचे आयुक्त नवल किशोर राम यांना शहरातील एका आमदाराने गुन्हा दाखल करण्याची धमकी दिल्याने त्याचे आज शहरात पडसाद उमटले. विरोधी पक्षांतर्फे या धमकीचा निषेध करण्यात आला आहे. पुण्यातील 'रामा'ला वाचविणार कोण? असा प्रश्न शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र लिहून केला आहे. आरटीओ चौक ते बंडगार्डन या दरम्यान मुळामुठा नदीच्या बाजूने वेलस्ली रस्त्याच्या प्रकल्पाची ९० कोटी रुपयांची निविदा महापालिकेने काढली होती. हे काम मर्जीतील ठेकेदाराला न मिळाल्याने संतापलेल्या आमदाराने आयुक्तांना गुन्हा दाखल करेन, अशी धमकी दिली. यासंदर्भात आज वृत्त प्रकाशित झाले आहे. शिवसेना ठाकरे गटाने सहसंपर्कप्रमुख संजय मोरे, महापालिकेतील गटनेते नितीन गावडे यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांना पत्र लिहिले आहे. 'लंकेचा रावण दहा तोंडाचा होता; मात्र महापालिकेत अनेक तोंडांचे रावण महापालिकेचे लचके तोडण्यासाठी या रामावर तुटून पडत आहेत. या रामाला कोण वाचवणार?.' आयुक्तांच्या निर्णयामुळे महापालिकेच्या सुमारे नऊ कोटी रुपयांची बचत झाली आहे. तरीही अधिकाऱ्यावरच जर राजकीय दबाव येत असेल तर या प्रकरणाची संपूर्ण चौकशी करून कारवाई करावी अशी मागणी केली आहे. विरोधीपक्षनेते निलेश निकम यांनी आयुक्त राम यांना पत्र देऊन त्यांना पाठिंबा दिला. तसेच या धमकीचा निषेध केला आहे. शहराच्या विकासाच्या कामात आम्ही नियमानुसार व पारदर्शी कामाबाबत आम्ही अभिनंदन करतो आणि पुढच्या कार्यात आम्ही सोबत असू, असे पत्रात नमूद केले आहे.

महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक समर्थ गांवकरी संपादकीय

# डिजिटल आर्थिक क्रांतीतील नवे पर्व



**डॉ. विश्वासराव आरोटे**
संपादक - दै. समर्थ गांवकरी

**अलीकडेच भारताने डिजिटल क्रांतीच्या प्रक्रियेमध्ये एक एतिहासिक पाऊल टाकले. आता एटीएममधून पैसे काढण्यासाठी प्लास्टिक कार्डची गरज उरलेली नाही. मोबाईल आणि यूपीआयच्या साहाय्याने कार्डशिवाय थेट एटीएममधून पैसे काढण्याची सुविधा उपलब्ध झाली आहे. ही सुविधा म्हणजे केवळ तांत्रिक सुधारणा नसून भारताच्या डिजिटल अर्थव्यवस्थेच्या प्रवासातील एक महत्त्वाचा टप्पा आहे.**

भारतातील बँकिंग आणि आर्थिक व्यवहारांची पद्धत गेल्या दशकात आमूलाग्र बदलली आहे. एके काळी बँकेच्या शाखेत जाऊन पैसे काढण्यासाठी तासनतास रांगेत उभे रहावे लागायचे. त्यानंतर एटीएम यंत्रणा आली आणि ग्राहकांच्या आयुष्यात मोठी सोय निर्माण झाली. मात्र तंत्रज्ञानाची वाटचाल येथेच थांबली नाही. भारताने आणखी एक ऐतिहासिक पाऊल टाकले आहे. आता एटीएममधून पैसे काढण्यासाठी प्लास्टिक कार्डची गरज उरलेली नाही. मोबाईल आणि यूपीआयच्या साहाय्याने कार्डशिवाय थेट एटीएममधून पैसे काढण्याची सुविधा उपलब्ध झाली आहे. ही सुविधा म्हणजे केवळ तांत्रिक सुधारणा नसून भारताच्या डिजिटल अर्थव्यवस्थेच्या प्रवासातील एक महत्त्वाचा टप्पा आहे. भारताने जगाला यूपीआयच्या माध्यमातून डिजिटल व्यवहारांचे एक अद्वितीय मॉडेल दिले. यूपीआयने अगदी चहाच्या टपरीपासून मोठ्या शॉपिंग मॉलपर्यंत सर्वत्र व्यवहारांची पद्धत बदलून टाकली. आता त्याच यूपीआयचा वापर करून एटीएममधून पैसे काढण्याची सुविधा उपलब्ध झाल्यामुळे बँकिंग क्षेत्र अधिक सुरक्षित, सुलभ आणि सर्वसमावेशक बनले आहे. कार्डलेस एटीएम म्हणजे अशी यंत्रणा ज्यामध्ये ग्राहकाला पैसे काढण्यासाठी एटीएम कार्ड मशीनमध्ये टाकावे लागत नाही. ग्राहक आपल्या मोबाईलवरील यूपीआय अनुप्रयोगाचा वापर करून एटीएमशी संवाद साधतो आणि काही सेकंदांमध्ये रोख रक्कम प्राप्त करतो. या प्रक्रियेमुळे कार्ड बाळगण्याची गरज संपते आणि अनेक प्रकारच्या फसवणुकीपासून संरक्षण मिळते. या सुविधेची कार्यपद्धती अत्यंत सोपी आहे. ग्राहक एटीएमच्या पडद्यावर रोख रक्कम काढण्याचा पर्याय निवडतो. त्यानंतर आवश्यक रक्कम नमूद करतो. एटीएम मशीन लगेच एक विशेष क्यूआर कोड तयार करते. ग्राहक आपल्या मोबाईलमधील यूपीआय ॲप्स उघडून हा कोड स्कॅन करतो. त्यानंतर यूपीआय पासवर्ड टाकून व्यवहाराला मंजुरी देतो. काही क्षणांमध्ये एटीएममधून रोख रक्कम बाहेर येते. संपूर्ण प्रक्रियेत कार्डचा वापर होत नाही आणि कोणत्याही अतिरिक्त उपकरणाची आवश्यकता रहात नाही. सामान्य नागरिकांसाठी ही सुविधा अत्यंत उपयुक्त ठरणार आहे. अनेकदा आपण एटीएम कार्ड घरी विसरतो किंवा ते पाकिटासह हरवते. अशा वेळी अचानक पैशांची गरज भासल्यास मोठी अडचण निर्माण होते. कार्डलेस एटीएममुळे ही समस्या पूर्णपणे दूर होते. आज बहुतांश लोकांकडे स्मार्टफोन असतो आणि त्यावर यूपीआय ॲप्स सक्रिय असतो. त्यामुळे केवळ मोबाईलच्या सहाय्याने पैसे काढणे शक्य होते. सायबर गुन्हेगारीच्या वाढत्या धोक्याच्या पार्श्वभूमीवर ही सुविधा अधिक महत्त्वाची ठरते. गेल्या काही वर्षांमध्ये एटीएम स्किमिंग, कार्ड क्लोनिंग आणि डेटा चोरीच्या घटना मोठ्या प्रमाणात वाढल्या होत्या. काही गुन्हेगार एटीएममध्ये गुप्त उपकरणे बसवून कार्डची माहिती चोरत आणि त्याद्वारे बनावट कार्ड तयार करत. परिणामी ग्राहकांच्या खात्यातील पैसे लुटले जात. कार्डलेस व्यवहारांमध्ये कार्डच वापरले जात नसल्यामुळे अशा प्रकारच्या गुन्ह्यांना मोठ्या प्रमाणात आळा बसतो. त्यामुळे ग्राहकांचा विश्वास वाढतो आणि बँकिंग व्यवहार अधिक सुरक्षित बनतात. आज देशातील लाखो नागरिक यूपीआयचा वापर करतात; परंतु अनेकांकडे एटीएम कार्ड नसते किंवा त्याचा वापर करण्याची सवय नसते. मोबाईलच्या माध्यमातून पैसे काढण्याची सुविधा उपलब्ध झाल्यामुळे डिजिटल व्यवहार आणि पारंपरिक रोख व्यवहार यांच्यातील दरी कमी होते. ग्रामीण भागातील नागरिक अधिक आत्मविश्वासाने बँकिंग सेवांचा वापर करू शकतात. ज्येष्ठ नागरिकांसाठीही कार्डलेस एटीएम वरदान ठरू शकते. अनेकदा वयोमानानुसार एटीएम कार्ड हाताळणे, कार्डचा पासवर्ड लक्षात ठेवणे किंवा मशीनमध्ये कार्ड योग्य प्रकारे वापरणे कठीण जाते. मोबाईलवरील परिचित यूपीआय ॲप्स वापरून व्यवहार करणे तुलनेने सोपे वाटू शकते. योग्य मार्गदर्शन मिळाल्यास ज्येष्ठ नागरिकांना या सुविधेचा मोठा लाभ होऊ शकतो. एकापेक्षा जास्त बँक खाती असलेल्या ग्राहकांसाठी ही सुविधा आणखी उपयुक्त आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे



### २३१ फूट मंदिराच्या कामाची नानजीभाई ठक्कर यांच्याकडून पाहणी

आंबेगाव (स. गांवकरी) : पेठ पारगाव, ता. आंबेगाव, जि. पुणे : काशिमा खिमजी ठक्कर जमीनदार यांच्या २३१ फूट मंदिराच्या सुरू असलेल्या कामाची २९ सप्टेंबर रोजी श्री. नानजीभाई खिमजीभाई ठक्कर ठाणावाला यांनी पाहणी केली. मंदिराचे सुमारे ९० टक्के काम पूर्ण झाले असून, पावसामुळे नदीकाठच्या भिंतीचे नुकसान झाल्याने बांधबांधणीचे कामही तातडीने सुरू करण्यात आले. यावेळी श्री. भास्कर महाराज, मनोहर दिवाणे, नवनाथ मेनेजर, ज्ञानेश्वर रायकर, भास्कर बुवा आदींचा विशेष सत्कार करण्यात आला. एन.के.टी. ट्रस्टच्या वतीने महिलांना साड्या तसेच विद्यार्थ्यांना नोटबुक व पेनचे वाटप करण्यात आले. मंदिर परिसर पाहणीनंतर उपस्थितांनी प्रसादाचा लाभ घेतला. नानजीभाई ठक्कर यांच्या गावभेटीसाठी सुमारे ७५० शेतकरी व ग्रामस्थ उपस्थित होते. फुलांनी त्यांचे उत्स्फूर्त स्वागत करत शेतकऱ्यांनी शेतातील भाजीपाला प्रसादरूपाने स्वीकारण्याची विनंती केली. संवाद साधताना ठक्कर यांनी शेतकऱ्यांच्या मेहनतीचे कौतुक करत त्यांच्या उत्पादनामुळे समाजाची अन्नाची गरज भागत असल्याचे सांगितले. मात्र, शासनाकडून दिली जाणारी आश्वासने पूर्ण होत नसल्याची खंतही त्यांनी व्यक्त केली.




### विकास आराखड्यासाठी डॉ. अभिजीत चौधरी यांना निवेदन

पुणे (स. गांवकरी) : भीमा कोरेगाव विजयस्तंभ राष्ट्रीय स्मारकाचा विकास आराखडा मंजूर करून त्या ठिकाणी लवकरात लवकर भव्य स्मारक उभे करावे, या मागणीसाठी भीमा कोरेगाव विजयस्तंभ स्मारक समितीच्या वतीने पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे (PMRDA) आयुक्त डॉ. अभिजीत चौधरी यांची भेट घेऊन त्यांना मागण्यांचे निवेदन सादर करण्यात आले. येत्या १ जानेवारी रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भीमा कोरेगाव विजयस्तंभाला ऐतिहासिक भेट दिल्या घटनेला १०० वर्षे पूर्ण होत आहेत. या शताब्दी वर्षाचे औचित्य साधून या ठिकाणी तातडीने काम सुरू करणे अत्यंत आवश्यक आहे, असे मत माजी उपमहापौर डॉ. सिद्धार्थ धेंडे यांनी व्यक्त केले. तसेच स्मारकाच्या कामासाठी आवश्यक असणारा विकास आराखडा व आरक्षण तातडीने मंजूर करावे, अशी आग्रही भूमिका त्यांनी आयुक्तांसमोर मांडली. दरम्यान, शासनाने गेल्या पाच ते सात वर्षांपासून या स्मारकासाठी १०० कोटी रुपयांची भरघोस तरतूद केलेली आहे. मात्र, प्रशासकीय उदासिनतेमुळे अद्यापपर्यंत या निधीतील एकही रुपया प्रत्यक्ष कामावर खर्च झालेला नाही, ही अत्यंत खेदजनक आणि प्रशासकीय नामुष्की आहे, अशी तीव्र भावना भीमा कोरेगाव विजयस्तंभ स्मारक समितीचे राहुल डंबाळे यांनी व्यक्त केली. आता कोणतीही तांत्रिक सबब न सांगता स्मारकाचे काम गतीने पुढे न्यावे, अशी मागणी त्यांनी यावेळी केली.

### वर्धापन दिन सोहळ्यास मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे यांचे आवाहन




मुंबई (स. गांवकरी) : महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या संकल्पनेतील रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाची स्थापना दिनांक 3 ऑक्टोबर 1957 रोजी नागपूर येथे झाली होती. यंदा रिपब्लिकन पक्षाचा 69 वा वर्धापन दिन सोहळा येत्या 3 ऑक्टोबर रोजी केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांच्या नेतृत्वात नवी मुंबई येथील विष्णुदास भावे सभागृह येथे आयोजित करण्यात आलेला आहे. या सोहळ्यास मुंबईतील आंबेडकरी जनतेने रिपब्लिकन कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन केंद्रीय मंत्री रामदास आठवले साहेब यांनी व रिपब्लिकन पक्षाचे मुंबई प्रदेश अध्यक्ष सिद्धार्थ कासारे यांनी केले आहे. रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना रामदास आठवले यांच्या नेतृत्वात दरवर्षी दिनांक 3 ऑक्टोबर ला रिपब्लिकन पक्षाचा वर्धापन दिन सोहळा उत्साहात साजरा केला जातो.यंदाही 3 ऑक्टोबर ला नवी मुंबईत रिपब्लिकन पक्षाचा वर्धापन दिन सोहळा ना. रामदास आठवले यांच्या नेतृत्वात साजरा होणार आहे.या सोहळ्यास मुंबईतून हजारो च्या संख्येने रिपब्लिकन जनता उपस्थित राहणार असल्याची माहिती आज रिपब्लिकन पक्षाचे मुंबई अध्यक्ष सिद्धार्थ कासारे यांनी आज प्रस्तुत प्रतिनिधी महेश गायकवाड यांच्या शी बोलताना दिली.

## गणेशोत्सवात लक्षवेधी ठरले 'कलावंत' ढोल-ताशा पथक



आंबेगाव : (स. गांवकरी)

पुण्याच्या गणेशोत्सवाची ओळख असलेल्या विसर्जन मिरवणुकीने यंदाही पुणेकरांचे लक्ष वेधून घेतले. तब्बल ३३ तासांहून अधिक काळ चाललेल्या या मिरवणुकीत मानाचे गणपती, विविध ढोल-ताशा पथके, मर्दानी खेळ तसेच पारंपरिक कलांचे सादरीकरण पाहायला मिळाले. या संपूर्ण उत्सवात लक्ष्मी रोड हा वादनासाठीचा प्रमुख केंद्रबिंदू ठरला. याच लक्ष्मी रोडवर यंदा 'कलावंत' ढोल-ताशा पथकाने आपल्या वादनातून विशेष छाप पाडली. गेल्या अनेक वर्षांपासून कला आणि संस्कृती जपण्याचे काम करणाऱ्या 'कलावंत' ढोल-ताशा पथकाने यंदाच्या गणेशोत्सवात विविध ठिकाणी वादन केले. गणपती आगमन मिरवणुका, विसर्जन मिरवणुका तसेच स्थिर वादन अशा विविध कार्यक्रमांमध्ये पथकाने सहभाग घेतला. लक्ष्मी रोडवरील त्यांच्या वादनाला पुणेकरांची मोठी गर्दी लाभली. पथकाचे वादन पाहण्यासाठी नागरिक तासन्तास प्रतीक्षा करत असल्याचे चित्रही यावेळी पाहायला मिळाले. 'कलावंत' ढोल-ताशा पथक हे 'कलावंत ट्रस्ट'शी संबंधित असून मराठी चित्रपट, नाट्य आणि मनोरंजन क्षेत्रातील अनेक कलाकार व तंत्रज्ञ या उपक्रमाशी जोडलेले आहेत. सौरभ गोखले, श्रुती मराठे, सिद्धार्थ जाधव, तेजस बर्वे, स्नेहलता वसईकर, संस्कृती बालगुडे, प्रतीक्षा जाधव, तेजस्विनी पंडित, आरती पाठक, मधुरा देशपांडे, हिंदवी पाटील, अनुजा साठे, गौरव घटनेकर आणि यशोमन आपटे यांसह अनेक कलाकार या कलावंत परिवाराचा भाग आहेत.

## ठाणे जिल्ह्यातही दुष्काळ जाहीर करावा : कपिल पाटील

### भिवंडी, शहापूर, मुरबाड, कल्याण व अंबरनाथ तालुक्यांसाठी दुष्काळी मदतीची मागणी

भिवंडी : (स. गांवकरी)



ठाणे जिल्ह्यात यंदा पावसाने लवकर माघार घेतल्याने ग्रामीण भागातील शेतीसमोर मोठे संकट निर्माण झाले आहे. खरीप हंगामातील पिकांचे नुकसान झाल्याने शेतकऱ्यांना आर्थिक फटका बसला असून, जिल्ह्यातील भिवंडी, शहापूर, मुरबाड, कल्याण आणि अंबरनाथ या पाच तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर करावा, अशी मागणी माजी केंद्रीय राज्यमंत्री कपिल मोरेश्वर पाटील यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे.

ठाणे जिल्ह्यात यंदाच्या खरीप हंगामात सुमारे ५४ हजार हेक्टर क्षेत्रावर भात व इतर पिकांची लागवड करण्यात आली आहे. यामध्ये सुमारे ५० टक्के क्षेत्रावर निमगर्वा, ४० टक्के क्षेत्रावर हळवा, तर उर्वरित क्षेत्रावर गवा भाताची लागवड करण्यात आली आहे. भातपिकाच्या वाढीसाठी साधारण १५ ऑक्टोबरपर्यंत पावसाची आवश्यकता असते. मात्र, पावसाचे प्रमाण कमी राहिल्याने भातपिकाच्या उत्पादनावर परिणाम झाला आहे. भाताबरोबरच जिल्ह्यातील ग्रामीण भागात भाजीपाल्याची लागवडही मोठ्या प्रमाणावर केली जाते. पाण्याची उपलब्धता कमी झाल्याने भाजीपाला पिकांचेही नुकसान झाले आहे. त्यामुळे खरीप हंगामातील नुकसानीचा विचार करून शेतकऱ्यांना दुष्काळी सवलती व मदत देण्याची आवश्यकता असल्याचे कपिल पाटील यांनी पत्रात नमूद केले आहे.

पावसाने लवकर माघार घेतल्याचा परिणाम आगामी रब्बी हंगामावरही होण्याची शक्यता आहे. जिल्ह्यात यंदा ६ हजार २५० हेक्टर क्षेत्रावर रब्बी पिकांचे नियोजन करण्यात आले आहे. वाल, वाटाणा, हरभरा तसेच विविध गळीत धान्यांचे उत्पादन या भागात घेतले जाते. मात्र, जमिनीतील ओलावा आणि पाण्याची उपलब्धता कमी राहिल्यास रब्बी पिकांनाही फटका बसण्याची शक्यता आहे. राज्य सरकारने २६५ तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर केला असताना ठाणे जिल्ह्यातील एकाही तालुक्याचा समावेश करण्यात आलेला नाही. ठाणे जिल्ह्याचे मोठ्या प्रमाणावर नागरीकरण झाले असले, तरी भिवंडी, शहापूर, मुरबाड, कल्याण आणि अंबरनाथ तालुक्यांच्या ग्रामीण भागात आजही मोठ्या प्रमाणावर शेती केली जाते. पावसाअभावी या भागातील शेतकऱ्यांनाही दुष्काळी परिस्थितीचा सामना करावा लागत आहे.

या पार्श्वभूमीवर ठाणे जिल्ह्यातील पाचही तालुक्यांचा दुष्काळग्रस्त भागात समावेश करून शेतकऱ्यांना शासनाच्या दुष्काळी उपाययोजनांचा लाभ द्यावा, अशी मागणी कपिल पाटील यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे. या मागणीसंदर्भातील पत्राची प्रत राज्याचे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनाही पाठविण्यात आली आहे.

## लांडेवस्ती जिल्हा परिषद "मॉडेल स्कूल" म्हणुन नावारुपास येईल : अध्यक्ष अविनाश पा. गलांडे

वैजापुर : (स. गांवकरी)



लांडेवस्ती (ता. वैजापुर) येथील जिल्हा परिषद प्रशालेतील गुणवत्ता चांगली असुन परिपूर्ण विद्यार्थी घडविण्याचे काम शिक्षक वर्ग करत आहे. असेच गुणवत्तेत सातत्य ठेवल्यास भविष्यात हि शाळा " मॉडेल स्कूल" म्हणून नावारुपास, येऊन सर्वाना मार्गदर्शक ठरेल असे मत छत्रपती संभाजी नगर जिल्हा परिषदेचे अध्यक्ष अविनाश पाटील गलांडे यांनी केले. जिल्हा परिषद प्रशाला लांडेवस्ती या प्रशालेस नुकतीच जिल्हा परिषद अध्यक्ष अविनाश पाटील गलांडे यांनी भेट दिली. यावेळी पंचायत समिती सदस्य राहुल लांडे, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष शिवाजी लांडे, मुख्याध्यापक सुमेध सरकटे, सहशिक्षक प्रविण म्हस्के श्रीमती वैशाली सुराशे, श्रीमती राजपुत यांनी शालेय गुणवत्ते विषयी माहिती दिली. यावेळी पुढे बोलतांना जिल्हा परिषद अध्यक्ष अविनाश पाटील गलांडे म्हणाले की, नुकताच लांडेवस्ती शाळेला जिल्हयात आदर्श शाळा पुरस्कार मिळाला असून येथील गुणवत्ता बघीतल्यानंतर खरोखर हि शाळा आदर्श पुरस्काराची मानकरी आहे. त्यामुळे येथील सर्व गुरुजनांचे सर्वप्रथम अभिनंदन करतो.

वर्गातील गुणवत्ता, शैक्षणिक सुविधा, भौतिक सुविधा या सर्व बाबींचा विचार करता या प्रशालेस दोन वर्ग खोल्यांसाठी निधी उपलब्ध करून दिला जाईल. वर्गात भेट दिली असता विद्यार्थीनी विचारलेल्या प्रश्नांना अपेक्षीत उत्तरे दिली हे येथील गुरुजनांचे यश आहे.

नवोदय, मी ज्ञानी होणार, मंथन यासह विवीध स्पर्धासाठी योग्य मार्गदर्शन विद्यार्थांना केले जाते. त्यामुळेच इतर शाळांच्या तुलनेत या प्रशालेची पटसंख्याबबबहहबब अधिक आहे.

मुख्याध्यापक त्यांचे सहकारी शिक्षक शिकविण्याचे काम करत असतात . त्यामुळे या प्रशालेस भविष्यात सर्व सुविधा उपलब्ध करुन दिल्या जातील .असेही ते म्हणाले याप्रसंगी प्रशालेच्या विद्यार्थी, पालक शालेय समिती सदस्य व ग्रामस्थ यांची उपस्थिती होती.

## 'रेनी कार्निवल - संवाद तरुणाईचा' कार्यक्रमाचे आयोजन

भिवंडी : (स. गांवकरी)




शिव, बिरसा, फुले, शाहू आणि आंबेडकरी विचारधारा अधिक गतिमान करण्यासाठी आजच्या युवक-युवतींनी एकत्र येऊन काम करणे गरजेचे आहे. तरुणांच्या कलागुणांना वाव मिळावा, त्यांच्या विचारांना व्यासपीठ उपलब्ध व्हावे आणि सामाजिक चळवळीशी तरुणाईचा संवाद अधिक प्रभावी व्हावा, या उद्देशाने समता संघर्ष संघटन व समता संघर्ष सांस्कृतिक मंच यांच्या संयुक्त विद्यमाने 'रेनी कार्निवल - संवाद तरुणाईचा' या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. यंदाचे चौथे वर्ष असून, हा कार्यक्रम रविवार, दि. ४ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी ९.३० ते सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत, भिवंडी तालुक्यातील पडघा–पाच्छापुर रोडवरील रिव्हर टच ॲग्रो फॉर्म (दोंदे फॉर्म हाऊस), पाच्छापुर येथे होणार आहे. कार्यक्रमाला विविध मान्यवरांची विशेष उपस्थिती लाभणार आहे. कार्यक्रमाच्या पहिल्या सत्रात चळवळीची गाणी, अभिवाचन, नाट्य, कविता आणि एकपात्री सादरीकरण अशा विविध कलाप्रकारांचे सादरीकरण होणार आहे. दुसऱ्या सत्रात 'आरक्षण पुनर्विचार विधेयक' या विषयावर 'संसद-संवाद' (अभिनव संसद सत्र) आयोजित करण्यात आले असून, यात तरुणांना सहभागी होऊन आपले विचार मांडण्याची संधी मिळणार आहे. तसेच 'आंबेडकरी विचारमूल्ये रुजविण्यासाठी सिनेमा व मीडिया या कलेचा वापर कसा करावा?' या विषयावर पॉडकास्ट सत्र आयोजित करण्यात आले आहे.

## प्रेसिडेंट पदी सत्यनारायण बोल्ली यांची निवड



सोलापूर : (स. गांवकरी)

श्री मार्कंडेय सोलापूर सहकारी रुग्णालय व संशोधन केंद्राच्या ६० व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे आज आयोजन करण्यात आले होते. या सभेमध्ये रुग्णालयाच्या विविध विषयांवर चर्चा करण्यात आली. यावेळी श्री सत्यनारायण बोल्ली यांची प्रेसिडेंट पदावर निवड करण्यात आली. ही निवड होताच सोलापूर शहरातील जनतेने या निवडीचे उत्साहात स्वागत केले. ही निवड झाल्यानंतर श्री रामकृष्ण कोंड्याल व सोलापूर महानगरपालिकेचे महापौर श्री विनायक कोंड्याल यांनी नवनिर्वाचित प्रेसिडेंट श्री सत्यनारायण बोल्ली यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत व अभिनंदन केले. यावेळी उपस्थित मान्यवरांनी श्री बोल्ली यांना पुढील कार्यकाळासाठी शुभेच्छा दिल्या.

## सोलापुरात मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमारला ठोकल्या प्रतीकात्मक बेड्या

### मतदार यादीतील कथित फेरफारांविरोधात सोलापूरात काँग्रेसचे आंदोलन

सोलापूर : (स. गांवकरी)



मतदार याद्यांमध्ये कथित फेरफार करून मतदारांच्या अधिकारांशी खेळ केल्याचा आरोप करत काँग्रेसने सोमवारी सोलापुरात जोरदार आंदोलन केले. खासदार प्रणिती शिंदे यांच्या नेतृत्वाखाली जिल्हा परिषद पूनम गेटसमोर झालेल्या या आंदोलनात मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्यासह त्यांच्या कार्यकाळातील मतदार याद्यांमधील बदलांची स्वतंत्र चौकशी करण्याची मागणी करण्यात आली. शहर काँग्रेसचे अध्यक्ष चेतन नरोटे आणि जिल्हाध्यक्ष सातलिंग शटगार यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या आंदोलनात काँग्रेस पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी घोषणाबाजी केली. ज्ञानेश कुमार यांच्या वेशभूषेतील व्यक्तीला प्रतीकात्मक बेड्या ठोकून निषेध नोंदविण्यात आला. खा.प्रणिती शिंदे यांनी निवडणूक प्रक्रियेतील पारदर्शकतेचा मुद्दा उपस्थित करत मतदारांचा मतदानाचा अधिकार अबाधित राहणे आवश्यक असल्याचे सांगितले. "मतदार याद्यांमध्ये नियमबाह्य बदल झाले असल्यास त्याची निष्पक्ष चौकशी झाली पाहिजे. निवडणूक प्रक्रियेवरील जनतेचा विश्वास कायम राहणे गरजेचे आहे," असे त्यांनी नमूद केले. फॉर्म ६ मधील कथित बदल, एस.आर. आय. प्रक्रियेतून मोठ्या संख्येने नावे वगळल्याचे आरोप आणि निवडणूक आयोगातील निर्णय प्रक्रियेबाबत उपस्थित झालेले प्रश्न यांची चौकशी करण्याची मागणी काँग्रेसकडून करण्यात आली.

# ओझर विमानतळाला 'जटायू विमानतळ, नाशिक' नाव द्या

## २०२७ च्या सिंहस्थाच्या पार्श्वभूमीवर साधू समाजाची मागणी

नाशिक : (स. गांवकरी)



रामायण काळापासून प्रभू श्रीराम, माता सीता आणि लक्ष्मण यांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या नाशिक नगरीच्या ओझर येथील विमानतळाला "जटायू विमानतळ, नाशिक" असे अधिकृत नामकरण करावे, अशी मागणी विरक्त साधू समाज नासिक मंडळ नासिक ट्रस्ट आणि श्री क्षेत्र नासिक आद्य संत महंत मंडळ नाशिक चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने करण्यात आली आहे.

या संदर्भात जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांना निवेदन देण्यात आले. या निवेदनाच्या प्रती मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि पालकमंत्री तथा कुंभमेळा मंत्री, विमान मंत्रालय यांना पाठवण्यात आल्या आहेत.

निवेदनात म्हटले आहे की, सन २०२७ मध्ये नाशिक-त्र्यंबकेश्वर येथे सिंहस्थ कुंभमेळा होत आहे. या कुंभमेळ्यासाठी देशाच्या कानाकोपऱ्यातून तसेच देश-विदेशातून लाखो भाविक, साधू-संत, महंत आणि पर्यटक नाशिकमध्ये येणार आहेत.

अशा वेळी विमानतळाचे नाव "जटायू विमानतळ, नाशिक" असे असल्यास नाशिकच्या धार्मिक व सांस्कृतिक ओळखीला राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर नवी ओळख मिळेल. विमानतळावर येणाऱ्या प्रत्येक प्रवाशाच्या मनात "जटायू कोण होते? आणि त्यांचा नाशिकशी काय संबंध आहे?" हा प्रश्न स्वाभाविकपणे निर्माण होईल.

या एका नावातूनच रामायणातील जटायू महाराजांचा त्याग, शौर्य आणि माता सीतेच्या रक्षणासाठी त्यांनी केलेले बलिदान याची माहिती जगभर पोहोचेल. तसेच नाशिक जिल्ह्यातील टाकेद येथील जटायू मंदिर आणि त्याच्याशी संबंधित धार्मिक वारशाकडेही देश-विदेशातील पर्यटकांचे लक्ष वेधले जाईल. यामुळे विमानतळाचे नामकरण हे केवळ नाव बदलणे न राहता नाशिकच्या धार्मिक पर्यटनाला चालना देणारे आणि भारतीय संस्कृतीचा परिचय करून देणारे माध्यम ठरेल. कुंभमेळ्याच्या निमित्ताने नाशिकमध्ये येणारे साधू संत, महंत आणि देशभरातील रामभक्त या निर्णयाचे निश्चितच स्वागत करतील. ओझर विमानतळ अस्तित्वात आले, विमानसेवा सुरू झाली; परंतु या विमानतळाला अद्याप नाशिकच्या धार्मिक, ऐतिहासिक आणि सांस्कृतिक ओळखीशी जोडणारे नाव मिळाले नाही. या पूर्वीही साधू-संतांकडून ही मागणी करण्यात आलेली आहे. म्हणजेच ही मागणी अचानक निर्माण झालेली नसून, धार्मिक व संत परंपरेतून यापूर्वी पुढे आलेली मागणी आहे. आता २०२७ च्या सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर या मागणीला शासनाने सकारात्मक निर्णयाद्वारे मूर्त रूप द्यावे, ही अत्यंत योग्य वेळ आहे. नाशिक ही कुंभनगरी, मंत्रनगरी आणि प्रभू श्रीरामांच्या पदस्पर्शाने पावन झालेली नगरी आहे. छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजी महाराज यांच्या पराक्रमाच्या इतिहासाशीही या भूमीचे नाते आहे. अशा समृद्ध धार्मिक, ऐतिहासिक व सांस्कृतिक वारसा लाभलेल्या शहराच्या विमानतळाला "जटायू" हे नाव देणे नाशिकच्या अस्मितेला साजेसे ठरेल, असे निवेदनात म्हटले आहे.

### यावेळी कोण उपस्थित होते?

निवेदन देताना कुंभमेळा राष्ट्रीय प्रवक्ते डॉ. महंत भक्ती चरणदास जी महाराज, महंत श्री नरसिंह कृपादास महाराज, छावा भारत क्रांती मिशनचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. विलास पांगारकर, वेदमूर्ती शांताराम शास्त्री भानोसे, धनंजय बेळे, आध्यात्मिक सेनेचे जिल्हाप्रमुख सुनील वलवे, नरहरी उगलमुगले, पत्रकार अमोल सोनवणे, हेमंत काळमेख, सप्तशृंगी गड कोजागिरी पौर्णिमा उत्सव समिती अध्यक्ष अर्जुन काळे, अतुल पांगारकर, बंटी बडगे, सुनील अग्रवाल, राहुल बर्वे, किशोर जाधव आदी उपस्थित होते.

## जागतिक महागणेशोत्सव रील स्पर्धेसाठी आता फक्त ५ दिवस शिल्लक

मुंबई : (स. गांवकरी)




गणेशोत्सवातील कला, परंपरा आणि सांस्कृतिक वारसा डिजिटल माध्यमातून जगभर पोहोचविण्यासाठी महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळाच्या वतीने आयोजित 'जागतिक महागणेशोत्सव रील स्पर्धा २०२६'साठी आता फक्त ७ दिवस शिल्लक आहेत. स्पर्धेची अंतिम मुदत वाढविण्यात आली असून ४ ऑक्टोबर २०२६ पर्यंत रील सादर करता येणार आहे. 'जागर कलेचा, समृद्ध परंपरेचा..!' या संकल्पनेवर आधारित ही स्पर्धा महाराष्ट्रासह भारत आणि जगभरातील स्पर्धकांसाठी खुली आहे. स्पर्धेत 'नैवेद्य आणि परंपरा', 'गणराज रंगी', 'कलाधिपती गणपती', 'शब्दसुमनांकित गणराय' आणि 'AI मधून गणपतीचे नवदर्शन' अशा पाच विभागांचा समावेश आहे. AI-निर्मित किंवा AI-सहाय्यित सामग्री केवळ 'AI मधून गणपतीचे नवदर्शन' या विभागासाठी ग्राह्य राहणार आहे. अन्य विभागांमध्ये AI सामग्री स्वीकारली जाणार नाही. स्पर्धेतील जागतिक सर्वोत्तम रीलसाठी १ लाख रुपये, तर महाराष्ट्रातील आणि महाराष्ट्राबाहेरील सर्वोत्तम रीलसाठी प्रत्येकी ५० हजार रुपये पारितोषिक देण्यात येणार आहे. विविध विभागांमध्ये प्रथम, द्वितीय, तृतीय तसेच उत्तेजनार्थ पारितोषिकेही देण्यात येणार आहेत. रील उभी (9:16) आणि ३० ते ९० सेकंदांची असणे आवश्यक आहे. सहभागासाठी: [www. filmcityganeshareel.com

# थोडक्यात पण महत्वाचे

## दिव्यातील सर्वात मोठा 'रास गरबा २०२६' रद्द तर खर्च गरीब व गरजूंना



ठाणे, दिवा (स. गांवकरी) : दिवा शहरातील शिवसेना नगरसेवक शैलेश मनोहर पाटील यांच्या वतीने यंदाच्या नवरात्रोत्सवानिमित्त आयोजित करण्यात येणारा 'रास गरबा २०२६' रद्द करून या कार्यक्रमासाठी होणारा खर्च गरीब व गरजू नागरिकांच्या मदतीसाठी वापरण्याचा निर्णय जाहीर करण्यात आला आहे. या उपक्रमांतर्गत गरजू विद्यार्थ्यांना शालेय फी व शैक्षणिक मदत, गरजू रुग्णांना औषधोपचार व ऑपरेशनचा खर्च तसेच रुग्णालयातील बिल भरण्यासाठी मदत करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले आहे. तसेच काम करण्यास असमर्थ असलेल्या गरजू व्यक्तींना रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न केले जाणार आहेत. दिवा शहरातील दिवा विकास प्रतिष्ठाण (श्रीकृष्ण नगर, दिवा पूर्व) आणि खासदार डॉ. श्रीकांत एकनाथ शिंदे मित्र मंडळ यांच्या सहकार्याने हा उपक्रम राबविण्यात येणार असल्याचे शिवसेना उपशहर प्रमुख तथा नगरसेवक शैलेश मनोहर पाटील यांनी स्पष्ट केले आहे. उत्सवासाठी होणारा खर्च सामाजिक कार्यासाठी वळविण्याच्या या निर्णयामुळे गरजू नागरिकांना थेट मदत मिळणार आहे. स्थानिक वृत्तस्रोतांमध्येही शैलेश पाटील यांच्या विविध सामाजिक उपक्रमांचा उल्लेख आढळतो.

## डॉ. संकेत सुमन तुकाराम सानप यांना राज्यस्तरीय पुरस्कार २०२६



नाशिक (स. गांवकरी) : भूमिका बहुउद्देशीय सामाजिक संस्था, नाशिक यांच्या वतीने आयोजित 'एकता संमेलन २०२६' तसेच शिक्षक दिनाच्या निमित्ताने विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांचा राज्यस्तरीय पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला. यावेळी आरोग्य, सामाजिक सेवा आणि पत्रकारिता व संपादकीय क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाची दखल घेत डॉ. संकेत सुमन तुकाराम सानप (मुंबई, संगमनेरकर) यांना राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. पत्रकारिता व संपादकीय क्षेत्रात कार्यरत असतानाच आरोग्य आणि सामाजिक सेवेतून गरजू नागरिकांना मार्गदर्शन, शासकीय योजनांची माहिती तसेच आवश्यक सहकार्य मिळवून देण्यासाठी डॉ. संकेत सानप सातत्याने कार्यरत आहेत. त्यांच्या या जनहिताच्या कार्याची दखल घेत त्यांना हा सन्मान प्रदान करण्यात आला. ग्रामीण भागातील सर्वसामान्य कुटुंबातून पुढे येत पत्रकारिता, सामाजिक सेवा आणि आरोग्य क्षेत्रात स्वतःची वेगळी ओळख निर्माण करणाऱ्या डॉ. संकेत सानप यांच्या कार्याचे यावेळी कौतुक करण्यात आले. गरजू नागरिकांना मदत, आरोग्यविषयक जनजागृती आणि पत्रकारितेच्या माध्यमातून समाजातील प्रश्नांना वाचा फोडण्याचे कार्य ते सातत्याने करत आहेत.



## रेल्वे स्थानकातील प्रवाशांच्या समस्या बाबत रेल्वे प्रशासनाला निवेदन

ठाणे, दिवा (स. गांवकरी) : दिवा रेल्वे स्थानकातील प्रवाशांना भेडसावणाऱ्या विविध समस्यांकडे रेल्वे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी शिवराज्य ब्रिगेड सामाजिक संघटनेच्या वतीने उप-स्टेशन मास्तर श्री. एस. के. सिंग यांची भेट घेऊन निवेदन देण्यात आले. प्रवाशांच्या दैनंदिन अडचणी दूर करून आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्याची मागणी यावेळी करण्यात आली. संघटनेचे कोकण विभागीय अध्यक्ष सुजय सावंत यांच्या नेतृत्वाखाली, ठाणे महानगर उपाध्यक्ष विलास उतेकर यांच्या प्रयत्नातून हे निवेदन देण्यात आले. यावेळी ठाणे जिल्हा उपाध्यक्ष उमेश भानसे, ठाणे जिल्हा संघटक शशिकांत कुंभारगण आणि ठाणे महानगर संघटक अनिल पवार यांचे सहकार्य लाभले. दिवा स्थानकातून प्रवास करणाऱ्या दिव्यांग, गर्भवती महिला व कर्करोगग्रस्त रुग्णांसाठी राखीव असलेल्या जागांचा सामान्य प्रवाशांकडून होणारा वापर थांबवून नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली. तसेच स्थानकावरील स्वयंचलित जिने वारंवार बंद राहत असल्याने ज्येष्ठ नागरिक, महिला, दिव्यांग आणि इतर प्रवाशांना होणारा त्रास दूर करण्यासाठी ते नियमितपणे कार्यरत ठेवावेत, अशी मागणी करण्यात आली. याशिवाय स्थानकावर स्वच्छ पिण्याचे पाणी, स्वच्छतागृहे व परिसराची नियमित स्वच्छता याकडेही रेल्वे प्रशासनाने विशेष लक्ष द्यावे, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली. प्रवाशांच्या सुरक्षिततेसह मूलभूत सुविधांमध्ये सुधारणा करून त्यांच्या समस्या तातडीने सोडवाव्यात, अशी अपेक्षा शिवराज्य ब्रिगेड सामाजिक संघटनेने व्यक्त केली.

# नामकरण व सुशोभीकरण सोहळा उत्साहात संपन्न

ठाणे, दिवा : (स. गांवकरी)



दिवा शहरातील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकाचा नामकरण व सुशोभीकरण सोहळा मोठ्या उत्साहात आणि आंबेडकरी जनसमुदायाच्या उपस्थितीत संपन्न झाला. रिपब्लिकन पक्षाचे अध्यक्ष दिनेश पाटील यांच्या पुढाकाराने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. चौकाच्या सुशोभीकरणासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक उत्सव जयंती मंडळाच्या कार्यकर्त्यांनी घेतलेली मेहनत आणि दिलेले योगदान महत्त्वपूर्ण ठरले. या सोहळ्याला आंबेडकरी समाजातील सुवर्णा कांबळे, सौरव अढांगळे, बालाजी कदम, विजय जाधव, विकास इंगळे, संभाजी कदम यांच्यासह विविध मान्यवर तसेच मोठ्या संख्येने नागरिक व आंबेडकरी जनसमुदाय उपस्थित होता. यावेळी दिवा शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचा प्रस्तावही लवकरात लवकर मार्गी लावून पुतळ्याचे अनावरण करण्यात यावे, अशी अपेक्षा सामाजिक कार्यकर्ते सौरव अढांगळे यांनी व्यक्त केली. चौकाचे नामकरण व सुशोभीकरण झाल्यामुळे दिव्यातील आंबेडकरी समाजामध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

# शेतकऱ्याला कायद्याचे संरक्षण, उत्पादन खर्चावर आधारित भाव पाहिजे

## कृषितज्ज्ञ डॉ. बुधाजीराव मुळीक यांची मागणी; मित्रपरिवाराकडून ८६ व्या वर्षात पदार्पणानिमित्त सत्कार

पुणे : (स. गांवकरी)



"मराठवाडा, विदर्भ आणि पश्चिम महाराष्ट्रातील अनेक भागांत पावसाच्या अनियमिततेमुळे शेती संकटात सापडली आहे. दुष्काळग्रस्त भागातील शेतकऱ्यांना तातडीने मदत देण्याची गरज आहे. तसेच शेतकऱ्याला कायद्याचे संरक्षण, शेतमालाला उत्पादन खर्चावर आधारित भाव दिला पाहिजे," अशी मागणी ज्येष्ठ कृषितज्ज्ञ डॉ. बुधाजीराव मुळीक यांनी केली.

डॉ. मुळीक यांनी २७ सप्टेंबर रोजी वयाची ८५ वर्षे पूर्ण करून ८६व्या वर्षात पदार्पण केले. त्यानिमित्त भूमाता परिवार आणि मित्रपरिवाराच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी त्यांनी राज्यातील दुष्काळ, हवामान बदल, शेतीचे प्रश्न आणि शेतकरी धोरणांबाबत भूमिका मांडली. प्रसिद्ध दिग्दर्शक व अभिनेते प्रवीण तरडे, ॲड. केदार सोमण, सामाजिक कार्यकर्ते राज देशमुख, माजी महापौर कमल व्यवहारे यांच्यासह कृषी, राजकीय व प्रशासनातील अनेक मान्यवरांनी डॉ. मुळीक यांना शुभेच्छा देत अभिष्टचिंतन केले.

डॉ. बुधाजीराव मुळीक म्हणाले, "दुष्काळी भागातील प्रत्येक कुटुंबातील किमान दोन व्यक्तींना दररोज ३०० रुपये मजुरी देऊन त्यांच्या शेतातच जलसंधारण आणि शेतीची कामे उपलब्ध करून द्यावीत. त्यामुळे शेतकऱ्याच्या कुटुंबाला उत्पन्न मिळेल आणि त्याच्या शेतातील पाण्याच्या उपलब्धतेतही वाढ होईल. त्यातून शेतकऱ्याचा सन्मानही कायम राहील. शेती ही केवळ उपजीविकेचे साधन नसून, देशाचा प्राण आहे. शेतकऱ्याला त्याच्या उत्पादनासाठी कायद्याचे संरक्षण आणि उत्पादन खर्चावर आधारित योग्य भाव मिळाल्याशिवाय शेती व शेतकरी समृद्ध होणार नाही. शेतकरी समृद्ध झाला तरच देश समृद्ध होईल."

दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांची कर्जे माफ करून बँका, पतसंस्था आणि खासगी सावकारांची सक्तीची वसुली थांबवावी, अशी मागणी करत दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांच्या पाल्यांच्या उच्च, तांत्रिक आणि वैद्यकीय शिक्षणाचा तसेच वसतिगृहाचा खर्च सरकारने करावा. पशुधनासाठी पाणी व चाऱ्याच्या छावण्या तातडीने सुरू कराव्यात, असेही त्यांनी सांगितले. युवा पिढीने कृत्रिम जीवन जगण्यापेक्षा निसर्गाशी नाळ जोडून नैसर्गिक जीवन जगावे. टेक्नॉलॉजी आणि शिक्षणाचा वापर शेतीतील कष्ट कमी करण्यासाठी, तण-खत व्यवस्थापनासाठी आणि गरजू लोकांच्या सेवेसाठी करा, असा संदेश त्यांनी दिला.

# एस. एस. नगरकर ज्वेलर्सच्या भव्य दालनाचे बाणेरमध्ये उद्‌घाटन

## पुण्यातील चौथे दालन; 'राजवाडा'मध्ये ग्राहकांना मिळणार पारंपरिक व दुर्मिळ डिझाईन्सचे दागिने

पुणे : (स. गांवकरी)



मागील ७५ वर्षांपासून पुणेकरांच्या पसंतीस उतरलेल्या एस. एस. नगरकर ज्वेलर्सच्या पाचव्या दालनाचे आज (२० सप्टेंबर) रविवारी बाणेरमध्ये उद्‌घाटन करण्यात आले. बाणेर-म्हाळुंगे रोडवर असलेल्या या दालनामुळे लगतच्या परीसरातील ग्राहकांना आता नगरकर ज्वेलर्सच्या वैशिष्ट्यपूर्ण दागिन्यांची खरेदी करता येणार आहे. उद्‌घाटनाप्रसंगी वसंत नगरकर, स्वाती वल्लभ नगरकर, वासंती वसंत नगरकर, प्रसाद नगरकर, पुष्कर नगरकर, प्रियांका नगरकर, अनघा नगरकर, पूजा नगरकर कुलकर्णी, रोहन कुलकर्णी, कुहू नगरकर उपस्थित होते.

कायनेटीक ग्रुपच्या संचालिका जयश्री फिरोदिया, उद्योजक जगदीश कदम व मोहना कदम, एम. बी. पाटील व संगिता पाटील या नगरकर ज्वेलर्सच्या मान्यवर ग्राहकांच्या हस्ते दालनाचे उद्‌घाटन करण्यात आले. सामाजिकतेचे भान राखत नगरकर ज्वेलर्सकडून तीन सामाजिक संस्थांना प्रत्येकी एक लाखाची अर्थिक मदत करण्यात आली. यामध्ये कर्णबधिर मुलांच्या पुर्नवसनासाठी कार्यरत सुहृद फाऊंडेशन, वंचित घटकांसाठी काम करणारी वंचित विकास व सोलापूर येथील संस्कार संजीवन या संस्थांचा समावेश आहे. सुहृद फाऊंडेशनच्या अनुराधा पाथरफोड व गौरी लेले, वंचित विकासचे विजयकुमार मर्लेचा, देवयानी गोंगले व मिनाक्षी नवले, संस्कार संजीवन फाऊंडेशनचे परमेश्वर काळे व संदिप तिरकुंडे यांनी धनादेश स्वीकारला.

जयश्री फिरोदिया यांनी दालनाच्या भव्यतेचे तसेच दागिन्यांच्या वैशिष्ट्यपूर्ण घडणावळींचे कौतुक केले. नगरकर परिवाराने परंपरेचा साजाला उत्कृष्टतेची जोड देत आपली वेगळी ओळख निर्माण केल्याचे त्यांनी नमूद केले. जगदीश कदम यांनीही नगरकर ज्वेलर्सचे कौतुक करताना व्यवसायासोबतच सामाजिकतेचे भान जपणारे हे कुटुंब असल्याचा विशेष उल्लेख केला. सात दशकांपूर्वी सुरू झालेल्या या व्यवसायाला वल्लभ आणि वसंत नगरकर यांच्यानंतर नवी पिढी जोमाने पुढे नेत आहे. ग्राहकांच्या समाधानाला प्राधान्य देणाऱ्या नगरकर ज्वेलर्सचा विस्तार देशभर व्हावा, अशी आशा त्यांनी यावेळी व्यक्त केली. वसंत नगरकर म्हणाले, "श्रीपाद नगरकर यांनी १९५२ मध्ये श्रीपाद शंकर नगरकर ज्वेलर्सची मुहूर्तमेढ रोवली. आता नगरकरांची तिसरी पिढी प्रसाद आणि पुष्कर या अँटिक, युनिक दागिन्यांची परंपरा पुण्यासह राज्यातील इतर शहरांत घेऊन जाण्यासाठी मेहनत करत आहेत. हा परंपरागत व्यवसाय असून पारंपरिक आणि शुद्ध दागिने ही आमची खासियत आहे. शहराचा झपाट्याने विस्तार होत असताना ग्राहकांना आपण राहत असलेल्या ठिकाणी खरेदी करणे सोपे व्हावे याद्दष्टीने बाणेरमध्ये शाखा सुरू करत आहोत."

# आमदारांच्या खडे बोलानंतर प्रशासनाला एका दिवसाच्या अल्टिमेट का?

तामसा : (स. गांवकरी)



तामसा शहरातील मागील अनेक वर्षांपासून बंद असलेल्या स्ट्रीटलाईट व हायमॅक्सच्या प्रश्नावर आमदार बाबुराव कदम कोहळीकर यांनी संबंधित प्रशासनाला चांगलेच खडे बोल सुनावून दोन दिवसांत समस्या सोडविण्याच्या सूचना दिल्या होत्या. मात्र, आमदारांच्या या खडे बोलानंतर प्रशासनाला केवळ एका दिवसापुरतीच जाग आली का? असा सवाल आता तामसावासीयांकडून उपस्थित केला जात आहे.

गणेश विसर्जनाच्या दिवशीच तामसा शहरातील हायमॅक्सची बत्ती पुन्हा गुल झाल्याने प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. गणपती विसर्जनासाठी मोठ्या प्रमाणावर नागरिक व गणेशभक्त मिरवणुकीत सहभागी झाले असताना प्रमुख मिरवणूक मार्गावरील हायमॅक्स बंद असल्याने प्रमुख चौकात अंधाराचे साम्राज्य पसरले होते. विशेष म्हणजे, नागरिकांच्या तक्रारीनंतर आमदार बाबुराव कदम कोहळीकर यांनी ग्रामपंचायत प्रशासनाची कानउघडणी करत स्वच्छता, स्ट्रीटलाईट व हायमॅक्स सुरू करण्याच्या सूचना दिल्या होत्या. त्यानंतर प्रशासनाने हालचाली केल्याचे दिसून आले. मात्र, दुसऱ्याच दिवशी गणपती विसर्जनाच्या दिवशी हायमॅक्स पुन्हा बंद पडल्याने ही कार्यवाही केवळ आमदाराचे मन राखण्यासाठी ?..असा सवाल नागरिकांकडून केला जात आहे. गणपती विसर्जनाची मिरवणूक शहरातील प्रमुख मार्गाने जात असताना प्रमुख चौकात हायमॅक्स बंद असल्याने नागरिकांना अंधारातून मार्गक्रमण करावे लागले.

# मतदार यादीच्या विशेष सखोल पुनरीक्षणाची मोहीम

तामसा : (स. गांवकरी)



भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार मतदार यादीची विशेष सखोल पुनरीक्षण (Special Intensive Revision - SIR) मोहीम राबविण्यात येत आहे. या मोहिमेअंतर्गत मतदार यादीतील नावांची पडताळणी करून नावातील त्रुटी, मतदारांच्या तपशीलातील बदल, अनमॅपिंग तसेच आवश्यक दुरुस्त्या करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. हदगाव विधानसभा मतदारसंघातील मतदारांनी आपल्या मतदार यादीतील नाव व संबंधित तपशील तपासून त्यामध्ये काही चूक आढळल्यास आवश्यक कागदपत्रांसह दुरुस्ती करून घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे. विशेष सखोल पुनरीक्षणाच्या अनुषंगाने संबंधित मतदारांना आवश्यक कागदपत्रे सादर करण्याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत. यामध्ये ओळख व पत्त्याच्या पुराव्यासह जन्म प्रमाणपत्र, शैक्षणिक प्रमाणपत्र, कुटुंब नोंदवही आदी उपलब्ध कागदपत्रांनुसार पडताळणी केली जाणार आहे. सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी रामराघव माधवराव देशपांडे यांच्या मार्गदर्शनाखाली ही प्रक्रिया राबविण्यात येत असून, मतदारांनी आपल्या नावाची व मतदार यादीतील नोंदींची खात्री करून आवश्यक असल्यास वेळेत दुरुस्ती करून घ्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

# एक लाख रुपयांची खंडणी मागितल्याचा आरोप

राहाता : (स. गांवकरी)



श्रीरामपूर तालुक्यातील फत्तेबाद येथे शासकीय निधीतून सुरू असलेल्या स्मशानभूमीतील मुरूम भरण्याच्या कामावरून ग्रामसेविकेला कथित जातीवाचक शिवीगाळ, धक्काबुक्की तसेच एक लाख रुपयांची खंडणी मागितल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (A)च्या वतीने राहाता पोलीस ठाण्यात निवेदन देऊन संबंधित व्यक्तीविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे. निवेदनानुसार, फत्तेबाद येथील शासकीय निधीतून स्मशानभूमीत मुरूम भरण्याचे काम सुरू असताना ग्रामपंचायतीच्या ग्रामसेविका माधवी नामदेव पलघडमल कामाची पाहणी करण्यासाठी घटनास्थळी गेल्या होत्या. त्यावेळी दत्तात्रय पोपट खेमनर यांनी काळ्या रंगाच्या स्कॉर्पिओ वाहनातून येऊन सुरू असलेल्या शासकीय कामात हस्तक्षेप केल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. तसेच संबंधित व्यक्तीने ग्रामसेविकेला कथित जातीवाचक शिवीगाळ करून अपमानित केले, ग्रामसेविकेला जोराचा धक्का देऊन खाली पाडले आणि तिच्यासोबत असलेल्या शासकीय कर्मचाऱ्यांनाही शिवीगाळ व दमदाटी केल्याचा आरोप करण्यात आला आहे. एक लाख रुपये द्या, अन्यथा काम होऊ देणार नाही, अशा स्वरूपाची मागणी संबंधित व्यक्तीने केल्याचा दावा निवेदनात करण्यात आला आहे. याशिवाय ११०० रुपयांचे फोन-पेच्या माध्यमातून स्वीकारल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे हा प्रकार केवळ वादापुरता मर्यादित नसून शासकीय कामात अडथळा निर्माण करण्याचा आणि कर्मचाऱ्यांवर दबाव आणण्याचा प्रकार असल्याचा आरोप रिपब्लिकन पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी केला आहे. निवेदनात संबंधित व्यक्तीवर यापूर्वीही गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल असल्याचा दावा करण्यात आला असून, शासकीय कर्मचारी व अधिकाऱ्यांना त्रास देऊन त्यांची बदनामी व धमकी देण्याचे प्रयत्न केले जात असल्याचेही नमूद करण्यात आले आहे. या घटनेमुळे संबंधित महिला ग्रामसेविका तसेच शासकीय कर्मचाऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाल्याचा दावा निवेदनात करण्यात आला आहे. त्यामुळे घटनेची गांभीर्याने चौकशी करून तक्रारीतील आरोपांची सत्यता तपासावी, संबंधित व्यक्तीविरुद्ध प्रचलित कायद्यानुसार गुन्हा दाखल करून कठोर कारवाई करावी आणि शासकीय कर्मचाऱ्यांना संरक्षण द्यावे, अशी मागणी करण्यात आली आहे.

# सोशल मीडियावरील कथित आक्षेपार्ह वक्तव्यांप्रकरणी कारवाईची मागणी



किनवट : (स. गांवकरी)

सोशल मीडियावर आदिवासी समाजाबद्दल कथितरित्या अत्यंत आक्षेपार्ह, अवमानकारक आणि सामाजिक तेढ निर्माण करणारी वक्तव्ये प्रसारित केल्याचा आरोप करत प्रविण नरसिंग जेठेवाड यांच्याविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी सकल आदिवासी समाज बांधव, किनवट-माहूर यांच्या वतीने किनवट पोलिसांकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. किनवट पोलिस ठाण्यात दिलेल्या निवेदनानुसार, प्रविण जेठेवाड, रा. एमपी टॉकीज, नाईकनगर, तरोडा (खु.), नांदेड यांनी सोशल मीडियावर प्रसारित केलेल्या एका व्हिडिओमध्ये आदिवासी समाजाबद्दल अत्यंत आक्षेपार्ह व अपमानजनक शब्दांचा वापर केल्याचा आरोप करण्यात आला आहे. संबंधित व्हिडिओमध्ये आदिवासी समाजाला उद्देशून अवमानकारक शब्दप्रयोग करण्यात आल्याचे तक्रारदारांचे म्हणणे असून, ही वक्तव्ये एखाद्या व्यक्तीविरुद्ध मर्यादित नसून संपूर्ण समाजाला उद्देशून असल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. तक्रारदारांच्या मते, अशा प्रकारच्या वक्तव्यांमुळे आदिवासी समाजाच्या प्रतिष्ठेला धक्का पोहोचण्याबरोबरच समाजामध्ये संताप, वैमनस्य किंवा तणाव निर्माण होण्याची शक्यता आहे. विशेषतः किनवट तालुका हा आदिवासीबहुल भाग असल्याने सोशल मीडियावरील अशा मजकुराचा प्रसार झाल्यास त्याचा कायदा व सुव्यवस्थेवर परिणाम होऊ नये, यासाठी पोलिसांनी तत्काळ दखल घ्यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. सदर व्हिडिओ फेसबुक, व्हॉट्सअॅप तसेच इतर डिजिटल माध्यमांवर प्रसारित झाल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे व्हिडिओचा मूळ स्रोत, तो कोणत्या खात्यावरून अपलोड करण्यात आला, पोस्टची तारीख व वेळ, मूळ लिंक, त्यानंतर तो कोणाकडून आणि किती प्रमाणात शेअर करण्यात आला, याचा डिजिटल मागोवा घेण्याची मागणी करण्यात आली आहे.

तक्रारदारांनी संबंधित फेसबुक रीलची लिंकही पोलिसांना दिली असून, या प्रकरणात सायबर तज्ज्ञांची मदत घेऊन डिजिटल पुरावे सुरक्षित करण्याची मागणी केली आहे. तसेच व्हिडिओ मोठ्या प्रमाणावर प्रसारित करणाऱ्या इतर व्यक्तींची भूमिका तपासून, तपासात कायदेशीर जबाबदारी निश्चित झाल्यास संबंधितांवरही कायद्यानुसार कारवाई करावी, असे निवेदनात म्हटले आहे.




संगमनेर | : जागतिक हृदय दिनाचे औचित्य साधून मेडिकव्हर हॉस्पिटल, संगमनेर यांच्या वतीने हृदयविकाराबाबत जनजागृती, नियमित व्यायाम आणि निरोगी जीवनशैलीचा संदेश समाजापर्यंत पोहोचविण्यासाठी भव्य ५ कि.मी. डॉक्टर मॅरेथॉनचे आयोजन करण्यात आले. या मॅरेथॉनमध्ये अकोले व संगमनेर परिसरातील १०० हून अधिक डॉक्टरांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. मेडिकव्हर हॉस्पिटलचे डॉक्टर, अधिकारी व कर्मचारी यांनीही मोठ्या संख्येने सहभाग घेतला. या उपक्रमाला इंडियन मेडिकल असोसिएशन (IMA), नॅशनल इंटिग्रेटेड मेडिकल असोसिएशन (NIMA), संगमनेर तालुका जनरल प्रॅक्टिशनर्स असोसिएशन (STGPA), इंडियन डेंटल असोसिएशन (IDA) आणि अकोले तालुका मेडिकल असोसिएशन (ATMA) या विविध डॉक्टर संघटनांचा उत्स्फूर्त सहभाग लाभला.

## थोडक्यात बातम्या...



### एलिमेंटरी व इंटरमिजिएट चित्रकला परीक्षा सुरळीत सुरू

तामसा (स. गांवकरी) : महाराष्ट्र राज्यात दीर्घकाळापासून घेण्यात येणाऱ्या एलिमेंटरी व इंटरमिजिएट चित्रकला परीक्षेला तामसा येथे उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून परीक्षा सुरळीतपणे सुरू आहे. पीएम श्री जिल्हा परिषद हायस्कूल, तामसा येथे या परीक्षेचे केंद्र असून परिसरातील १३ शाळांमधील एकूण ४१९ विद्यार्थी परीक्षेला सहभागी झाले आहेत. यामध्ये एलिमेंटरी परीक्षेसाठी २६४ विद्यार्थी, तर इंटरमिजिएट परीक्षेसाठी १५५ विद्यार्थी सहभागी झाले आहेत. परीक्षेसाठी विद्यार्थ्यांची गैरसोय होऊ नये यासाठी केंद्रावर ११ हॉलमध्ये बैठक व्यवस्था करण्यात आली आहे. या परीक्षा केंद्राचे केंद्रसंचालक देविदास अक्मवार असून सहसंचालक गजानन सुरकुटवार आहेत. परीक्षा सुरळीत पार पाडण्यासाठी कला शिक्षक संतोष घुगरे, संदीप नरकंदे, माणिकराव देशमुख तसेच गजानन तावडे यांच्यासह शिक्षकवर्ग परिश्रम घेत आहेत. एलिमेंटरी व इंटरमिजिएट या परीक्षा विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्याबरोबरच त्यांच्या चित्रकलेतील कौशल्याची चाचणी घेणाऱ्या महत्त्वाच्या परीक्षा मानल्या जातात. माध्यमिक शिक्षणाच्या पुढील टप्प्यात या परीक्षांतील यश विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक नोंदीसाठीही उपयुक्त ठरते. परीक्षा केंद्रावर विद्यार्थ्यांना आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्याने परीक्षा प्रक्रिया शांततेत व सुरळीतपणे सुरू असल्याचे केंद्र प्रशासनाकडून सांगण्यात आले.



### किनवट नगर परिषद येथे 30 सप्टेंबर पर्यंत एस.आय.आर कॅम्प

किनवट (स. गांवकरी) : नगर परिषद किनवट येथे एस आय आर संदर्भातील त्रुटी दूर करण्यासाठी कॅम्प आयोजित करण्यात आले होते यावेळी नगराध्यक्ष सौ सुजाता येंड्रलवार यांच्या सुचणे नुसार मुख्याधिकारी रोहित भगरे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित कॅम्प मध्ये शहरातील बी एल ओ यांनी नागरिकांच्या समस्या सोडवल्या तर यावेळी नगरसेवक चंद्रशेखर नेम्मानिवार, प्रशांत कोरडे, मारोती मुनेश्वर, नासेर भाटी यांच्यासह नगर परिषद अधिकारी कर्मचारी यांची उपस्थिती होती.

### हिरवा व वाळलेला चारा, गवत व वैरण जिल्ह्याबाहेर वाहतुकीस बंदी

नांदेड जिल्हा (स. गांवकरी) : सन २०२६ च्या खरीप हंगामात ट्रिगर-१ (प्रथम कळ) लागू झालेल्या राज्यातील २६५ तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर करून विविध उपाययोजना व सवलती लागू करण्यात आल्या आहेत. नांदेड जिल्ह्यात मुदखेड व मुखेड वगळता उर्वरित १४ तालुके दुष्काळग्रस्त घोषित करण्यात आले आहेत. जिल्ह्यात यंदाच्या पावसाळ्यात सरासरीपेक्षा कमी पर्जन्यमान झाल्यामुळे चारा उत्पादन अपेक्षेपेक्षा कमी होण्याची शक्यता आहे. परिणामी आगामी काळात चारा टंचाई निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेऊन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी जिल्ह्यात उपलब्ध असलेला हिरवा व वाळलेला चारा, गवत व वैरण जिल्ह्याबाहेर विक्री व वाहतूक करण्यास बंदी घातली आहे. महाराष्ट्र वैरण (निर्यात नियंत्रक) आदेश, २००१ मधील तरतुदींनुसार हा आदेश जारी करण्यात आला आहे. जिल्ह्यातील पशुधनासाठी उपलब्ध चाऱ्याचे संरक्षण करून संभाव्य चारा टंचाईच्या काळात पशुपालकांना चारा उपलब्ध राहावा, हा या निर्णयाचा उद्देश आहे. या आदेशाची तात्काळ अंमलबजावणी करण्यात यावी, असे निर्देश देण्यात आले आहेत. हा आदेश २९ सप्टेंबर २०२६ पासून पुढील आदेशापर्यंत अंमलात राहणार आहे.

### शासकीय कर्तव्यावरील अधिकारी-कर्मचारी व बँक सुरक्षा रक्षकांना सूट

नांदेड जिल्हा (स. गांवकरी) : ०५-औरंगाबाद विभाग पदवीधर मतदारसंघ निवडणूक-2026 ची घोषणा झाल्यापासून आदर्श आचारसंहिता लागू झाली आहे. निवडणूक प्रक्रिया शांततेत, निर्भय व न्याय्य वातावरणात पार पाडण्यासाठी तसेच कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी नांदेड जिल्ह्यात परवानाधारक शस्त्र बाळगण्यास व वाहून नेण्यास प्रतिबंध करण्यात आला आहे. याबाबत जिल्हादंडाधिकारी राहुल कर्डिले यांनी शस्त्र अधिनियम, 1959 चे कलम 22 व भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, 2023 चे कलम 163 अन्वये आदेश जारी केला आहे. भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार निवडणूक जाहीर झाल्यापासून निवडणुकीचा निकाल घोषित होईपर्यंत शस्त्रासाठी नवीन परवाना देण्यास तसेच परवानाधारकांना परवान्यातील शस्त्रास्त्रे बाळगण्यास व वाहून नेण्यास प्रतिबंध करण्याबाबत निर्देश आहेत. त्यानुषंगाने नांदेड जिल्ह्यातही हा प्रतिबंध लागू करण्यात आला आहे.

# भिवंडीतील पत्रकारांचा सन्मान करणारे संपादक डॉ. किशोर बळीराम पाटील

भिवंडी : (स. गांवकरी)

दै. 'स्वराज्य तोरण'चे संपादक तथा स्वराज्य तोरण चॅरिटेबल ट्रस्ट महाराष्ट्र राज्याचे संस्थापक अध्यक्ष डॉ. श्री. किशोर बळीराम पाटील हे गेल्या १८ वर्षांपासून आपल्या वाढदिवसानिमित्त स्वतःचा वाढदिवस साजरा न करता आणि कोणताही सत्कार स्वीकारण्याऐवजी भिवंडी शहर व ग्रामीण भागातील पत्रकार बंधू-भगिनींचा सन्मान करीत आहेत. पत्रकारितेच्या क्षेत्रातील सहकाऱ्यांप्रती कृतज्ञता व्यक्त करणारा त्यांचा हा उपक्रम निश्चितच अभिमानास्पद असल्याचे मत समाज कल्याण न्यास महाराष्ट्र राज्याचे संस्थापक अध्यक्ष तथा धर्मसेवक डॉ. श्री. सोन्या काशीनाथ पाटील यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना व्यक्त केले. २२ सप्टेंबर हा डॉ. किशोर पाटील यांचा वाढदिवस. मात्र, गेल्या १८ वर्षांपासून त्यांनी स्वतःचा वाढदिवस साजरा करण्याऐवजी याच दिवशी भिवंडी शहर व ग्रामीण




परिसरातील सुमारे ८० ते ९० पत्रकार बंधू-भगिनींचा सन्मान करण्याची परंपरा जपली आहे. विशेष म्हणजे, स्वतःचा सत्कार करून घेण्याऐवजी पत्रकारांचा सत्कार करण्याला त्यांनी प्राधान्य दिले आहे.

याबाबत बोलताना डॉ. सोन्या काशीनाथ पाटील म्हणाले की, एका वर्तमानपत्रात प्रसिद्ध झालेली बातमी वाचली. एका पत्रकाराने पहिल्यांदाच आपल्या वाढदिवसानिमित्त इतर पत्रकारांचा सन्मान केल्याचे त्या बातमीत नमूद करण्यात आले होते.

ती बातमी वाचल्यानंतर माझ्या मनात डॉ. किशोर पाटील यांचा विचार आला."

"डॉ. किशोर पाटील हे आपल्या आगरी समाजातील दैनिक 'स्वराज्य तोरण'चे संपादक आहेत. गेल्या १८ वर्षांपासून ते स्वतःचा वाढदिवस साजरा न करता पत्रकार बंधू-भगिनींचा सन्मान करीत आहेत. एवढ्या वर्षांपासून सुरू असलेल्या या उपक्रमाची दखल घेऊन त्यांच्या कार्याबद्दल एखाद्या पत्रकाराला किंवा वर्तमानपत्राला बातमी करावी असे का वाटले नाही, हा प्रश्न मनात निर्माण झाला. म्हणूनच गेल्या १८ वर्षांत प्रथमच आज माझ्या मनातील भावना प्रसारमाध्यमांसमोर व्यक्त करीत आहे," असेही डॉ. सोन्या पाटील यांनी सांगितले.

पत्रकारिता क्षेत्रात काम करणाऱ्या सहकाऱ्यांचा वाढदिवसानिमित्त सन्मान करून त्यांना प्रोत्साहन देण्याची डॉ. किशोर पाटील यांची ही परंपरा केवळ सत्कारापुरती मर्यादित नसून पत्रकारांच्या कार्याचा सन्मान करण्याचा एक वेगळा दृष्टिकोन असल्याचे डॉ. सोन्या पाटील यांनी नमूद केले.

स्वतःच्या वाढदिवसाच्या दिवशी स्वतःचा गौरव करून घेण्याऐवजी आपल्या सहकाऱ्यांचा सन्मान करण्याची गेल्या १८ वर्षांची ही परंपरा पत्रकारिता क्षेत्रातील एक वेगळा आदर्श निर्माण करणारी आहे. त्यामुळे या उपक्रमाची समाजासमोर नोंद व्हावी, या भावनेतून आपण प्रथमच याबाबत बोलत असल्याचे डॉ. सोन्या काशीनाथ पाटील यांनी स्पष्ट केले.व या बातमीनंतर कोणाल तरी वाटावे की,डॉ. किशोर पाटील यांची बातमी तयार करायला हवी हाच एकमेव माझा उद्देश आहे.

# सार्वजनिक ठिकाणी पक्षांचे चित्रे, चिन्हांचे कापडी फलक व भाषणांवर निर्बंध

नांदेड जिल्हा : (स. गांवकरी)

05-औरंगाबाद विभाग पदवीधर मतदारसंघ निवडणूक-2026 ची प्रक्रिया शांततेत, निर्भय व न्याय्य वातावरणात पार पडावी, यासाठी जिल्हादंडाधिकारी राहुल कर्डिले यांनी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, 2023 च्या कलम 163 अन्वये नांदेड जिल्हा हद्दीत काही निर्बंध लागू केले आहेत.

भारत निवडणूक आयोगाने 22 सप्टेंबर 2026 रोजी 05-औरंगाबाद विभाग पदवीधर मतदारसंघ निवडणूक-2026 ची घोषणा केली असून, घोषणेच्या दिनांकापासून आदर्श आचारसंहिता लागू झाली आहे. निवडणूक कालावधीत सार्वजनिक ठिकाणी पक्षांची चित्रे अथवा चिन्हे असलेले कापडी फलक लावणे तसेच सार्वजनिक ठिकाणी भाषणे देण्यास प्रतिबंध करण्यात आला आहे. या आदेशाची अंमलबजावणी निवडणूक कालावधीत नांदेड जिल्ह्याच्या संपूर्ण हद्दीत करण्यात येणार आहे. संबंधितांना स्वतंत्र नोटीस देऊन त्यांचे म्हणणे ऐकून घेणे सद्यस्थितीत शक्य नसल्याने भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, 2023 च्या कलम 163(2) अन्वये हा एकतर्फी आदेश जारी करण्यात आला आहे. हा आदेश 23 सप्टेंबर 2026 रोजी निर्गमित करण्यात आला असून, आदेश निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून 31 ऑक्टोबर 2026 रोजी मध्यरात्री 12 वाजेपर्यंत लागू राहणार आहे. नागरिक, राजकीय पक्ष, उमेदवार व संबंधितांनी या आदेशाचे पालन करून निवडणूक प्रक्रिया शांततापूर्ण वातावरणात पार पाडण्यासाठी प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# ६ वर्षांपासून फरार असलेला वॉन्टेड आरोपी सुरतहून जेरबंद

डांग : (स. गांवकरी)

डांग जिल्ह्यात दाखल असलेल्या गुन्ह्यांतील वॉन्टेड तसेच फरार आरोपींना पकडण्यासाठी डांग जिल्हा पोलीस अधीक्षक पूजा यादव यांच्या मार्गदर्शनाखाली वघई पोलिसांकडून विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. या कारवाईदरम्यान अपघाताच्या गुन्ह्यात गेल्या सहा वर्षांपासून फरार असलेल्या आरोपीला सुरत येथून पकडण्यात वघई पोलिसांना यश आले आहे. वघई पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक ए. ए. चावडा यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांच्या पथकाने वॉन्टेड व फरार आरोपींचा शोध सुरू केला होता. तपासादरम्यान वघई पोलीस ठाण्यात ए-पार्ट गु.र.नं. 11219007200805/2020 अन्वये भारतीय दंड संहिता कलम 279 तसेच मोटार वाहन कायदा कलम 177, 184 आणि 134 अंतर्गत दिनांक 6 डिसेंबर 2020 रोजी गुन्हा दाखल असल्याचे समोर आले.

या गुन्ह्यात आरोपीने त्याच्या ताब्यातील महिंद्रा कंपनीची पांढऱ्या रंगाची XUV कार क्रमांक GJ-05-JR-1059 भरधाव व निष्काळजीपणे चालवून डांग पोलिसात कार्यरत कर्मचाऱ्याच्या मारुती स्विफ्ट कार क्रमांक GJ-30-A-1936 ला धडक दिली होती. या अपघातात सुमारे ₹55 हजारांचे नुकसान झाले होते. अपघातानंतर आरोपी घटनास्थळावरून फरार झाला होता. गुन्हा दाखल झाल्यानंतर पोलिसांनी अपघातग्रस्त वाहनाच्या नोंदणी क्रमांकाच्या आधारे वाहन मालकाची माहिती मिळवून आरोपीचा शोध सुरू केला. त्याच्या नोंदणीकृत पत्त्यावर तपास केला असता तो तेथे आढळून आला नाही. तपासात आरोपीने आपले घर विकून तेथून फरार झाल्याची माहिती समोर आली. बराच काळ आरोपीचा ठावठिकाणा न लागल्याने या गुन्ह्यात 'अ' समरी दाखल करण्यात आली होती. दरम्यान, गेल्या सहा वर्षांपासून फरार असलेल्या आरोपीचा शोध घेण्यासाठी वघई पोलिसांनी तांत्रिक पाळत व डिजिटल विश्लेषणाच्या माध्यमातून तपास सुरू ठेवला. तपासादरम्यान आरोपीच्या पॅनकार्डशी संबंधित माहिती मिळाल्यानंतर त्याआधारे इतर डिजिटल माहिती संकलित करण्यात आली.

# दुष्काळाच्या यादीतून मुदखेड तालुका वगळला शेतकऱ्याच्या प्रश्नांवर काँग्रेस आक्रमक राज्य शासनाच्या जीआर ची होळी

मुदखेड : (स. गांवकरी)

राज्यासह मुदखेड तालुक्यात यंदा पावसाचे अत्यल्प प्रमाण राहिल्याने शेतकरी मोठ्या संकटात सापडले आहेत. पिकांची वाढ खुंटली असून अनेक भागांत पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होण्याची परिस्थिती निर्माण झाली आहे. अशा गंभीर परिस्थितीतही मुदखेड तालुक्याचा दुष्काळग्रस्त तालुक्यांच्या यादीत समावेश करण्यात न आल्याच्या निषेधार्थ काँग्रेसच्या वतीने काळ्या फिती लावून शासनाच्या जीआर ची होळी करत शासनाच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी केली. भोकर विधानसभा मतदारसंघातील काँग्रेसचे नेते पप्पू पाटील कोंडेकर यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन करण्यात आले. यावेळी शासनाच्या दुष्काळविषयक निर्णयाचा निषेध नोंदवत संबंधित शासन निर्णयाची (जीआर) होळी करण्यात आली.



मुदखेड तालुक्यात मागील काही महिन्यांपासून समाधानकारक पाऊस झालेला नसल्याने खरीप हंगामातील सोयाबीन, कापूस, तूर, मूग, उडीद आदी पिकांवर मोठा परिणाम झाला आहे. पावसाअभावी पिकांची वाढ खुंटली असून शेतकऱ्यांच्या उत्पादनावर त्याचा विपरीत परिणाम झाला आहे. त्यामुळे शासनाने प्रत्यक्ष परिस्थितीचा पंचनामा करून मुदखेड तालुक्याचा दुष्काळग्रस्त यादीत समावेश करावा, अशी मागणी आंदोलकांनी केली.

यावेळी काँग्रेस कार्यकर्त्यांनी शासनाच्या निर्णयाविरोधात घोषणाबाजी करत शेतकऱ्यांना तातडीने मदत देण्याची मागणी केली. दुष्काळी परिस्थिती लक्षात घेऊन शेतकऱ्यांना आर्थिक मदत, पीक नुकसानभरपाई, पीकविमा लाभ तसेच आवश्यक त्या सवलती देण्यात याव्यात, अशी मागणी करण्यात आली.

मुदखेड तालुक्याची वस्तुस्थिती लक्षात न घेता दुष्काळग्रस्त यादीतून तालुक्याला वगळणे हा शेतकऱ्यांवर अन्याय आहे. शासनाने कागदोपत्री निकषांपेक्षा प्रत्यक्ष शेतातील परिस्थितीचा विचार करून तातडीने निर्णय घ्यावा, अशी भूमिका पप्पू पाटील कोंडेकर यांनी यावेळी मांडली. शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे शासनाने गांभीर्याने लक्ष न दिल्यास काँग्रेसच्या वतीने आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल, असा इशाराही यावेळी देण्यात आला. या आंदोलनामुळे मुदखेड तालुक्यातील दुष्काळाचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला असून शासन आता कोणती भूमिका घेते, याकडे शेतकरी व नागरिकांचे लक्ष लागले आहे.यावेळी पप्पु पाटील कोंढेकर, प्रताप देशमुख बारडकर, गिरीष कोत्तावार, करीम खांसाब,तेजाब पाटील मुंगल,वेदांत शेवटे,रमेश बोडके, विठ्ठल आचार्य, गजानन संबोड महेश देशमुख, राजेश पवार,योगेश पवार,शिवाजी वडजे, बळवंत पाटील पुयड,बालाजी शिंदे ,शिवाजी पाटील, संभाजी गाढे दरेगावकर, गंडरस,बालाजी गुळेवाड ,प्रशांत पाटील , महेश पवार, कमल किशोर पवार,दादाराव पाटील नंद किशोर पवार, दिंगबर पाटील वासरीकर, अंबादास पाटील,सुनील जाधव, शिवानंद देवके, खादिर कुरेशी,अतीख अहमद, मामिडवार,बाळू पांचाळ, पिंटू धडे,मनिका मुंगल आदींसह कांग्रेस, शिवसेना ठाकरे गटाचे पदाधिकारी कार्यकर्ते ग्रामीण भागातील शेतकरी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते यावेळी मुदखेड पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक धिरज चव्हाण यांनी वेळीच पोलिस फौजफाटा पाठवून परिस्थिती नियंत्रणाबाहेर जाणार नाही याची दक्षता घेतली.

# आरोग्य योजनांचा लाभ शेवटच्या घटकापर्यंत पोहोचा : संजय काटकर

## 'सेवा संकल्प अभियान', 'माझं गाव-आरोग्य संपन्न गाव' व 'तिसीचा पल्ला-तपासणी अन् सल्ला' मोहिमांना गती देण्याचे निर्देश

नांदेड जिल्हा : (स. गांवकरी)

नागरिकांना वेळेत, सुलभ, तत्पर आणि गुणवत्तापूर्ण आरोग्य सेवा उपलब्ध करून देतानाच शासनाच्या विविध आरोग्य योजनांचा लाभ समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचविण्यासाठी आरोग्य विभागाने अधिक प्रभावीपणे कार्य करावे, असे निर्देश आरोग्य आयुक्त संजय काटकर यांनी दिले.



आरोग्य आयुक्त संजय काटकर यांच्या अध्यक्षतेखाली आणि आरोग्य सेवा, लातूर मंडळाच्या उपसंचालक डॉ. रेखा गायकवाड यांच्या उपस्थितीत जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवनमध्ये विभागीय आरोग्य आढावा बैठक झाली. या बैठकीस लातूर विभागातील लातूर, बीड, धाराशिव आणि नांदेड जिल्ह्यांचे जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा शल्यचिकित्सक तसेच संबंधित अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. या बैठकीत विविध राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रम, शासकीय आरोग्य योजना तसेच जनजागृती अभियानांच्या अंमलबजावणीचा सविस्तर आढावा घेण्यात आला. प्रलंबित बाबींचा तातडीने निपटारा करणे, कामगिरीमध्ये सातत्य राखणे आणि आरोग्यविषयक योजनांचा प्रत्यक्ष लाभ नागरिकांपर्यंत पोहोचविण्यावर यावेळी विशेष भर देण्यात आला.

'सेवा संकल्प अभियान', 'माझं गाव-आरोग्य संपन्न गाव' तसेच 'तिसीचा पल्ला-तपासणी अन् सल्ला' या महत्त्वपूर्ण अभियानांच्या प्रगतीचा यावेळी आढावा घेण्यात आला. विशेषतः ३० वर्षांवरील नागरिकांची असंसर्गजन्य आजारांसाठी तपासणी, आजारांचे वेळेत निदान तसेच आवश्यक उपचार व वैद्यकीय सल्ला उपलब्ध करून देण्यासाठी प्रभावी नियोजन करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमासह विविध राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रमांची प्रभावी अंमलबजावणी करण्याबाबतही यावेळी सविस्तर चर्चा करण्यात आली.

माता व बाल आरोग्याच्या दृष्टीने उच्च जोखमीच्या गर्भवती मातांची शंभर टक्के ओळख पटवून त्यांच्यापर्यंत आरोग्य यंत्रणेची पोहोच सुनिश्चित करण्याच्या सूचना देण्यात आल्या. अशा मातांचा नियमित पाठपुरावा करून त्यांना आवश्यक उपचार, संदर्भ सेवा आणि वैद्यकीय सुविधा वेळेत उपलब्ध करून देण्यावर विशेष भर देण्यात आला. आरोग्य संस्थांमधील प्रयोगशाळा सेवा अधिक प्रभावी व गतिमान करण्यासोबतच रक्तपेढी सेवांचे योग्य नियोजन करण्याच्या सूचना देण्यात आल्या. आवश्यकतेनुसार रक्ताची उपलब्धता, साठा आणि वितरण यांचे काटेकोर नियोजन करण्याबाबतही निर्देश देण्यात आले. आरोग्य संस्थांच्या माध्यमातून नागरिकांना अधिक चांगल्या सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी जन आरोग्य समित्यांचे कामकाज अधिक प्रभावी करण्याच्या सूचना देण्यात आल्या. ग्रामीण व दुर्गम भागातील नागरिकांना तज्ज्ञ वैद्यकीय सल्ला सहज उपलब्ध व्हावा, यासाठी टेलिमेडिसिन सेवा अधिक गतिमान करण्यावरही भर देण्यात आला.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ३८ए, सोमेश्वर अपार्टमेंट, अदाते/शिंदे हॉस्पिटलजवळ, पुरुषोत्तम व्हिला समोर, वडगांव बुद्रुक, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)
कोकण विभागीय कार्यालय : शकुंतल बिल्डिंग, गाळा क्र, २, सेक्टर ५, कोपरखैरणे, नवी मुंबई ४००७०९

नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 । पाने : ५ । वर्ष : ४ थे । अंक : २८५ । किंमत : ४ रूपये
Gmail : aklgavakari@gmail.com
Gmail : punegavkari@gmail.com




महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक
# समर्थ गांवकरी
संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे
POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026




बुधवार दि. ३० सप्टेंबर २०२६
मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

## ‘ट्रिगर’मध्ये न बसलेल्या तालुक्यांतही पीक नुकसानीनुसार मदत

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची घोषणा–‘ग्राउंड ट्रूथिंग’द्वारे प्रत्यक्ष नुकसानीची पाहणी करणार

मुंबई (समर्थ गांवकरी)

दुष्काळाच्या मदतीसाठी ‘ट्रिगर–१’च्या निकषात न बसलेल्या, मात्र पिके करपलेल्या तालुक्यांमध्ये ‘ट्रिगर–२’मधील काही निकषही लागू होत नसतील, तरी प्रत्यक्ष परिस्थितीची पाहणी करून मदत देण्याची कार्यपद्धती निश्चित करण्यात आली आहे. त्यासाठी संबंधित तालुक्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर ‘ग्राउंड ट्रूथिंग’ करण्यात येणार असून, पिकांची करपलेली अवस्था प्रत्यक्ष पाहून दुष्काळाचे सर्व लाभ देण्याचा निर्णय मंत्रिमंडळाने घेतला आहे, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंगळवारी दिली.

मंत्रिमंडळ बैठकीनंतर माध्यमांशी संवाद साधताना ते बोलत होते. फडणवीस म्हणाले, यंदा पहिल्या दोन महिन्यांत मोठ्या प्रमाणावर पाऊस झाला, तर त्यानंतरच्या दोन महिन्यांत पाऊस झाला नाही. अशा प्रकारची स्थिती सामान्यपणे निर्माण होत नाही. त्यामुळे पारंपरिक निकषांमध्ये काही तालुके बसत नसले तरी प्रत्यक्ष पिकांचे नुकसान झाले असल्यास शेतकरी मदतीपासून वंचित राहू नये, या दृष्टीने हा निर्णय घेण्यात आल्याचे फडणवीस यांनी सांगितले.

या प्रक्रियेत मंत्रिमंडळाने मराठवाडा, विदर्भ किंवा इतर कोणत्याही विभागापुरते मर्यादित न ठेवता संबंधित तालुक्यांतील परिस्थिती जाणून घेण्याची जबाबदारी मंत्रिमंडळ उपसमितीवर सोपवली आहे. उपसमितीने प्रत्येक ठिकाणी परिस्थितीची माहिती घेऊन त्याचे निरीक्षण करायचे आहे. तांत्रिक बाबींमुळे एखाद्या शेतकऱ्याचे नुकसान झाले असूनही तो मदतीच्या निकषात येत नाही, अशी परिस्थिती निर्माण होऊ नये, यासाठी विशेष बाब म्हणून या पद्धतीला मान्यता देण्यात आली आहे. या संपूर्ण प्रक्रियेचे निरीक्षणही उपसमिती करणार आहे.

तालुका हा एकक मानून सरासरी काढल्यामुळे काही ठिकाणी प्रत्यक्ष नुकसान लपून राहण्याची शक्यता असल्याचेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले. एखाद्या तालुक्यातील एक–दोन मंडळांची सरासरी जास्त असल्यामुळे संपूर्ण तालुक्याची सरासरी वाढू शकते. त्यामुळे आता केवळ तालुका पातळीवरच नव्हे, तर मंडळ पातळीवरही परिस्थितीची पाहणी करण्यात येणार आहे. संबंधित तालुक्यांमध्ये मंडळ स्तरापर्यंत जाऊन ही प्रक्रिया राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

पंचनाम्यावर शेतकऱ्याची स्वाक्षरी असणार का, असा प्रश्न विचारण्यात आल्यानंतर फडणवीस यांनी पंचनामा प्रक्रिया प्रतिबंधात्मक ठरू नये, असे स्पष्ट केले. पंचनामा कसा झाला आहे, याची माहिती शक्यतो शेतकऱ्याला मिळाली पाहिजे, असा सरकारचा प्रयत्न आहे. मात्र, अनेक वेळा पंचनामा करताना शेतकरी प्रत्यक्ष ठिकाणी उपस्थित नसू शकतो. त्यामुळे अशा विविध परिस्थितींचा विचार करून योग्य निर्णय मंत्रिमंडळ उपसमिती घेईल, असे त्यांनी सांगितले.



## १८ वर्षांखालील मुलांसाठी सोशल मीडियाचे नियम कडक होणार!

नवी दिल्ली (समर्थ गांवकरी)

सर्वोच्च न्यायालयाने केंद्र सरकारला अल्पवयीन मुलांच्या सोशल मीडिया अकाऊंटच्या वापरावर कठोर सुरक्षा उपाय लागू करण्याची मागणी केली आहे. अल्पवयीन मुलांच्या अकाऊंटसंदर्भात सोशल मीडिया कंपन्यांनी तयार केलेली सध्याची गाईडलाईन्स फक्त मार्गदर्शक तत्त्वांपुरती मर्यादित न राहता, त्याची अंमलबजावणी भारतीय कायद्यानुसार केली जावी, अशी सर्वोच्च न्यायालयाने केंद्र सरकारकडे मागणी केली आहे. या मागणीमुळे पुन्हा एकदा १८ वर्षांखालील मुलांच्या सोशल मीडिया वापरावरील कायदा आणखीन कडक होण्याची शक्यता आहे.

सर्वोच्च न्यायालयाने केंद्र सरकारला भारतीय कायद्याच्या आधारे सर्व सोशल मीडिया कंपन्यांसाठी एक निर्देश जारी करण्याचे निर्देश दिले आहेत, ज्यानुसार १८ वर्षांखालील मुलांना सोशल मीडियावर अकाऊंट उघडण्यास मनाई असेल. पण मुलांना वयाच्या १८ वर्षांनंतर त्यांच्या पालकांच्या नियंत्रणाखाली सोशल मीडिया अकाऊंट सुरू करण्याची परवानगी दिली जाऊ शकते. सध्या, ही तरतूद मध्यस्थ नियमांमध्ये (खपींशीाशवळरीू ठीश्रशी) आहे, परंतु या नियमाची प्रभावीपणे अंमलबजावणी केली जाण्याची शक्यता आहे. ’जस्ट राइट्स ऑफ चिल्ड्रन अलायन्स’ने दाखल केलेल्या याचिकेदरम्यान सुप्रीम कोर्टामध्ये अल्पवयीन मुलांच्या सोशल मीडिया वापरासाठीच्या सुरक्षा उपायांवर चर्चा केली.

## ’लालबागच्या राजा’च्या चरणी ₹६.११ कोटींचे दान

### सोन्या–चांदीसह २ बाईकचा होणार लिलाव

मुंबई (समर्थ गांवकरी)

मुंबई : मुंबईतील प्रसिद्ध लालबागचा राजा सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाच्या ९३ व्या गणेशोत्सवात भक्तांनी मोठ्या श्रद्धेने दान अर्पण केले. १४ सप्टेंबर ते २८ सप्टेंबर २०२६ या कालावधीत लालबागच्या राजाच्या चरणी एकूण ₹६,११,९६,५०० इतके दान जमा झाले.

मंडळाने दिलेल्या माहितीनुसार, यामध्ये स्टेज पेटीत ₹३,५३,४२,०००, रंग पेटीत ₹२,४२,४०,०००, तर विसर्जन पेटीत ₹१६,१४,५०० इतकी रक्कम जमा झाली. या तिन्ही पेट्यांमधील रक्कम मिळून एकूण दान ₹६ कोटी ११ लाख ९६ हजार ५०० इतके झाले आहे.

दरम्यान, गणेशोत्सव पार पडल्यानंतर लालबागच्या राजाला भक्तांनी अर्पण केलेल्या वस्तूंचा जाहीर लिलाव आयोजित करण्यात आला आहे. बुधवार, ३० सप्टेंबर २०२६ रोजी संध्याकाळी ५ ते रात्री १० वाजेपर्यंत लालबाग मार्केट येथे हा लिलाव होणार आहे.

या लिलावात भाविकांनी लालबागच्या राजाला अर्पण केलेले सोन्या–चांदीचे दागिने, विविध साहित्य आणि इतर वस्तूंसह २ बाईक लिलावासाठी ठेवण्यात येणार आहेत. विशेष म्हणजे, या लिलाव प्रक्रियेत सर्व गणेशभक्तांना सहभागी होता येणार आहे.मंडळाचे अध्यक्ष बाळासाहेब कांबळे, मानद सचिव सुधीर साळवी आणि खजिनदार मंगेश दळवी यांनी ही माहिती दिली आहे. त्यामुळे गणेशोत्सवानंतर आता लालबाग मार्केटमध्ये होणाऱ्या या जाहीर लिलावाकडे भाविकांचे लक्ष लागले आहे.

## ओबीसींच्या सर्वांगीण विकासासाठी एक रुपयात जागा : उपसमितीच्या बैठकीत चंद्रशेखर बावनकुळेंचे निर्देश

### महाज्योतीसाठी ३०० कोटींचा निधी

मुंबई (समर्थ गांवकरी)

इतर मागासवर्गीय (ओबीसी) समाजाच्या सर्वांगीण विकासासह विद्यार्थ्यांना सुविधा पुरवण्यासाठी महसूलसह सर्व शासकीय विभागांच्या जागा एक रुपये दरात उपलब्ध करून देण्याचा प्रस्ताव तातडीने सादर करावा, असे निर्देश ओबीसी मंत्रिमंडळ उपसमितीचे अध्यक्ष व महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी मंगळवारी दिले. गेल्या बैठकीत चर्चा झालेल्या प्रस्तावावर अंतिम निर्णय घेताना प्रशासनाची चालढकल खपवून घेतली जाणार नाही. ओबीसींच्या विकास प्रक्रियेत अडथळे निर्माण करणाऱ्यांची गय केली जाणार नाही, असा इशारा त्यांनी दिला. इतर समाजाला ज्याप्रमाणे सुविधा व निधी उपलब्ध करून दिला जातो, त्याच धर्तीवर ओबीसी समाजालाही सर्व सुविधा प्राधान्याने देण्यात याव्यात, अशी सूचना त्यांनी केली. ओबीसी समाज मंत्रिमंडळ उपसमितीची पाचवी बैठक मंत्रालयात महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली विविध १२ मुद्द्यांवर चर्चा झाली. अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ, वनमंत्री गणेश नाईक, पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील, पर्यावरण व वातावरण बदल मंत्री पंकजा मुंडे, इतर मागास बहुजन कल्याणमंत्री अतुल सावे यांच्यासह इमाव विभागाचे उपसचिव, सहसचिव व विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

मंत्री बावनकुळे म्हणाले, मंत्रीमंडळ उपसमितीच्या प्रत्येक बैठकीत किमान दोन प्रस्ताव मंजुरीसाठी ठेवण्यात आले पाहिजेत. त्याबरोबरच परदेशी शिष्यवृत्तीचा प्रस्ताव तातडीने



मंजूरीसाठी पाठवावा. ओबीसी समाजातील आत्महत्या केलेल्या १६ नावांसह पुढील समितीत प्रस्ताव मंजूरीसाठी ठेवण्यात यावा. महाज्योतीसाठी ३०० कोटींचा निधी, वसतीगृह योजना, वनार्टी यांचे सर्व प्रस्ताव मंजूरीसाठी देण्यात यावेत. वनमंत्री गणेश नाईक यांनी ओबीसी समाजाचा शासकीय सेवेतील प्रलंबित असणारा संपूर्ण बँकलॉग त्वरित भरून काढण्याची आग्रही मागणी केली. इतर घटकांप्रमाणेच ओबीसी समाजाच्या कल्याणकारी योजनांसाठी पुरेसा निधी उपलब्ध करून दिला पाहिजे, याकडे त्यांनी लक्ष वेधले.

## पुण्यात लक्ष्मी रस्त्यावरील बँक ऑफ इंडियाच्या इमारतीत भीषण आग; सुदैवाने जीवितहानी टळली!

पुणे (समर्थ गांवकरी)



पुण्यातील अत्यंत गजबजलेल्या लक्ष्मी रस्त्यावरील शगुन चौक परिसरात असलेल्या बँक ऑफ इंडियाच्या इमारतीला मंगळवारी दुपारी अचानक भीषण आग लागली. भरदुपारी आणि वर्दळीच्या ठिकाणी ही घटना घडल्यामुळे परिसरात काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, इमारतीच्या वरच्या मजल्यावर असलेल्या बँकेच्या कार्यालयात ही आग लागली. घटनेची माहिती मिळताच पुणे अग्निशामक दलाच्या पथकाने तातडीने घटनास्थळी धाव घेऊन आग विझवण्याचे काम हाती घेतले.

सुरुवातीला अग्निशामक दलाच्या ६ गाड्या घटनास्थळी दाखल झाल्या होत्या. मात्र, आगीची तीव्रता पाहता गाड्यांची संख्या ७ वर वाढवण्यात आली. मुख्य अग्निशामक अधिकाऱ्यांच्या प्रत्यक्ष देखरेखीखाली अग्निशामक दलाचे जवान आगीवर नियंत्रण मिळवण्यासाठी शर्थीचे प्रयत्न करत आहेत. या आगीत बँकेच्या कार्यालयातील साहित्याचे मोठे नुकसान झाले आहे. मात्र, सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी किंवा कोणीही जखमी झाल्याचे वृत्त नाही, ज्यामुळे मोठा अनर्थ टळला.

दरम्यान, आग नक्की कशामुळे लागली याचे मूळ कारण अजून स्पष्ट झालेले नाही. आग पूर्णपणे आटोक्यात आल्यानंतरच आगीचे कारण आणि एकूण नुकसानाची माहिती समोर येईल, असे अग्निशामक अधिकाऱ्यांनी सांगितले. लक्ष्मी रस्ता हा पुण्यातील प्रमुख व्यापारी मार्ग असल्याने आग लागल्याचे समजताच तिथे नागरिकांची मोठी गर्दी जमली होती. परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी आणि आजूबाजूच्या दुकानांना धोका निर्माण होऊ नये म्हणून अग्निशामक दलाचे पथक सतत सतर्कतेने काम करत आहे.

## महाराष्ट्रातील तरुणांना आंतरराष्ट्रीय स्तरावर रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणार

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस-पंडित दीनदयाल उपाध्याय महारोजगार मेळाव्याचा कोकण व नाशिक विभागात शुभारंभ




मुंबई (समर्थ गांवकरी)

देशाच्या युवा शक्तीला रोजगारक्षम बनविण्यासाठी शिक्षणासोबत कौशल्य विकास, प्रशिक्षण आणि रोजगार यांची सांगड घालणे आवश्यक आहे. केवळ पदवी मिळवणे पुरेसे नसून बदलत्या तंत्रज्ञानानुसार (एआय, सेमीकंडक्टर, क्वांटम कॉम्प्युटिंग) सातत्याने ‘अपस्किलिंग’ आणि कौशल्य आत्मसात करणे काळाची गरज आहे. जगात २८ हून अधिक देशांमध्ये मनुष्यबळाची मोठी मागणी असून, महाराष्ट्रातील तरुणांना आंतरराष्ट्रीय स्तरावर रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे. असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले.

श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी (एसएनडीटी) महिला विद्यापीठ येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत कौशल्य,रोजगार,उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या वतीने ‘पंडित दीनदयाल उपाध्याय महारोजगार मेळाव्याचा आज कोकण व नाशिक विभागातील सर्व जिल्ह्यात’ ऑनलाईन शुभारंभ करण्यात आला त्यावेळी ते बोलत होते. या कार्यक्रमाला कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत दादा पाटील, राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल, महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे, अपर मुख्य सचिव मनीषा वर्मा, श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठाच्या कुलगुरू प्रो. हेमलता बागला, रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ. अपूर्वा पालकर, महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटीचे मुख्य कार्यकारी अधिकारी तथा आयुक्त डॉ. अमित सैनी, मुंबई शहरच्या जिल्हाधिकारी आंचल गोयल, व्यवसाय व शिक्षण प्रशिक्षण संचालनालयाचे संचालक सतीश सुर्यवंशी, सृजन ट्रस्टचे अध्यक्ष दिपक मुकादम यासह विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी, राज्यभरातून ऑनलाईन व प्रत्यक्ष प्रणालीद्वारे हजारो विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्हिडीओ संदेशाव्दारे रोजगार मेळाव्याला शुभेच्छा दिल्या.

मुख्यमंत्री यांच्या हस्ते सहीदा परमाणिक यांना क्रेवा कॅपीटल सर्व्हिसेस प्रायवेट लिमीटेड बेलापूर व कांती शंभू चव्हाण यांना क्रेवा कॅपीटल सर्व्हिसेस प्रायवेट लिमीटेड, कुर्ला येथील या कपंनीकडून नियुक्तीपत्र देण्यात आले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाला २५ वर्षे पूर्ण झाल्याच्या पार्श्वभूमीवर ‘सेवा संकल्प अभियाना’अंतर्गत या रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. या मेळाव्याच्या माध्यमातून कोकण व नाशिक विभागातील तरुणांना जास्तीत जास्त रोजगार आणि स्वरोजगाराच्या संधी उपलब्ध होतील अशी आशा आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदींच्या संकल्पनेतील विकसित भारताचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी शिक्षण, प्रशिक्षण आणि रोजगार ही त्रिसूत्री अत्यंत महत्वाची आहे. पंडित दीनदयाल उपाध्याय यांनी मांडलेला ‘अंत्योदय’ आणि ‘एकात्म मानव दर्शन’ हा विचार समाजातील शेवटच्या घटकाचा विकास साधणारा आहे.याच विचारावर आधारित शासनाचे कामकाज सुरू आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, देशामध्ये शिक्षण, प्रशिक्षण आणि रोजगार मानव संसाधनाची निर्मिती हा सगळ्यात महत्वाचा विषय आहे, ज्याच्या आधारावर २०४७चा विकसित भारत आपण तयार करू शकणार आहोत. गरीबी मुक्त, बेरोजगारी मुक्त, रोगमुक्त भारत हे जे आपलं स्वप्न आहे. या स्वप्नाकडे जाण्याकरता खऱ्या अर्थानं शिक्षण, प्रशिक्षण आणि रोजगार या त्रिसूत्रीच्या आधारावर आपल्याला ही व्यवस्था उभी करायची आहे. आज देशातील ६५ टक्के लोकसंख्या ही कार्यक्षम युवाशक्ती आहे. एकीकडे उद्योजकांना कुशल मनुष्यबळाची गरज आहे, तर दुसरीकडे तरुणांना रोजगाराची आवश्यकता आहे.

## संक्षिप्त

### आशियाई स्पर्धेत इतिहास रचणाऱ्या नीरू धांडाची भावूक प्रतिक्रिया

ऐची–नागोया/नवी दिल्ली(समर्थ गांवकरी)

जपानमध्ये सुरू असलेल्या आशियाई क्रीडा (ॅळरप ऋाशी २०२६) स्पर्धेत महिलांच्या वैयक्तिक ट्रॅप शूटिंग प्रकारात भारताची स्टार नेमबाज नीरू धांडा हिने सुवर्णपदकाला गवसणी घालत ऐतिहासिक कामगिरी केली आहे. आशियाई क्रीडा स्पर्धेत या प्रकारात सुवर्णपदक पटकावणारी ती पहिलीच भारतीय महिला ठरली आहे. या ऐतिहासिक विजयानंतर अत्यंत भावूक झालेल्या २६ वर्षीय नीरूने आपले हे सुवर्णपदक आई आणि प्रशिक्षकांना समर्पित केले आहे.

### मुंबईच्या हॉटेलमध्ये मसाला डोशात मेलेला उंदीर, दोन घास घेताच...

मुंबई (समर्थ गांवकरी)

हॉटेल– रेस्टॉरंटमध्ये बऱ्याचदा अस्वच्छता, किळसवाण्या पद्धतीने जेवण बनवणं आणि अनेक स्वच्छतेचे नियम धाब्यावर बसवल्यामुळे सध्या एफडीएकडून महाराष्ट्रामध्ये कारवाई करण्यात येत आहे. मोठ्या प्रमाणावर दररोज एफडीएकडून हॉटेल– रेस्टॉरंट, बेकरी आणि दुकानांवर धडक कारवाई करत त्यांचे परवाने रद्द करत त्यांच्यावर कारवाई केली जात आहे. इतकं होत असतानाही मुंबईमध्ये एका हॉटेलमध्ये म्हैसूर मसाला डोसामध्ये मेलेला उंदीर आढळला आहे. मेलेला उंदीर दिसताच ग्राहकाने हॉटेल मालकाविरोधात संताप व्यक्त करत त्याच्यावर कारवाई करण्याची मागणी केली आहे.

### चेन्नईचा मास्टरस्ट्रोक
### आयपीएल फायनलमध्ये धोनीला बाद करणाऱ्या स्टारची CSK मध्ये एन्ट्री!

आयपीएल २०२७ स्पर्धेसाठी दहाही फ्रेंचायीझी आपल्या उणीवा दूर करून संघ बांधणीसाठी पुढाकार घेत आहेत. त्या दृष्टीने सर्व संघाचे प्रयत्न सुरू आहेत. असं असताना चेन्नई सुपर किंग्सने डाव टाकण्यास सुरूवात केली आहे. मागच्या तीन पर्वात चेन्नई सुपर किंग्सच्या पदरात निराशा पडली होती. त्यामुळे यंदा जेतेपदाचा मानस ठेवून संघात बदल केले जात आहेत.मागच्या पर्वापूर्वी ट्रेड विंडोच्या माध्यमातून संघात बदल केले होते. आता मिनी लिलावात काही खेळाडूंचा भरणा करण्याची शक्यता आहे. तत्पूर्वी कोचिंग स्टाफमध्ये बदल पाहायला मिळत आहे. चेन्नई सुपर किंग्सने संघाच्या मुख्य प्रशिक्षकपदी झहीर खान यांची नियुक्ती केली. आता नव्या गोलंदाज प्रशिक्षकांची संघात एन्ट्री झाली आहे. माजी वेगवान गोलंदाज मोहित शर्माकडे जबाबदारी सोपवली आहे. एका रिपोर्टनुसार, भारतीय क्रिकेट संघ आणि आयपीएलमध्ये चेन्नई सुपर किंग्ससाठी खेळलेल्या मोहित शर्माकडे आयपीएल २०२७ स्पर्धेसाठी जबाबदारी सोपवली आहे.चेन्नई सुपर किंग्सचे मुख्य कार्यकारी अधिकारी कासी विश्वनाथन यांच्या माहितीच्या आधारे हे वृत्त दिलं गेलं आहे. या वृत्तानुसार, फ्रेंचायझीने उजव्या हाताच्या वेगवान गोलंदाजाला गोलंदाजी प्रशिक्षकाची भूमिका सोपवली आहे. मुख्य प्रशिक्षक झहीर खान याने मोहितच्या नावाची शिफारस केली होती. त्यानंतर त्याची संघाच्या कोचिंग स्टाफमध्ये निवड केली आहे.

### भारतीय गोलंदाजाची आयसीसी क्रमवारीत मोठी झेप

भारतीय महिला संघाची स्टार फिरकीपटू श्री चरणी सध्या जबरदस्त फॉर्मात आहे.त्याचं फळंही तिला मिळताना दिसत आहे. आयसीसी टी२० आंतरराष्ट्रीय क्रमवारीत श्री चरणीने ऐतिहासिक नोंद केली आहे. आयसीसीने जारी केलेल्या क्रमवारीत तिने पहिलं स्थान पटकावलं आहे. पण यासह तिने आजवरचे सर्व विक्रमही मोडीत काढले आहेत. टी२० क्रमवारीत सर्वाधिक प्वाइंट्स मिळवणारी गोलंदाज ठरली आहे. श्री चरणीने ८१७ रेटिंग प्वॉइंटसह पहिलं स्थान पटकावलं आहे. आतापर्यंत टी२० क्रमवारीत मिळवलेले सर्वाधिक गुण आहेत. आतापर्यंत हा पल्ला कोणत्याही खेळाडूला गाठता आलेला नाही. इतकंच काय तर ऑस्ट्रेलियाची वेगवान गोलंदाजी मेगन शूट हीचा विक्रमही मोडीत काढला आहे.

# जिल्हा बँक निवडणुकीत ५३१ अर्जांची विक्री; बिनविरोधच्या प्रयत्नांना आव्हान!

## तनपुरे, हजारे मैदानात; राहुल जगतापांचा अर्ज दाखल; ५ ऑक्टोबरनंतर राजकीय चित्र स्पष्ट होणार!



: लेखन :
**डॉ. विश्वासराव आरोटे**
कळसुबाई शिखरावरून

अहिल्यानगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालक मंडळाच्या निवडणुकीची रणधुमाळी दिवसेंदिवस रंगत चालली असून, आजअखेर तब्बल ५३१ उमेदवारी अर्जांची विक्री झाली आहे. निवडणूक निर्णय अधिकारी तथा सहकारी संस्था निबंधक मंगेश सुरवसे यांनी ही माहिती दिली. पहिल्याच दिवशी ३६१ उमेदवारी अर्जांची विक्री झाल्यानंतर दुसऱ्या दिवशी हा आकडा ५३१ वर पोहोचल्याने बँकेची निवडणूक बिनविरोध करण्यासाठी सुरू असलेल्या राजकीय प्रयत्नांसमोर मोठे आव्हान उभे राहण्याची शक्यता व्यक्त होत आहे. बँकेच्या २१ संचालक पदांसाठी निवडणूक प्रक्रिया सुरू असून उमेदवारी अर्ज दाखल करण्याची अंतिम मुदत ५ ऑक्टोबर आहे. मतदान २ नोव्हेंबर रोजी, तर मतमोजणी ३ नोव्हेंबर रोजी होणार आहे.

आज राहुरी विधानसभा मतदारसंघातून आमदार प्राजक्त प्रसाद तनपुरे यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला, तर जामखेड मतदारसंघातील बिगरशेती मतदारसंघातून धनलक्ष्मी अजिनाथ हजारे यांनी अर्ज दाखल केला. त्यापूर्वी श्रीगोंदा मतदारसंघातून राहुल जगताप यांनी उमेदवारी अर्ज दाखल करून निवडणुकीच्या मैदानात प्रवेश केला आहे. त्यामुळे सुरुवातीपासूनच बिनविरोध निवडणुकीच्या दिशेने सुरू असलेल्या हालचालींना उमेदवारी अर्जांच्या वाढत्या संख्येमुळे वेगळे वळण मिळताना दिसत आहे. पहिल्याच दिवशी राहुल जगताप यांनी अर्ज दाखल केल्याने बिनविरोध निवडीच्या प्रयत्नांना धक्का बसल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू झाली होती.

विशेष म्हणजे ५ ऑक्टोबर हा उमेदवारी अर्ज दाखल करण्याचा शेवटचा दिवस असल्याने त्याच दिवशी जिल्हा बँकेच्या निवडणुकीतील खरे चित्र अधिक स्पष्ट होणार आहे. अनेक इच्छुकांनी नाम निर्देशनपत्रे नेऊन ठेवली असून, शेवटच्या टप्प्यात मोठ्या संख्येने अर्ज दाखल होण्याची शक्यता आहे. त्यानंतर छाननी, माघारी आणि अंतिम उमेदवारांची यादी यामुळे निवडणुकीचे समीकरण आणखी बदलणार आहे. त्यामुळे सध्या ५३१ अर्जांची विक्री झाली असली तरी प्रत्यक्षात किती उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात राहतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

**बिनविरोधसाठी नेत्यांची धावपळ; इच्छुकांची मात्र निवडणुकीची तयारी:**

अहिल्यानगर जिल्हा बँकेची निवडणूक बिनविरोध करण्यासाठी जिल्ह्यातील विविध राजकीय पक्षांचे प्रमुख नेते आणि सहकार क्षेत्रातील मान्यवरांच्या बैठका सुरू आहेत. दुष्काळी परिस्थिती, शेतकरी आणि सहकार क्षेत्रासमोरील अडचणी लक्षात घेऊन निवडणूक टाळावी, अशी भूमिका बैठकीत मांडण्यात आली आहे. संगमनेर येथे झालेल्या बैठकीत विविध राजकीय पक्षांचे नेते व लोकप्रतिनिधी सहभागी झाले होते.

मात्र दुसरीकडे उमेदवारी अर्जांची वाढती विक्री आणि काही इच्छुकांकडून प्रत्यक्ष अर्ज दाखल करण्यास सुरुवात झाल्यामुळे 'बिनविरोध की निवडणूक?' हा प्रश्न अधिकच महत्त्वाचा बनला आहे. इच्छुक उमेदवारांना माघार घेण्यासाठी आगामी काळात राजकीय पातळीवर मोठ्या प्रमाणात प्रयत्न होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. काही इच्छुक नेत्यांच्या भूमिकेकडे लक्ष ठेवून आहेत, तर काहींनी कोणत्याही परिस्थितीत निवडणूक लढविण्याची तयारी केल्याची चर्चा आहे.

**राम शिंदेंचा इशारा; 'सर्वांचा मान-सन्मान राखला तरच बिनविरोध'**

विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांनी जिल्हा बँकेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सर्वांना सोबत घेऊन निर्णय घेण्याची भूमिका मांडली आहे. व्यक्तिगत राजकीय हितापेक्षा सर्वांचा मान-सन्मान राखला गेला तरच बिनविरोध निवडणूक शक्य असल्याचे त्यांनी सूचित केले आहे. तसेच आत्मकेंद्री राजकारणामुळे बिनविरोध निवडणुकीचा मार्ग कठीण होऊ शकतो, अशी भूमिका त्यांनी मांडल्याचे वृत्त आहे.

याच पार्श्वभूमीवर 'आमच्या उमेदवारांना योग्य सन्मान मिळाला नाही तर योग्य विचार केला जाईल', अशी भूमिका प्रा. राम शिंदे यांनी घेतल्याची चर्चा आहे. त्यामुळे बिनविरोध निवडणुकीच्या प्रयत्नांमध्ये जागावाटप आणि प्रत्येक राजकीय गटाला मिळणारे प्रतिनिधित्व हा कळीचा मुद्दा ठरणार असल्याचे चित्र आहे.

**विखे-थोरात एकत्र; शिंदे-लंके-खताळ यांच्या अनुपस्थितीची चर्चा!**

जिल्हा बँक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर संगमनेर येथे झालेल्या बैठकीत विविध राजकीय नेते सहभागी झाले. मात्र प्रा. राम शिंदे आणि खासदार निलेश लंके या बैठकीला उपस्थित नव्हते, अशी नोंद विविध वृत्तांत करण्यात आली आहे. या बैठकीत बिनविरोध निवडणुकीबाबत सकारात्मक भूमिका मांडण्यात आली.

यामुळेच आता राजकीय वर्तुळात 'जिल्हा बँकेच्या निवडणुकीत शिंदे, लंके आणि आमदार अमोल खताळ यांना स्थान किती?', असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. संगमनेरमध्ये प्रमुख नेत्यांची बैठक झाली असताना या तिघांची अनुपस्थिती चर्चेचा विषय ठरली आहे. मात्र या अनुपस्थितीमागील कारणांबाबत अधिकृत स्पष्टीकरण समोर आलेले नाही. त्यामुळे यासंदर्भातील विविध राजकीय चर्चा सध्या केवळ चर्चेच्या पातळीवरच आहेत.

**जुने राजकीय विरोधक बँकेसाठी एकत्र; कार्यकर्त्यांमध्ये संभ्रम!**

जिल्हा बँकेची निवडणूक बिनविरोध करण्याच्या प्रयत्नांमध्ये परस्पर राजकीय विरोधक असलेले नेते एकत्र येताना दिसत आहेत. यामुळे स्थानिक पातळीवर कार्यकर्त्यांमध्येही विविध चर्चा सुरू झाल्या आहेत. काही वर्षे एकमेकांविरोधात राजकीय संघर्ष करणारे नेते सहकार क्षेत्रातील निवडणुकीत मात्र सामंजस्याची भूमिका घेत असल्याचे चित्र आहे.

यामुळे सर्वसामान्य कार्यकर्त्यांमध्येही 'राजकीय नेते एकत्र येऊ शकतात, मग निवडणुकीत कार्यकर्त्यांनी एकमेकांविरोधात संघर्ष का करावा?' असा सवाल चर्चिला जात असल्याचे चित्र आहे. मात्र अंतिम जागावाटप आणि उमेदवार निश्चित होईपर्यंत कोणता गट कोणती भूमिका घेतो, हे स्पष्ट होणार नाही.

**पाच ऑक्टोबरनंतर खरी रंगत; माघारीसाठी जोरदार हालचालींची शक्यता!**

आता जिल्हा बँकेच्या निवडणुकीचा खरा राजकीय रंग ५ ऑक्टोबरनंतर दिसण्याची शक्यता आहे. उमेदवारी अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर छाननी आणि माघारीच्या टप्प्यात कोण कोणाच्या बाजूने उभे राहतात, कोण माघार घेतात आणि कोण शेवटपर्यंत मैदानात राहतात, यावर निवडणुकीचे पुढील चित्र अवलंबून राहणार आहे.

एकीकडे बिनविरोध निवडणुकीसाठी राजकीय पातळीवर बैठकांचे सत्र सुरू आहे, तर दुसरीकडे ५३१ अर्जांची विक्री झाल्याने इच्छुकांची संख्या आणि निवडणूक लढण्याची तयारी मोठी असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे इच्छुक उमेदवारांची मनधरणी, जागावाटप आणि सर्वमान्य पॅनल तयार करण्यासाठी पुढील काही दिवस राजकीय नेत्यांसाठी अत्यंत महत्त्वाचे ठरणार आहेत.

**संगमनेर मध्ये ज्यावेळेस बैठक झाली त्यावेळेस या बैठकीला तुम्ही खासदार लंकेना बोलू नका तर दुसऱ्या गटाने तुम्ही आमदार अमोल खताळ व विधान परिषदेचे सभापती प्राध्यापक शिंदे यांना बोलू नका आपण काय करायचे ते करू आपण दिग्गज आहोत अशी चर्चा विश्वसनीय सूत्रांकडून समजते...**

दरम्यान, जिल्हा बँकेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर बँकेच्या आर्थिक स्थितीचाही मुद्दा चर्चेत आहे. नुकत्याच झालेल्या वार्षिक सभेत बँकेची कर्ज थकबाकी जून २०२६ अखेर ७,७२६.२८ कोटी रुपये असल्याची माहिती प्रशासकांकडून देण्यात आली असून, कर्जवसुलीचे प्रमाण ४५.४४ टक्के असल्याचे नमूद करण्यात आले. त्यामुळे आगामी संचालक मंडळासमोर बँकेची आर्थिक शिस्त, कर्जवसुली आणि शेतकरी हिताचे प्रश्न हेही महत्त्वाचे आव्हान राहणार आहेत.

आता ५ ऑक्टोबरपर्यंत किती अर्ज दाखल होतात, त्यातील किती अर्ज वैध ठरतात आणि माघारीनंतर प्रत्यक्ष किती उमेदवार मैदानात राहतात, यावरच अहिल्यानगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची निवडणूक बिनविरोध होते की प्रत्यक्ष मतदानाला सामोरी जाते, याचे चित्र स्पष्ट होईल.

## 'गावकरी'च्या वृत्ताचा धसका! संगमनेरमध्ये महावितरणच्या कंत्राटी कामगारांचे रखडलेले वेतन अदा; कामगारांना मोठा दिलासा

**संगमनेर (समर्थ गांवकरी)**

महावितरणच्या संगमनेर विभागांतर्गत कार्यरत असलेल्या कंत्राटी वीज कामगारांच्या रखडलेल्या वेतनाबाबत 'गावकरी'ने प्रसिद्ध केलेल्या बातमीची प्रशासनाने तातडीने दखल घेतली आहे. बातमी प्रसिद्ध होताच संबंधित यंत्रणांची धावपळ उडाली असून कंत्राटी कामगारांचे थकीत वेतन अखेर त्यांच्या खात्यात जमा करण्यात आले आहे. या कारवाईमुळे गेल्या अनेक दिवसांपासून आर्थिक अडचणींचा सामना करणाऱ्या शेकडो कामगारांना व त्यांच्या कुटुंबांना मोठा दिलासा मिळाला आहे.

**'गावकरी'च्या वृत्ताचा परिणाम**

वीज वितरण व्यवस्था चोख ठेवण्यासाठी ऊन, वारा, पाऊस आणि जिवाची पर्वा न करता अहोरात्र सेवा देणाऱ्या कंत्राटी कामगारांचे वेतन गेल्या काही महिन्यांपासून रखडले होते. या गंभीर समस्येवर 'गावकरी'ने वस्तुस्थितीदर्शक वृत्त प्रसिद्ध करून महावितरण प्रशासन आणि संबंधित कंत्राटदारांचे लक्ष वेधले होते. केवळ वेतनच नाही, तर कामगारांचा भविष्य निर्वाह निधी (PF) आणि कर्मचाऱ्यांचा राज्य विमा (ESIC) वेळेवर न भरल्यामुळे निर्माण झालेल्या प्रश्नांवरही या वृत्तातून प्रकाश टाकण्यात आला होता. या बातमीचा जोरदार इम्पॅक्ट होऊन प्रशासनाने तातडीने सूत्रे हलवली आणि कामगारांचे थकीत वेतन अदा केले.

**दैनंदिन संसाराचे गाडे चालवणे झाले होते कठीण**

कंत्राटी कामगारांचे घरभाडे, मुलांच्या शाळेची फी, औषधोपचार आणि दैनंदिन किराणा खर्च पूर्णपणे या वेतनावरच अवलंबून असतो. दरमहा वेळेवर वेतन न मिळाल्यामुळे कामगारांवर उसनवारी करण्याची वेळ आली होती. महावितरणची आव्हानात्मक कामे करूनही हक्काच्या पैशांसाठी कामगारांना वणवण भटकावे लागत होते. अखेर वेतनाचा टप्पा पूर्ण झाल्याने कामगारांच्या चेहऱ्यावर समाधान दिसून येत आहे.

**कामगारांनी मानले 'गावकरी'चे आभार**

आपल्या न्याय्य हक्कासाठी आवाज उठवून प्रशासनाला जागे केल्याबद्दल कंत्राटी कामगारांनी 'गावकरी'चे मनःपूर्वक आभार मानले आहेत. आमचा गंभीर प्रश्न माध्यमांनी धसास लावला. 'गावकरी'ने आमची व्यथा मांडल्यामुळेच प्रशासनाने तातडीने पावले उचलली आणि थकीत वेतन मिळाले, अशी भावना महाराष्ट्र वीज कंत्राटी कामगार महासंघाचे प्रदेशाध्यक्ष निलेश खरात यांनी व्यक्त केली.

**वैधानिक मागण्यांसाठी उद्या 'धरणे आंदोलन'**

वेतन अदा झाले असले तरी दरमहा वेळेवर वेतन मिळणे, PF व ESIC ची थकबाकी नियमित जमा करणे आणि इतर प्रलंबित वैधानिक मागण्यांची पूर्तता व्हावी, यासाठी कंत्राटी कामगार आपल्या भूमिकेवर ठाम आहेत. या प्रलंबित मागण्यांकडे प्रशासनाचे कायमस्वरूपी लक्ष वेधण्यासाठी व अपघात अपघातग्रस्त कंत्राटी वीज कर्मचारी वैभव देशमुख याला वैद्यकीय मदत व नुकसान भरपाई मिळावी म्हणून बुधवार, दिनांक ३० सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजता महावितरणच्या संगमनेर विभागीय कार्यालयासमोर कंत्राटी कामगारांच्या वतीने भव्य धरणे आंदोलनाचे आयोजन करण्यात आले आहे. या आंदोलनात विभागातील सर्व कंत्राटी कामगार मोठ्या संख्येने सहभागी होणार आहेत.

## पारनेरमध्ये बैलपोळा मिरवणुकीत 'भावी नगराध्यक्ष'च्या घोषणा; युवराज पठारे समर्थकांचा उत्साह

### पारनेर शहरात पै. युवराज पठारे यांच्या वतीने भव्य बैलपोळा महोत्सव उत्साहात

**पारनेर (समर्थ गांवकरी)**

पारनेर नगरपंचायतीचे नगरसेवक पै. युवराज पठारे यांच्या वतीने पारनेर शहरात भव्य बैलपोळा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. पारंपरिक बैलपोळा सणाचे महत्त्व जपत धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांसह बैलजोडीची भव्य मिरवणूक काढण्यात आली. यावेळी नागरिकांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला.

बैलपोळा महोत्सवाच्या निमित्ताने पारनेर शहरातून निघालेल्या मिरवणुकीत युवकांचा उत्स्फूर्त सहभाग पाहायला मिळाला. यावेळी नगरसेवक पै. युवराज पठारे यांच्या नावाने 'भावी नगराध्यक्ष' अशा घोषणा देण्यात आल्या. आगामी काळात पारनेर नगरपंचायतीची निवडणूक होणार असल्याने या घोषणांनी राजकीय चर्चेला उधाण आले. युवकांचा वाढता सहभाग आणि नागरिकांचा उत्साह लक्षवेधी ठरला.

रविवार, दि. २७ सप्टेंबर २०२६ रोजी सायंकाळी ४ ते ७ या वेळेत या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. महाराष्ट्र आणि कर्नाटक राज्यात विविध बैलगाडा शर्यती व प्रदर्शनांमध्ये तब्बल ३६ वेळा प्रथम क्रमांक पटकावलेल्या, २२ महिन्यांच्या व दोन दाती असलेल्या बैलजोडीचे विशेष आकर्षण मिरवणुकीत होते. या बैलजोडीची किंमत तब्बल ६ लाख ५१ हजार रुपये असल्याने नागरिकांमध्ये या जोडीबाबत विशेष उत्सुकता होती.

पारंपरिक पद्धतीने बैलांची पूजा करून त्यांना सजविण्यात आले. त्यानंतर ढोल-ताशांच्या गजरात व उत्साहपूर्ण वातावरणात बैलजोडीची पारनेर शहरातून भव्य मिरवणूक काढण्यात आली. मिरवणुकीदरम्यान नागरिकांनी बैलजोडीचे कौतुक केले. पारंपरिक शेती संस्कृतीचा अविभाज्य भाग असलेल्या बैलपोळा सणाचे महत्त्व नव्या पिढीपर्यंत पोहोचावे, तसेच ग्रामीण संस्कृती आणि परंपरांचे जतन व्हावे, या उद्देशाने पै. युवराज पठारे यांनी या महोत्सवाचे आयोजन केले.

बैलपोळा हा शेतकरी आणि बैल यांच्यातील नात्याचा सन्मान करणारा सण म्हणून ग्रामीण भागात मोठ्या श्रद्धेने साजरा केला जातो. वर्षभर शेतीच्या कामात शेतकऱ्याला साथ देणाऱ्या बैलांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याची परंपरा या सणामागे आहे. पारनेर शहरात आयोजित करण्यात आलेल्या या महोत्सवामुळे पारंपरिक संस्कृतीचा जागर झाला.

या बैलपोळा महोत्सवा दरम्यान रिल्स स्पर्धा सुद्धा ठेवण्यात आल्या होत्या अनेक इंस्टाग्राम रिल्स स्पर्धक सहभागी झाले होते त्यांच्यावर सुद्धा नगरसेवक पठारे यांच्या मित्र परिवाराच्या वतीने बक्षीसांचा वर्षाव करण्यात आला.



या कार्यक्रमाला आमदार काशिनाथ दाते, ज्येष्ठ व्यक्तिमत्त्व कुंडलिक पठारे, युवा नेते मंगेश दाते, शिवसेना (उबाठा) तालुकाध्यक्ष डॉ. श्रीकांत पठारे, जिल्हा परिषदेचे माजी सदस्य वसंत चेडे, माजी नगराध्यक्ष नितीन अडसूळ, शिवसेना तालुका प्रमुख अरुणराव ठाणगे, ज्येष्ठ नेते बाळासाहेब पठारे, सुपा गावचे माजी उपसरपंच दत्तानाना पवार, भाजप युवा मोर्चा तालुकाध्यक्ष मनोज मुंगसे, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष अर्जुन भालेकर, पाणीपुरवठा समितीचे सभापती योगेश मते, प्रगतिशील शेतकरी विकास रोकडे, राष्ट्रवादी युवक काँग्रेस पार्टीचे तालुका कार्याध्यक्ष सुभाष सासवडे, सतीश पिंपरकर, माजी उपसरपंच दत्ता दिवटे, निवृत्ती वरखडे, किरण कोकाटे, ऋषिकेश गंधाडे, यशवंत पठारे, प्रवीण पठारे, प्रदीप नगरे, प्रसाद कर्णावट आदी उपस्थित होते. सूत्रसंचालक लहू साबळे यांनी संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

## दुष्काळाच्या संकटात आमदार काशिनाथ दाते सर शेतकऱ्यांच्या बांधावर ; सरसकट पंचनाम्यांचे आदेश

**मतदारसंघातील एकही शेतकरी शासकीय मदतीपासून वंचित राहणार नाही; सर्वांनी सबुरीने घ्यावे : आमदार काशिनाथ दाते**



**पारनेर (समर्थ गांवकरी)**

सोमवार दि. २८ सप्टेंबर २०२६ खरीप हंगाम २०२६ मध्ये निर्माण झालेल्या दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते सर यांनी आज शासकीय अधिकाऱ्यांसह तालुक्यातील दुष्काळग्रस्त भागाची प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी वडनेर हवेली व पारनेर येथील शेतशिवारात पाहणी करून शेतकऱ्यांशी संवाद साधण्यात आला.

शासनाने दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर २६५ तालुक्यांमध्ये ढीळससशी-१ लागू करून पंचनाम्याची कार्यवाही करण्याचे निर्देश दिल्याच्या अनुषंगाने करण्यात आलेल्या या पाहणीदरम्यान शेतकरी प्रतिनिधींनी आपल्या व्यथा आमदार दाते सर यांच्यासमोर मांडल्या. सोयाबीनसारख्या पिकाची पेरणी करण्यासाठी एकरी दहा हजार रुपयांपेक्षा अधिक खर्च, वाढता मजुरीचा दर, वाढता उत्पादन खर्च आणि त्यातच पिकांची झालेली निराशाजनक अवस्था यामुळे शेतकरी आर्थिकदृष्ट्या मोठ्या अडचणीत सापडल्याचे त्यांनी सांगितले.

पिकासाठी केलेला खर्चही निघण्याची शाश्वती नसताना नैसर्गिक संकटाने शेतकऱ्यांसमोर मोठे आव्हान उभे केले आहे.

या परिस्थितीत केवळ पंचनामे होणे पुरेसे नसून पंचनामे वस्तुनिष्ठ, पारदर्शक आणि प्रत्यक्ष नुकसानीचे प्रतिबिंब दाखवणारे असणे आवश्यक आहे, अशी अपेक्षा शेतकरी प्रतिनिधींनी व्यक्त केली.

शासनाने २६५ तालुक्यांमध्ये पंचनाम्याची प्रक्रिया सुरू करण्याचे निर्देश दिले असून पिकांची प्रत्यक्ष स्थिती, छायाचित्रे आणि आवश्यक माहितीच्या आधारे अहवाल सादर करण्याची कार्यवाही अपेक्षित आहे.

यावेळी बोलताना आमदार काशिनाथ दाते सर यांनी सर्वप्रथम महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार यांच्यासह राज्य सरकारचे अभिनंदन केले.

दुष्काळी परिस्थितीचे गांभीर्य ओळखून शासनाने वेळीच उपाययोजनांची पावले उचलली असून त्यानुसार अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील आणि जिल्हा प्रशासनाने संबंधित यंत्रणेला आवश्यक निर्देश दिल्याचे त्यांनी सांगितले.

आमदार दाते सर म्हणाले, काल आदेश मिळताच आज संबंधित अधिकारी शेतकऱ्यांच्या बांधावर पोहोचले आहेत. त्यामुळे त्यांच्या कार्यतत्परतेवर शंका घेण्याचे अजिबात कारण नाही. संपूर्ण मतदारसंघातील सर्व शेतकऱ्यांचे पंचनामे केले जातील. मात्र एक-दोन दिवस पंचनाम्याच्या प्रक्रियेत मागेपुढे झाले, तर शेतकऱ्यांनी प्रशासनाच्या प्रत्यक्ष कामकाजातील मर्यादा समजून घेऊन सहकार्य करावे.

**जाहीर नोटीस**

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी अकोले यांचे कार्यालय ता. अकोले, जि. अहिल्यानगर यांचे न्यायालयात...**

क्र.कावि/जन्म/मृत्यु नोंद/३९/२०२६ अकोले दि. २९/०९/२०२६

तमांम नागरिकांस कळविण्यात येते की, ज्याअर्थी अर्जदार **श्री. अमोल रामनाथ आगिवले, रा. उंचखडक बु,** ता. अकोले, जि. अहिल्यानगर यांनी जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ कलम १३(३) अन्वये **अर्जदार यांचे चुलते कै. तुळशीराम शंकर आगिवले यांचा मृत्यू दि. ३०/०५/२०२५** रोजी **मौज उंचखडक बु.** येथे झाला असुन त्यांच्या **चुलत्यांच्या** मृत्यूची नोंद **ग्रामपंचायत कार्यालय उंचखडक बु.**, ता.अकोले यांचे जन्म-मृत्यु रजिस्टरला नोंद आदेश होणेकामीचा अर्ज मे तहसिल कार्यालय येथे दाखल केला आहे.

तरी **श्री. अमोल रामनाथ आगिवले, रा. उंचखडक बु,** ता.अकोले जि.अहिल्यानगर **अर्जदार यांचे चुलते कै. तुळशीराम शंकर आगिवले यांचा मृत्यू दि. ३०/०५/२०२५** रोजी **मौज उंचखडक बु.** येथे झाला असल्याची नोंद **ग्रामपंचायत कार्यालय उंचखडक बु,** ता. अकोले येथे मृत्यूची नोंद होण्याबाबत कोणाची काही हरकत अगर तक्रार असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाचे आत योग्य त्या कागदपत्राच्या पुराव्यांसह हरकत मे. कोर्टासमोर हजर होऊन पुराव्या निशी दाखल करावी अन्यथा सदर मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत प्राप्त न झाल्यास सदर मृत्यूची नोंद करण्यास कोणाचीही हरकत नाही, असे समजुन मे. न्यायालय पुढील योग्य तो आदेश पारीत करण्यात येईल. तदनंतर कोणाचीही कोणतीही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

आज दि. २९/०९/२०२६ रोजी सही व शिक्क्यानिशी दिले असे.

**हुकूमावरुन,**
**कामगिरी क्लर्क** **तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अकोले**

**महाराष्ट्र शासन**
**जलसंपदा विभाग**
**कार्यकारी अभियंता, अहिल्यानगर पाटबंधारे विभाग,**
**अहिल्यानगर (मुख्यालय लोणी)** **पत्ता - सिंचन भवन, फकीरवाडा, अहिल्यानगर**
ई-मेल पत्ता - eeaidn@gmail.com दुरध्वनी क्रमांक - ०२४१-२३२४०१८

**ई-निविदा सूचना क्र. ०७ सन २०२६-२७**

महाराष्ट्र राज्याच्या राज्यपालांच्या वतीने कार्यकारी अभियंता, अहिल्यानगर पाटबंधारे विभाग, अहिल्यानगर, (मुख्यालय लोणी) जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन हे सक्षम कंत्राटदारांकडून (गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळाकडून मान्यताप्राप्त सूचीबद्ध (Empanelment) केलेले केवळ १३ निविदाकार) खालील कामांकरिता ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाचे संकेतस्थळ https://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावीत. सविस्तर निविदा सूचना व ई निविदेबाबत सर्व माहिती शासनाच्या संकेतस्थळावर व विभागीय कार्यालयाच्या सूचना फलकावर उपलब्ध आहे.

निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, अहिल्यानगर पाटबंधारे विभाग, अहिल्यानगर (मुख्यालय लोणी) यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्वीकारली जाणार नाही. सदर निविदा सूचनेमध्ये काही बदल होत असल्यास https://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर कळविण्यात येईल.

| अ. क्र. | कामाचे नाव | निविदेची किंमत (जीएसटी वगळून) |
|---|---|---|
| १ | को.प.बंधारा मांडवे ता.संगमनेर येथील दुरुस्ती करणे | रु. ४१.०५ लक्ष |
| २ | को.प.बंधारा पाचेगाव ता.नेवासा येथील दुरुस्ती करणे. | रु. ४९.९९ लक्ष |
| ३ | को.प.बंधारा पुनतगाव ता.नेवासा येथील दुरुस्ती करणे. | रु. ५३.७५ लक्ष |
| ४ | को.प.बंधारा भेडापूर ता.श्रीरामपूर येथील दुरुस्ती करणे. | रु. २९.४३ लक्ष |
| ५ | को.प.बंधारा मालूंजे ता.श्रीरामपूर येथील दुरुस्ती करणे. | रु. ५८.९९ लक्ष |
| ६ | को.प.बंधारा आश्वी ता.संगमनेर उजव्या बाजूच्या पोहोच रस्त्याची दुरुस्ती करणे. | रु. २४.५० लक्ष |
| ७ | को.प.बंधारा गळनिंब ता.श्रीरामपूर डाव्या बाजूच्या पोहोच रस्त्याचे मजबुतीकरण करणे. | रु. ४०.५९ लक्ष |
| ८ | को.प.बंधारा मांडवे ता.श्रीरामपूर डाव्या बाजूच्या पोहोच रस्त्याचे मजबुतीकरण करणे. | रु. १६.२९ लक्ष |
| ९ | को.प.बंधारा वांगी ता.श्रीरामपूर येथील दुरुस्ती करणे. | रु. ३३.६० लक्ष |

जिल्हा - अहिल्यानगर * ई - निविदा उपलब्ध कालावधी - दि. ३०/०९/२०२६ ते दि. ०७/१०/२०२६ अखेर
* ई - निविदा उघडणे - दि. ०८/१०/२०२६ (शक्य झाल्यास)

जा.क्र. अपावि/लेखा-२/५९७/सन २०२६
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय
अहिल्यानगर पाटबंधारे विभाग अहिल्यानगर

**कार्यकारी अभियंता**
अहिल्यानगर पाटबंधारे विभाग
अहिल्यानगर(मुख्यालय लोणी)

**आरओसी-२०२६-२७/क्र.५/सी३०२७**

# जिल्हा बँकेच्या सभेत डॉ. विश्वासराव आरोटे यांच्या विविध मागण्या!

## जिल्ह्यातील सर्व मजूर संस्थांना कॅश क्रेडिट सुविधा, शाखांमध्ये क्यू सिस्टम व ग्राहकसेवेत सुधारणा करण्याची मागणी!

अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)

अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या ६९व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत दैनिक समर्थ गांवकरीचे संपादक तथा महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सचिव डॉ. विश्वासराव आरोटे यांनी सभासद, ग्राहक, शेतकरी आणि सहकारी संस्थांच्या विविध प्रश्नांकडे बँक प्रशासनाचे लक्ष वेधले. जिल्हा बँकेच्या माध्यमातून सर्वसामान्य ग्राहकांना अधिक तत्पर सेवा मिळावी, तसेच सहकार क्षेत्रातील संस्थांना आर्थिक बळ मिळावे, यासाठी त्यांनी विविध मागण्या मांडल्या.

डॉ. आरोटे यांनी जिल्ह्यातील सर्व मजूर संस्थांना जिल्हा बँकेने कॅश क्रेडिट सुविधा सुरू करावी, अशी मागणी केली. मजूर संस्थांना विविध विकासकामे व कंत्राटी कामे करताना आर्थिक व्यवहारासाठी भांडवलाची आवश्यकता असते. अशा संस्थांना जिल्हा बँकेच्या माध्यमातून कॅश क्रेडिटची सुविधा उपलब्ध झाल्यास त्यांच्या कामकाजाला चालना मिळून संस्थांच्या सभासदांनाही त्याचा फायदा होऊ शकतो. त्यामुळे केवळ एखाद्या संस्थेपुरती मर्यादित न ठेवता जिल्ह्यातील पात्र सर्व मजूर संस्थांना ही सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत बँक प्रशासनाने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी त्यांनी केली.

जिल्हा बँकेच्या चौदा तालुक्यांमध्ये शाखांचे मोठे जाळे असून या शाखांमध्ये दररोज मोठ्या संख्येने ग्राहक, ठेवीदार आणि शेतकरी व्यवहारासाठी येतात. बँकेच्या कार्यालयीन वेळेत कर्मचाऱ्यांनी मोबाईलचा अनावश्यक वापर टाळून ग्राहकसेवेला प्राधान्य द्यावे, अशी मागणीही डॉ. आरोटे यांनी केली. ग्राहक बँकेत आल्यानंतर त्यांचे काम वेळेत आणि सन्मानपूर्वक झाले पाहिजे. काही ठिकाणी कर्मचारी मोबाईलमध्ये व्यस्त असल्याने ग्राहकांच्या कामाकडे दुर्लक्ष होत असल्याच्या तक्रारी असल्याचे त्यांनी सभेच्या निदर्शनास आणून दिले.

तसेच जिल्हा बँकेच्या प्रत्येक शाखेत क्यू सिस्टम सुरू करावी, अशी मागणी त्यांनी केली. अनेक शाखांमध्ये ग्राहकांची गर्दी होत असल्याने कामकाजात शिस्त आणि पारदर्शकता राहण्यासाठी क्यू सिस्टम उपयुक्त ठरू शकते. त्यामुळे कोणत्या ग्राहकाचे काम आधी करायचे, याबाबत स्पष्टता राहून ग्राहकांना व्यवस्थित आणि समान पद्धतीने सेवा मिळण्यास मदत होईल, असे डॉ. आरोटे यांनी सांगितले.

कंत्राटी पद्धतीने काम करणाऱ्या काही कर्मचाऱ्यांना बँकिंग कामकाजाचा पुरेसा अनुभव किंवा प्रशिक्षण नसल्यास ग्राहकसेवेत अडचणी निर्माण होऊ शकतात. त्यामुळे अशा कर्मचाऱ्यांना आवश्यक प्रशिक्षण देण्यात यावे, त्यांच्या कामाची जबाबदारी निश्चित करण्यात यावी आणि महत्त्वाच्या आर्थिक व्यवहारांसाठी अनुभवी व प्रशिक्षित कर्मचाऱ्यांची नियुक्ती करावी, अशी मागणीही त्यांनी केली.

अकोले शाखेतील युवा शाखाधिकारी शांताराम धुमाळ यांच्या कामाचे कौतुक:

अकोले शाखेचा उल्लेख करताना डॉ. आरोटे यांनी शाखाधिकारी शांताराम धुमाळ हे युवा शाखाधिकारी असून ते चांगल्या पद्धतीने काम करत असल्याचे सांगत त्यांच्या कार्याचे कौतुक केले. मात्र काही शाखांमध्ये ग्राहकांना अपेक्षित प्रतिसाद आणि योग्य सेवा मिळत नसल्याच्या तक्रारी असल्याचे त्यांनी सांगितले. याबाबत त्यांनी बँक प्रशासनाला पत्रही दिले असून, संबंधित शाखांच्या कामकाजाची पाहणी करून ग्राहकांच्या तक्रारींचे निराकरण करावे, अशी मागणी केली.

आम्ही देणारे पत्रकार आहोत, घेणारे पत्रकार नाही, अशी भूमिका मांडत पत्रकार म्हणून सर्वसामान्य ग्राहक आणि समाजाच्या प्रश्नांकडे प्रशासनाचे लक्ष वेधणे हे आपले कर्तव्य असल्याचे डॉ. आरोटे यांनी स्पष्ट केले. बँकेच्या शाखांमध्ये सर्वसामान्य ग्राहकांना सन्मानपूर्वक, पारदर्शक आणि तत्पर सेवा मिळावी, यासाठी आवश्यक सुधारणा करण्याची मागणी त्यांनी केली.

दरम्यान, सध्या दुष्काळी परिस्थितीमुळे शेतकरी आर्थिक अडचणींचा सामना करत आहेत. या पार्श्वभूमीवर बँकेच्या कर्मचाऱ्यांच्या बोनसचा विषयही सभेत चर्चेला यायला हवा होता, असे डॉ. आरोटे यांनी नमूद केले. कर्मचाऱ्यांनी सामाजिक बांधिलकी दाखवत बोनस न घेण्याचा निर्णय घेतला आणि हा निधी दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांच्या मदतीसाठी, विशेषतः पशुधनाच्या संगोपनासाठी वापरण्याचा निर्णय घेतला तर तो महत्त्वपूर्ण सामाजिक उपक्रम ठरेल, अशी भूमिका त्यांनी मांडली.

आपल्या मागणीचा सकारात्मक विचार करून दुष्काळग्रस्त शेतकरी आणि त्यांच्या पशुधनासाठी मदतीची भूमिका घ्यावी, अशी विनंती डॉ. विश्वासराव आरोटे यांनी केली. जिल्हा बँक ही शेतकरी आणि सहकार क्षेत्राशी जोडलेली महत्त्वाची आर्थिक संस्था असल्याने संकटकाळात शेतकऱ्यांच्या पाठीशी उभे राहण्यासाठी बँकेने सामाजिक बांधिलकीची भूमिका घ्यावी, असेही त्यांनी सांगितले.

डॉ. विश्वासराव आरोटे यांनी सभेत मांडलेल्या मागण्यांमध्ये जिल्ह्यातील सर्व मजूर संस्थांना कॅश क्रेडिट सुविधा, प्रत्येक शाखेत क्यू सिस्टम, ग्राहकसेवेत सुधारणा, कर्मचाऱ्यांना आवश्यक प्रशिक्षण तसेच दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना मदतीचा समावेश होता. या मागण्यांमुळे जिल्हा बँकेच्या ग्राहकसेवा आणि सहकार क्षेत्राशी संबंधित विविध प्रश्नांकडे प्रशासनाचे लक्ष वेधले गेले.



मा.श्री.विश्वासजी आरोटे

## थोडक्यात पण महत्त्वाचे

### अंगारकीनिमित्त वडगाव काशिंबेगला भाविकांची गर्दी



मंचर (समर्थ गांवकरी)

अर्धपीठ गणपती तीर्थक्षेत्र असलेल्या श्री क्षेत्र वडगाव काशिंबेग येथील श्री स्वयंभू मोरया अर्धपीठ गणपती देवस्थानात अंगारकी चतुर्थीनिमित्त मंगळवार दि.२९ रोजी विविध धार्मिक कार्यक्रम उत्साहात पार पडले. दिवसभर भाविकांनी दर्शनासाठी गर्दी केली होती.'गणपती बाप्पा मोरया'च्या जयघोषाने मंदिर परिसर दुमदुमून गेला.

पहाटे पुजारी जगदीश जोशी व किशोर अत्रे यांच्या हस्ते महापूजा करण्यात आली. त्यानंतर २१ जोडप्यांच्या हस्ते गणेशमूर्तीचा अभिषेक करण्यात आला. सकाळी सात वाजता आरती झाल्यानंतर मंदिर भाविकांसाठी खुले करण्यात आले.सकाळी आठ वाजता मंचर येथील श्री विठ्ठल-रुक्मिणी पारायण मंडळाच्या वारकऱ्यांनी पारायण व हरिजागर केला. दुपारी गणेशयाग, तर तीन वाजता आरती झाली. पेशवेकालीन अर्धपीठ गणपती मंदिराची उद्योजक शामभाऊ गुंजाळ यांच्या वतीने फुलांनी आकर्षक सजावट करण्यात आली.नरेंद्र पापा घुले यांच्या वतीने पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात आली.उद्योजक प्रमोद बाणखेले, पप्पूशेठ थोरात, दत्ता जाधव, ओंकार गावडे, प्रमोद लोणकर, स्वाती वाघ, केतन शहा व सुमित लांडे यांच्या वतीने दिवसभर खिचडी व फराळाचे वाटप करण्यात आले.पितृपंधरवडा असल्याने यंदा गर्दी काहीशी कमी होती.सायंकाळी सात वाजता मुख्य आरती व चंद्रोदयानंतर नैवेद्य दाखविण्यात आला.रात्री श्री भैरवनाथ प्रासादिक भजनी मंडळ, साकोरे यांच्या वतीने भजनाचा कार्यक्रम झाला.देवस्थान ट्रस्टने भाविकांसाठी विविध व्यवस्था केली होती.

### कोरठण खंडोबा मंदिरावरील सुवर्ण कळसाला तडा गेलेला नाही

**३० वर्षांपूर्वीच्या कारागिराकडून निर्वाळा**

पारनेर (समर्थ गांवकरी)

लाखो भाविकांच्या श्रद्धेचे केंद्र आणि राज्यस्तरीय 'ब' वर्ग तीर्थक्षेत्र असलेल्या श्री क्षेत्र कोरठण खंडोबा देवस्थानच्या मुख्य सुवर्ण कळसाला तडा गेल्याची अफवा पसरली होती. मात्र, ३० वर्षांपूर्वी हे कळसशिखर बांधणारे कारागीर राजू ज्ञानेश्वर जाधव यांनी स्वतः पाहणी करून कळसाला तडा गेलेला नसल्याचा निर्वाळा दिला आहे. देवस्थानच्या विश्वस्तांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे ही माहिती दिली. सोमवार दि. २१ सप्टेंबरच्या रात्री विज कोसळून कळसाला तडा गेल्याची आणि इतर नुकसान झाल्याची बातमी तसेच फोटो सोशल मीडिया आणि प्रसारमाध्यमांतून पसरले. या बातमीने लाखो भाविक, देणगीदार, ग्रामस्थ आणि कळस बांधकामात सहभागी झालेल्या कारागिरांना मोठा धक्का बसला. देवस्थानच्या इतिहासातील ही पहिलीच अशी घटना असल्याने शेकडो भाविकांनी विश्वस्तांकडे विचारणा सुरू केली होती. सुवर्ण कळस आणि कळसशिखर बांधकामासाठी लाखो भाविक व देणगीदारांनी मोठ्या प्रमाणात दान दिले असल्याने ही बातमी अधिकच संवेदनशील ठरली होती. या पार्श्वभूमीवर देवस्थान विश्वस्तांच्या विनंतीनुसार, १९९३-९४ ते १९९७ दरम्यान कळसशिखराचे नवीन बांधकाम करणारे कारागीर राजू ज्ञानेश्वर जाधव (रा. आळे, ता. जुन्नर) यांनी रविवार दि. २८ सप्टेंबर रोजी देवस्थानला भेट दिली. त्यांनी मुख्य सुवर्ण कळसाचे बारकाईने निरीक्षण केले आणि कळसाला तडा गेलेला नसल्याचे स्पष्टपणे सांगितले.

जाधव यांनी सांगितले की, त्यांचे वडील कै. ज्ञानेश्वर रघुनाथ जाधव (माऊली) आणि स्वतः त्यांनी हे कळसशिखर बांधले. ग्रामस्थांनी श्रमदान करून घाणी तयार केल्या आणि चुना मळून दिला.

## मध-मेणातून सौंदर्यप्रसाधने; विद्यार्थ्यांच्या हाताला उद्योजकतेचे बळ!

पारनेर (समर्थ गांवकरी)

■ **पारनेर महाविद्यालयात नैसर्गिक सौंदर्यप्रसाधन निर्मितीची प्रात्यक्षिक कार्यशाळा..'शिका, तयार करा आणि व्यवसाय उभा करा'चा संदेश**

नोकरीच्या संधींच्या शोधात धावण्यापेक्षा स्वतःच्या कौशल्यातून रोजगार निर्माण करण्याची दिशा विद्यार्थ्यांनी स्वीकारावी, यासाठी पारनेर महाविद्यालयात अनोख्या पद्धतीने उद्योजकतेचे धडे देण्यात आले. मधमाशीपासून मिळणारा मध, मेण तसेच नैसर्गिक घटकांचा वापर करून विद्यार्थ्यांनी स्वतःच्या हाताने हर्बल साबण, शॅम्पू, काजळ, स्क्रब, उटणे, लिपस्टिक व लिप बाम तयार केले. मधमाशीपालन केवळ मध काढण्यापुरते मर्यादित न ठेवता मूल्यवर्धित उत्पादनांच्या माध्यमातून स्वयंरोजगाराच्या अमर्याद संधी निर्माण करता येतात, असे 'हनीबीज अँड सॉईल केअर फाउंडेशन, इंडिया'चे संस्थापक ऋषिकेश औताडे यांनी सांगितले.

पारनेर येथील न्यू आर्टस्, कॉमर्स अँड सायन्स महाविद्यालयाच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त प्राणीशास्त्र विभाग, गोदागिरी फार्म आणि हनीबीज अँड सॉईल केअर फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने 'मधमाशीचे मध व मेण आणि नैसर्गिक घटकांपासून सौंदर्यप्रसाधन निर्मिती' या विषयावर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ऋषिकेश औताडे व रुपाली औताडे यांनी विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष कृतीतून प्रशिक्षण दिले.

कार्यशाळेत केवळ व्याख्यान न देता विद्यार्थ्यांना कच्च्या मालाची निवड, घटकांचे प्रमाण, मिश्रण प्रक्रिया, उत्पादन निर्मिती, पॅकेजिंग आणि बाजारपेठेतील व्यावसायिक शक्यता याची माहिती देण्यात आली. त्यामुळे प्रयोगशाळेतील ज्ञानाला प्रत्यक्ष उत्पादन निर्मितीची जोड मिळाली.



कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी प्राचार्य डॉ. रंगनाथ आहेर यांनी मधमाशीला निसर्गातील 'कल्पप्राणी' संबोधत तिच्यापासून मिळणाऱ्या विविध पदार्थांचे मूल्यवर्धन करून त्यांना बाजारपेठेशी जोडण्याची गरज व्यक्त केली. नैसर्गिक घटकांपासून तयार होणाऱ्या सौंदर्यप्रसाधनांना वाढती मागणी असून विद्यार्थ्यांनी या क्षेत्राकडे व्यवसायाच्या संधी म्हणून पाहावे, असे त्यांनी सांगितले.

प्राणीशास्त्र विभागप्रमुख डॉ. सुधीर वाघ यांनी ज्ञानातून कौशल्य आणि कौशल्यातून उद्योजकता हे कार्यशाळेचे प्रमुख सूत्र असल्याचे सांगितले. तर प्रास्ताविकात प्रा. महेश आहेर यांनी मधुमक्षिकापालन, गांडूळखत यांसारख्या शेतीपूरक व्यवसायांकडे तरुणांनी केवळ पूरक उत्पन्नाचे साधन म्हणून नव्हे, तर उद्योजकतेच्या दृष्टिकोनातून पाहावे, असे आवाहन केले.

## रेबीज प्रतिबंधाबाबत विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती



मंचर (समर्थ गांवकरी)

सेवा संकल्प अभियानांतर्गत शासकीय इंग्रजी माध्यम आश्रम शाळा, घोडेगाव (ता.आंबेगाव) येथे जागतिक रेबीज दिन उत्साहात आणि जनजागृतीपर वातावरणात साजरा करण्यात आला.यावेळी विद्यार्थ्यांना रेबीज आजाराची कारणे, प्रतिबंधात्मक उपाययोजना, प्राण्यांशी सुरक्षित वर्तन तसेच प्राण्याने चावा घेतल्यानंतर करावयाच्या तातडीच्या उपाययोजनांबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

कार्यक्रमास पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय विभागाचे सहाय्यक आयुक्त डॉ.पी.डी.साळवे, शाळेचे प्राचार्य गणेश गावडे, पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. स्नेहा डफळ, डॉ. रुपेश खामकर तसेच नोडल अधिकारी गजानन वनारसे उपस्थित होते.मान्यवरांनी विद्यार्थ्यांना रेबीज या गंभीर आजाराविषयी सोप्या व शास्त्रीय पद्धतीने माहिती दिली. प्राण्यांपासून सुरक्षित अंतर ठेवणे, कुत्रा किंवा अन्य प्राण्याने चावा घेतल्यास जखम साबण व वाहत्या पाण्याने तात्काळ स्वच्छ धुणे आणि विलंब न करता वैद्यकीय सल्ला घेणे याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत विविध प्रश्न विचारले. प्रश्नोत्तरांच्या माध्यमातून त्यांच्या शंकांचे निरसन करण्यात आले.सूत्रसंचालन कीर्ती टोपे यांनी केले. उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये आरोग्य-जागरूकता, प्राणीप्रेम, जबाबदार वर्तन आणि सामाजिक आरोग्याबाबतची जाणीव निर्माण करण्यास मदत झाली.

## मन:शांती, पवित्र विचारांतच खरा 'स्वर्ग'

**ब्रह्माकुमारी साधना दीदी यांचे मार्गदर्शन; मनुष्य जीवन व आत्म्याच्या आध्यात्मिक प्रवासावर चिंतन**

पारनेर (समर्थ गांवकरी)

मनुष्याच्या विचारांमध्ये, कर्मांमध्ये आणि परस्परांच्या व्यवहारातच सुख-दुःखाची अनुभूती निर्माण होत असते. बाह्य संपत्तीपेक्षा मन:शांती, समाधान, पवित्र विचार आणि दैवी संस्कार हेच खऱ्या स्वर्गाचे स्वरूप आहे, असे प्रतिपादन प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय, पारनेर सेंटरच्या संचालिका ब्रह्माकुमारी साधना दीदी यांनी केले.अंगारकी संकष्टी चतुर्थीनिमित्त आयोजित सकाळच्या मुरली वाचन कार्यक्रमात त्या 'मनुष्याचे जीवन आणि आत्म्याचा आध्यात्मिक प्रवास' या विषयावर मार्गदर्शन करत होत्या.



वर्तमान काळाला महान कलियुग म्हणून संबोधले जात असून, मनुष्याच्या जीवनातील दैवी गुणांचा ऱ्हास आणि धर्म-कर्मातील अधोगती याबाबत आध्यात्मिक दृष्टिकोनातून विचार मांडताना त्यांनी भगवद्गीतेतील 'यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत' या वचनाचा संदर्भ दिला.

## मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याची मागणी

**काँग्रेसचे श्रीरामपूरच्या प्रांताधिकाऱ्यांना निवेदन; कारभाराच्या चौकशीचीही मागणी**

श्रीरामपूर (समर्थ गांवकरी)

मुख्य निवडणूक आयुक्त श्री. ज्ञानेश कुमार यांनी राजीनामा द्यावा, त्यांच्या कार्यकाळातील निर्णयांची सखोल चौकशी करण्यात यावी तसेच त्यांच्या विरोधात कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी अहिल्यानगर जिल्हा काँग्रेस कमिटी ग्रामीण उत्तरच्या वतीने करण्यात आली. याबाबत श्रीरामपूरच्या उपविभागीय अधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले.

निवेदनात काँग्रेसने निवडणूक आयोगाच्या कार्यपद्धतीवर गंभीर आक्षेप नोंदविले आहेत. इंडियन एक्स्प्रेसमधील वृत्ताचा दाखला देत, मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार आणि अन्य दोन निवडणूक आयुक्त यांच्यात अनेक निर्णयांबाबत मतभेद झाल्याचा दावा काँग्रेसने केला आहे. त्यांच्या मतांच्या विरोधात मुख्य निवडणूक आयुक्तांनी अनेकदा निर्णय घेतल्याचा आरोपही निवेदनातून करण्यात आला आहे.

मतदार याद्यांच्या विशेष पुनरावलोकनाच्या प्रक्रियेत पात्र मतदारांची नावे वगळली जात असल्याचा आरोप करत, पात्र मतदाराचे नाव मतदार यादीतून वगळणे हा लोकशाही प्रक्रियेवरील गंभीर आघात असल्याचे काँग्रेसने म्हटले आहे. मतदार याद्यांबाबत पारदर्शकता, निष्पक्षता आणि जबाबदारी निश्चित करण्याची मागणीही करण्यात आली.



विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी सातत्याने उपस्थित केलेल्या 'वोट चोरी'च्या मुद्द्याचाही निवेदनात उल्लेख करण्यात आला आहे. निवडणूक आयोगाच्या कारभाराबाबत निर्माण झालेल्या प्रश्नांची निष्पक्ष चौकशी करून वस्तुस्थिती जनतेसमोर आणावी, अशी मागणी काँग्रेसने केली.

# निघोजच्या रस्त्यांचा वनवास संपणार

पारनेर (समर्थ गांवकरी)

■ **आठ रस्त्यांसाठी १५ कोटींची मंजुरी**
■ **ग्रामस्थांकडून आ. दातेंचा शाल,श्रीफळ व रोपटे देऊन सत्कार..**
■ **निघोजच्या रस्ते विकासाला १५ कोटींचे बळ**
■ **आठ महत्त्वपूर्ण रस्त्यांना प्रशासकीय मंजुरी; ग्रामस्थांकडून आमदार दातेंचे आभार**

निघोजसह परिसरातील ग्रामीण दळणवळणाला आता मोठी चालना मिळणार असून, लेखाशीर्ष ३०५४ अंतर्गत गट-बमधून आठ महत्त्वपूर्ण रस्ता कामांसाठी तब्बल १५ कोटी रुपयांची प्रशासकीय मंजुरी मिळाली आहे. या मंजुरीमुळे निघोज परिसरातील विविध वाड्या-वस्त्यांना जोडणाऱ्या रस्त्यांचा प्रश्न मार्गी लागण्याची अपेक्षा आहे.

या पार्श्वभूमीवर निघोज ग्रामस्थांनी सोमवारी (दि. २८) पारनेर येथील आमदार काशिनाथ दाते यांच्या जनसंपर्क कार्यालयात भेट देत त्यांचा शाल, श्रीफळ व रोपटे देऊन सत्कार केला. रस्त्यांच्या मंजुरीबद्दल ग्रामस्थांनी समाधान व्यक्त करत आमदार दाते यांचे आभार मानले.

मंजूर करण्यात आलेल्या कामांमध्ये निघोज ते कोल्हे वस्ती रस्ता, वडनेर बु. मुक्ताबाई शिव ते वाकण मळा-सुकाळे वस्ती रस्ता, प्रजिमा-१९२ ते शिववाडी-मोरवाडी-लामखडे वस्ती रस्ता, कुरंद-भोसलेवाडी ते नरवडेवाडी रस्ता, वाजेवाडी बाबरमळा-बो-हाडे वस्ती कॅनॉल रस्ता, प्रजिमा-१९२ ते रसाळवाडी रस्ता, वडनेर बु. ते टेंभीमळा रस्ता तसेच वाजेवाडी ढोकमाळ ते कॅनॉल रस्ता यांचा समावेश आहे.

या रस्त्यांमुळे शेतकऱ्यांना शेतीमालाची वाहतूक, विद्यार्थ्यांना शाळा-महाविद्यालयात ये-जा तसेच नागरिकांना दैनंदिन दळणवळणासाठी सुविधा मिळण्यास मदत होणार आहे. त्यामुळे केवळ रस्ते बांधणीपुरता हा निधी मर्यादित न राहता परिसरातील ग्रामीण अर्थव्यवस्था आणि दळणवळणाच्या दृष्टीनेही त्याचे महत्त्व असल्याचे ग्रामस्थांनी सांगितले.

**'मंजूर निधीचा दर्जेदार वापर व्हावा'**

रस्त्यांच्या कामांना मोठ्या प्रमाणावर निधी मंजूर झाला असला तरी ही कामे गुणवत्तापूर्ण आणि वेळेत पूर्ण होणे तितकेच महत्त्वाचे असल्याचे वृक्षप्रेमी पोपट रसाळ यांनी सांगितले. निघोज गावच्या वार्ड क्रमांक दोनमधील आठ रस्त्यांना १५ कोटींची प्रशासकीय मंजुरी मिळणे ही विकासाच्या दृष्टीने महत्त्वाची बाब आहे. मंजूर कामे केवळ आजच्या गरजा भागविणारी न राहता पुढील पिढ्यांसाठी गुणवत्तेचा आदर्श ठरतील, यासाठी ग्रामस्थांनीही सजग राहावे, असे त्यांनी नमूद केले.



सुधामती कवाद यांनीही रस्त्यांच्या मंजुरीचे स्वागत करत ग्रामीण भागातील दळणवळणाच्या प्रश्नांना प्राधान्य मिळाल्याचे सांगितले. या रस्त्यांमुळे शेतकरी, विद्यार्थी आणि नागरिकांना सुविधा मिळणार असून मंजूर कामे वेळेत व गुणवत्तापूर्ण पूर्ण व्हावीत, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसच्या जिल्हा कार्याध्यक्ष सुधामतीताई कवाद, माजी सरपंच चंदूशेठ लामखडे, विठ्ठलराव कवाद, बाळासाहेब लामखडे, सोमनाथ वरखडे, रोहिदास लामखडे, रमेश वरखडे, वसंत ढवन, माजी उपसरपंच रामदास रसाळ, वृक्षप्रेमी पोपट रसाळ, निघोज सोसायटीचे व्हा. चेअरमन हिराभाऊ सोनवणे, ग्रामपंचायत सदस्य योगेश वाव्हळ, दत्तात्रय कुदळे, सुखदेव वाव्हळ, रंगनाथ रसाळ, योगेश साबळे, हरिभाऊ साबळे, खंडू भांबरे, भाऊ साळवे, भाऊ रसाळ, शहाजी लामखडे, दत्तात्रय रसाळ, संतोष शिंदे, शिवनेरी पाणी वापर संस्थेचे चेअरमन शिवाजीराव डेरे, माजी ढऊज बाबाजी लाळगे, माजी उपसरपंच भरत आप्पा रसाळ, ग्रामपंचायत सदस्या ज्योतीताई पांढरकर यांच्यासह निघोजचे ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## थोडक्यात पण महत्त्वाचे

### सोनकीच्या बहराने भंडारदरा झाले 'सोन्याचे'
**निसर्ग जपण्याचे पर्यावरण मित्र ओंकार अस्वले यांचे आवाहन**

भंडारदरा (समर्थ गांवकरी)



हिरवाईने नटलेल्या सह्याद्रीच्या कुशीत सध्या पिवळ्याधमक सोनकी, रानफुले आणि गवतफुलांचा बहर पाहायला मिळत आहे. घाटघर, रतनवाडी, भंडारदरा आणि कळसूबाई परिसरातील हा निसर्गाचा 'फुलोत्सव' पर्यटकांना आकर्षित करत असून, हा मनमोहक क्षण कॅमेऱ्यात टिपण्यासाठी पर्यटकांची गर्दी होत आहे. मात्र, फुलांचा हा बहर पाहायला मिळतोय, तो आपल्या निष्काळजीपणामुळे नष्ट होऊ नये, यासाठी पर्यावरण मित्र ओंकार अस्वले यांनी पर्यटकांना विशेष आवाहन केले आहे. फुलांना हात न लावता त्यांच्या सौंदर्याला मनापासून दाद द्या; कचरा न करता निसर्गाची स्वच्छता जपा. कारण निसर्ग हा फक्त पाहण्यासाठी नाही, तर पुढच्या पिढीसाठी जपण्यासाठी आहे, असा संदेश ओंकार अस्वले यांनी दिला.

### नानजीभाई ठक्कर यांच्या वाढदिवसानिमित्त
**जिल्हा परिषद प्राथमिक शाळा विठे येथील विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप!**



अकोले (समर्थ गांवकरी)

अकोले तालुक्यातील प्रवरा परिसरातील परिसरातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा विठे येथील विद्यार्थ्यांना शेठ नानजीभाई खेमजीभाई ठक्कर (ठाणावाला) यांच्या वाढदिवसानिमित्त शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस तथा दैनिक समर्थ गांवकरीचे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे यांच्या आयोजनातून हा उपक्रम राबविण्यात आला. यावेळी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष पदाधिकारी मुख्याध्यापक ढगे व शिक्षक आदी उपस्थित होते. विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य मिळाल्याने त्यांच्या चेहऱ्यावर आनंद दिसून आला.

### राष्ट्रीय ऑनलाइन विज्ञान प्रदर्शनात पांडुरंग गायकर यांना द्वितीय क्रमांक

ब्राम्हणवाडा(समर्थ गांवकरी)

खोडद (नारायणगाव) येथील जायंट मीटरवेव्ह रेडिओ टेलिस्कोप (GMRT) यांच्या वतीने दरवर्षी आयोजित करण्यात येणाऱ्या राष्ट्रीय ऑनलाइन विज्ञान प्रदर्शनात ब्राम्हणवाडा येथील रहिवासी व नूतन विद्या मंदिर शाळेचे शिक्षक पांडुरंग भाऊ गायकर यांनी उल्लेखनीय यश संपादन केले आहे. इयत्ता आठवी ते बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी त्यांनी सादर केलेल्या "Magic of Light' या विज्ञान प्रकल्पाला शिक्षक गटातून द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक मिळाले.




या राष्ट्रीय स्तरावरील विज्ञान प्रदर्शनात यावर्षी संपूर्ण भारतातून तसेच दुबई, अमेरिका आणि कतार यांसारख्या देशांतूनही विज्ञान प्रकल्प सादर करण्यात आले. ८६० विज्ञान प्रकल्पांनी या प्रदर्शनात सहभाग नोंदविला होता. अशा मोठ्या आणि विविधांगी सहभाग असलेल्या स्पर्धेत गायकर यांच्या प्रकल्पाने शिक्षक गटातून द्वितीय क्रमांक मिळविल्याने त्यांच्या कामगिरीचे विशेष महत्त्व अधोरेखित झाले आहे. "Magic of Light' या प्रकल्पातून प्रकाशाचे विविध गुणधर्म विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिकांच्या माध्यमातून समजावून सांगता येतात. प्रकाशाचे परावर्तन, अपवर्तन यांसह प्रकाशाशी संबंधित विविध वैज्ञानिक संकल्पना या प्रकल्पाच्या माध्यमातून स्पष्ट करण्यात आल्या आहेत. त्याचबरोबर मानवी डोळ्यांची रचना, दृष्टीदोष, दृष्टीदोषांची कारणे तसेच त्यावरील उपाययोजना यांचेही शैक्षणिक पद्धतीने स्पष्टीकरण करता येते.इयत्ता आठवी ते बारावीच्या विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तकातील प्रकाशाच्या संकल्पना केवळ सैद्धांतिक स्वरूपात न शिकवता त्या प्रयोग, निरीक्षण आणि प्रत्यक्ष अनुभवातून समजावून घेता याव्यात, या उद्देशाने हा प्रकल्प तयार करण्यात आला. त्यामुळे विज्ञान विषयातील अवघड संकल्पना विद्यार्थ्यांना सोप्या व रंजक पद्धतीने समजण्यास मदत होते. शिक्षक म्हणून अध्यापनाबरोबरच विज्ञान, प्रयोगशीलता, संशोधन आणि नवोपक्रमाच्या क्षेत्रात सातत्याने कार्य करण्याचा पांडुरंग गायकर यांचा प्रयत्न या यशातून अधोरेखित झाला आहे. विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन, जिज्ञासा आणि प्रयोगशील वृत्ती निर्माण करण्यासाठी शिक्षकांनी स्वतः नवोपक्रमशील राहणे आवश्यक असल्याचे त्यांच्या या उपक्रमातून दिसून येते. राष्ट्रीय ऑनलाइन विज्ञान प्रदर्शनात मिळविलेल्या या यशाबद्दल पांडुरंग भाऊ गायकर यांचे विविध क्षेत्रांतील मान्यवर, शिक्षणप्रेमी, सहकारी शिक्षक, विद्यार्थी, पालक आणि ग्रामस्थांनी अभिनंदन केले आहे. त्यांच्या या यशामुळे नूतन विद्या मंदिर शाळेच्या शैक्षणिक नावलौकिकात भर पडली असून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये विज्ञान व संशोधनाची गोडी निर्माण करण्यासाठी हा प्रकल्प प्रेरणादायी ठरला आहे.

# श्रीगोंदा तालुका पतसंस्थांची एकदिवसीय कार्यशाळा संपन्न

## महाराष्ट्राच्या सहकार चळवळीत नगर जिल्हा मार्गदर्शक ठरला आहे : वसंत लोढा




अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)

पतसंस्थांच्या समस्या सोडविण्यासाठी श्रीगोंद्याचे आमदार विक्रमसिंह पाचपुते यांनी ग्वाही दिली आहे. पारनेर,संगमनेर व श्रीगोंदा येथील पतसंस्था चळवळीला गालबोट लागतील अशा काही घटना घडल्या आहेत.

पतसंस्थांनी कामकाज करीत असताना सक्षमपणे व आदर्श पद्धतीने काम करावे, त्यासाठी संचालक मंडळ, अधिकारी व कर्मचारी यांचे प्रशिक्षण होणे आवश्यक आहे.सहकाराच्या कायद्यातील होणारे बदल व अत्याधुनिक पद्धती याविषयी मार्गदर्शन मिळणे आवश्यक आहे. या प्रशिक्षण कार्यक्रमाला जिल्ह्यातील सर्व तालुक्यांमधील पतसंस्थांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला आहे. नगर जिल्ह्याचे सुपुत्र काका कोयटे हे आंतरराष्ट्रीय पतसंस्था फेडरेशनचे खजिनदार आहेत, तसेच मल्टीस्टेट पतसंस्था फेडरेशनचे अध्यक्ष सुरेश वाबळे हे महाराष्ट्राचे नेतृत्व करीत आहेत.गेल्या अनेक वर्षांपासून महाराष्ट्राच्या सहकार चळवळीला नगर जिल्ह्याने मार्गदर्शन केले आहे.असे प्रतिपादन नाशिक विभागीय पतसंस्था फेडरेशनचे अध्यक्ष वसंत लोढा यांनी केले आहे.

श्रीगोंदा येथील ए-स्टार हॉटेल येथे नाशिक विभागातील नागरी ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थांचे फेडरेशन लि.अहिल्यानगर,महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशन व श्रीगोंदा तालुका पतसंस्था फेडरेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आणि जिल्हा उपनिबंधक,सहकारी संस्था (सर्व तालुके) अहिल्यानगर यांच्या सहकार्याने श्रीगोंदा तालुका पतसंस्थांसाठी एकदिवसीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती.या कार्यशाळेचे उद्घाटन सेवानिवृत्त जिल्हा उपनिबंधक डॉ.सोपान शिंदे यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आले.

यावेळी प्रमुख उपस्थिती म्हणून महाराष्ट्र राज्य पतसंस्था फेडरेशनचे कार्यकारी अध्यक्ष काका कोयटे,श्रीगोंदा येथील सहाय्यक निबंधक किरण आव्हाड,नाशिक विभागीय फेडरेशनचे अध्यक्ष वसंत लोढा,सेवानिवृत्त सहनिबंधक तानाजी कवडे,सायबर तज्ज्ञ अथर्व भांबुरकर,श्रीगोंदा तालुका पतसंस्था फेडरेशनचे उपाध्यक्ष सुरेश भंडारी, संचालक एकनाथ आळेकर, दत्तात्रय गावडे, सुनील दरेकर, काकासाहेब रोडे,अनिल लबडे,आकाश निंभोरे,भदारे गुरुजी,देवयानी शिंदे, विभागीय फेडरेशनचे व्यवस्थापक महेश जाधव, मराठा पतसंस्थेचे व्हाईस चेअरमन उदय अनभुले आदी उपस्थित होते.

काका कोयटे म्हणाले, पतसंस्थांचे संचालक मंडळ, अधिकारी व कर्मचारी यांचे प्रशिक्षण ही काळाची गरज आहे. प्रत्येक तालुक्यात एक-दोघांनी केलेल्या चुकीमुळे पतसंस्था चळवळ अडचणीत आली आहे. श्रीगोंदा तालुक्यातील सहकार अडचणीत आलेला आहे. सिस्पे कंपनीसारख्या खाजगी कंपन्यांवर विश्वास ठेवल्याने अनेक ठेवीदारांचे नुकसान झाले आहे.तसेच ज्या पतसंस्था चांगल्या पद्धतीने काम करीत आहेत,त्यांचे मार्केटिंग करणे गरजेचे आहे. पतसंस्थांनी व्यवसाय वृद्धीसाठी सोनेतारण कर्ज सुविधा मोठ्या प्रमाणात सुरू कराव्यात,कारण सोनेतारण कर्ज हे अधिक सुरक्षित असते,श्रीगोंदा तालुक्यातील पतसंस्थांना बळ देण्यासाठी महाराष्ट्र राज्य पतसंस्था फेडरेशन संपूर्ण सहकार्य करणार आहे. श्रीगोंदा तालुक्यातील पतसंस्थांना पुनर्वैभव प्राप्त करून देण्यासाठी सर्व पतसंस्थांनी एकत्र येण्याची गरज आहे.

जिल्हा बँकेच्या निवडणुकीत बिगरशेती पतसंस्था चळवळीतील कार्यकर्ताला संधी मिळावी.

या प्रशिक्षण प्रसंगी नागरी,ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था आर्थिक मापदंड व सुधारित गुणपत्रिका या विषयावर सेवानिवृत्त सहनिबंधक तानाजी कवडे यांनी मार्गदर्शन केले.तर नागरी,ग्रामीण सहकारी पतसंस्थांसाठी एनपीए तरतुदी,एनपीए मॅनेजमेंट व संचालक मंडळाचे अधिकार व कर्तव्य या विषयावर सेवानिवृत्त जिल्हा उपनिबंधक डॉ.सोपान शिंदे यांनी मार्गदर्शन केले. सायबर सुरक्षा,जोखीम व्यवस्थापन व उपाययोजना या विषयी कायदेतज्ज्ञ अथर्व भांबुरकर यांनी सविस्तर मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन काकासाहेब रोडे यांनी केले तर आभार महेश जाधव यांनी मानले.

## मराठी शाळेतील मुलांना तात्काळ सेवा सुविधा दया : ग्राहक पंचायत

अकोले (समर्थ गांवकरी)



अकोले आदिवासी तालुक्यातील मराठी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा बऱ्याच गावातील मोडकळीस आलेल्या वर्ग खोल्या दुरुस्ती करून व नविन वर्ग इमारत खोल्या, पिण्याचे पाणी, विज, स्वच्छता गृह इत्यादी सुविधा विद्यार्थ्यांना तात्काळ मिळण्याबाबतचे निवेदन पंचायत समिती अकोले गटशिक्षण अधिकारी दिपक धुमाळ यांना दिल्याची माहिती ग्राहक पंचायत महाराष्ट्र जिल्हा उपाध्यक्ष मच्छिंद्र मंडलिक, माधवराव तिटमे, सचिव राम रुद्रे यांनी दिली.

निवेदनात पुढे म्हटले आहे की अकोले हा आती दुर्गम आदिवासी तालुका असून पावसाळ्यात बऱ्याच ठिकाणी शाळेतील इमारतीच्या छताची गळती, काही ठिकाणी विद्यार्थी आहे पण शिक्षक कमी, अशा ठिकाणी तात्काळ शिक्षक देण्याची मागणी करण्यात आली. पिण्याचे पाणी, विज, स्वच्छतागृह मुलामुलींसाठी स्वतंत्र तसेच सोलर लाईट, सीसीटीव्ही कॅमेरे, वाचनालय, क्रीडांगण व साहित्य,संरक्षण भिंत इत्यादी पायाभुत सुविधांचा प्रश्न मोठ्या प्रमाणात जानवत आहे. काही ठिकाणी शासनाच्या इमारती ऐवजी इतर खाजगी इमारतींमध्ये व उघड्यावर भरत असलेले शाळेचे वर्ग, बऱ्याच मुला मुलींना पाठ्य पुस्तके अद्यापही उपलब्ध झाली नाहीत. त्यामुळे शिक्षण घेताना गरीब, सर्व सामान्य वंचित अपंग मुला मुलींची गैरसोय निराशाचे वातावरण निर्माण झाले असून त्यामुळे विद्यार्थी संख्याही तालुक्यामधील सर्व शाळेमध्ये कमी होत चालली आहे.

## रिपब्लिकन पक्षाचा येत्या दि.३ ऑक्टोबर रोजी ६९ वा वर्धापन दिन सोहळ्यास मोठ्या संख्येने उपस्थित रहा : सिद्धार्थ कासारे

मुंबई (समर्थ गांवकरी)



महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या संकल्पनेतील रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाची स्थापना दिनांक ३ ऑक्टोबर १९५७ रोजी नागपूर येथे झाली होती. यंदा रिपब्लिकन पक्षाचा ६९ वा वर्धापन दिन सोहळा येत्या ३ ऑक्टोबर रोजी केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांच्या नेतृत्वात नवी मुंबई येथील विष्णुदास भावे सभागृह येथे आयोजित करण्यात आलेला आहे.या सोहळ्यास मुंबईतील आंबेडकरी जनतेने रिपब्लिकन कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन रिपब्लिकन पक्षाचे मुंबई प्रदेश अध्यक्ष सिद्धार्थ कासारे यांनी आज मुंबई मराठी पत्रकार संघात आयोजित पत्रकार परिषदेत केले.

रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना रामदास आठवले यांच्या नेतृत्वात दरवर्षी दिनांक ३ ऑक्टोबर ला रिपब्लिकन पक्षाचा वर्धापन दिन सोहळा उत्साहात साजरा केला जातो.

## 'प्रारंभ-२०२६'मधून एम.बी.ए. विद्यार्थ्यांना उद्योग, नेतृत्व व व्यवस्थापनाची नवी दिशा

**अमृतवाहिनी अभियांत्रिकी महाविद्यालयात प्रथम वर्षाच्या १२० विद्यार्थ्यांसाठी विविध उपक्रमांचे आयोजन**

संगमनेर (समर्थ गांवकरी)

अमृतवाहिनी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (स्वायत्त) येथील एम.बी.ए. विभागातर्फे प्रथम वर्षाच्या १२० विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आलेला 'प्रारंभ-२०२६' हा स्वागत व मार्गदर्शन उपक्रम विविध शैक्षणिक, औद्योगिक, उद्योजकीय आणि व्यक्तिमत्त्व विकासाच्या उपक्रमांनी उत्साहात संपन्न झाला. १० ते १९ सप्टेंबरदरम्यान झालेल्या या उपक्रमातून विद्यार्थ्यांना एम.बी.ए. शिक्षणासोबत उद्योगविश्व, नेतृत्व, उद्योजकता, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि व्यवस्थापन कौशल्यांची प्रत्यक्ष ओळख करून देण्यात आली.



'एम.बी.ए. केवळ पदवी नव्हे, तर उज्ज्वल भविष्यासाठीची सक्षम वाटचाल' ही संकल्पना केंद्रस्थानी ठेवून 'प्रारंभ-२०२६'चे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या स्वागतप्रसंगी प्राचार्य डॉ. बाविस्कर यांनी, प्रारंभ-२०२६ हा केवळ एम.बी.ए. प्रवासाचा प्रारंभ नसून ज्ञान, कौशल्य, नेतृत्वगुण आणि व्यक्तिमत्त्व विकासाची नवी सुरुवात आहे. बदलत्या जगातील संधी ओळखा, सतत शिकत राहा आणि आत्मविश्वासाने पुढे चला, असे आवाहन केले. विभागप्रमुख डॉ. वृषाली साबळे यांनी कार्यक्रमाची संकल्पना व रूपरेषा स्पष्ट केली.

कार्यक्रमाच्या प्रारंभी विद्यार्थ्यांसाठी परिचय सत्र, संवादात्मक उपक्रम आणि व्यक्तिमत्त्व विकासाच्या विविध गतिविधी घेण्यात आल्या. कौशल्य विकास मार्गदर्शिका कोमल बंडगर यांनी 'एम.बी.ए. ते कॉर्पोरेट विश्वापर्यंतची वाटचाल' या विषयावर मार्गदर्शन करताना संवादकौशल्य, व्यावसायिक दृष्टिकोन आणि वर्गातील ज्ञानाचे कॉर्पोरेट कौशल्यांमध्ये रूपांतर याबाबत मार्गदर्शन केले.

मानसशास्त्र प्रशिक्षक विलास दिघे यांनी 'आत्मविकासाची कला' या विषयावर विद्यार्थ्यांशी संवाद साधला. आत्मविश्वास, सकारात्मक विचारसरणी, व्यक्तिमत्त्व विकास आणि ध्येयपूर्ती यावर आधारित हे सत्र विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरले.

## संस्कारक्षम पिढी वाचनाने घडू शकेल : शाहीर तुळशीराम जाधव

**जि.प लहित खुर्द शाळेस दिली दहा हजार रुपयांची शंभर पुस्तके**

अकोले (समर्थ गांवकरी)



> लहित खुर्द चे सरपंच अनिता गोडसे, उपसरपंच राहुल गोडसे,माजी उपसरपंच किशोर गोडसे,शिवराज्य प्रतिष्ठान, साई पालखी दिंडी सोहळा आदी वाचनप्रेमी ग्रामस्थ व संस्थांनी एका वर्षात पंचवीस हजार रुपयांची पुस्तके शालेय ग्रंथालयास भेट दिली असून वाचन समृध्दी चळवळ अधिक सक्षम होत आहे.
>
> -डॉ.संतोष दिवे
> प्रकल्प प्रमुख कुसुमाग्रज वाचन अभियान.

वाचन हा एक संस्कार आहे यातून मूल्ये रुजवता येतात.व्यक्तिमत्व विकासाला चालना मिळते असे प्रतिपादन सेवानिवृत्त प्राध्यापक शाहीर तुळशीराम जाधव यांनी केले. अकोले तालुक्यातील लहित खुर्द येथे झालेल्या ग्रंथदान समारंभात ते बोलत होते. व्यासपीठावर सामाजिक कार्यकर्ते डॉ. किशोर गोडसे, डॉ.सुभाष गोडसे, शाळा व्यवस्थापनचे वैभव गोडसे,सुहास गोडसे,भारत गोडसे,उपसरपंच राहुल गोडसे मुख्याध्यापक विठ्ठल सावळे आदी मान्यवर उपस्थित होते.

अहिल्यानगर जिल्ह्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या संकल्पनेतून आणि जिल्हा शिक्षणाधिकारी भास्कर पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असलेला कुसुमाग्रज वाचन अभियान अंतर्गत शाळेत वाचन समृध्दी कार्यक्रम सुरू आहे.सह्याद्री महाविद्यालयातील सेवानिवृत्त प्राध्यापक शाहीर तुळशीराम जाधव यांनी शालेय ग्रंथालयास दहा हजार रुपयांची शंभर पुस्तके या वेळी भेट दिली. यावेळी माजी उपसरपंच किशोर गोडसे यांनी वाचनाचे महत्व सांगून ही चळवळ अधिक समृद्ध करण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करण्याची गरज आहे असे सांगितले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना शाळेतील. विविध उपक्रमांची माहिती. पदवीधर शिक्षक डॉ.संतोष दिवे यांनी दिली.सूत्रसंचालन संदीप गोडसे यांनी तर आभार संदीप बर्वे यांनी मानले.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी नलिनी साळवे,सुप्रिया गोडसे,सुनील गोडसे,अनिल गोडसे,राम गोडसे,माधव गोडसे,सुभाष गोडसे, समिन्द्र गोडसे,भानुदास गोडसे, मच्छिंद्र रंधे,आदी वाचनप्रेमी ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## नेवासा येथे २ ऑक्टोबरला ९ हजार ३३ दिव्यांच्या प्रकाशात ९० सेकंदांत होणार 'ज्ञानेश्वरी' पारायण सोहळा

नेवासा (समर्थ गांवकरी)

जगद्गुरू श्री ज्ञानेश्वर महाराजांच्या पावन पदस्पर्शाने पुनीत झालेल्या आणि जगाला 'ज्ञानेश्वरी' सारखा अलौकिक ग्रंथ लाभलेल्या श्री क्षेत्र नेवासा येथे येत्या २ ऑक्टोबर रोजी 'ज्ञानेश्वरी जयंती' उत्सव अत्यंत भक्तिमय आणि उत्साही वातावरणात साजरा करण्यात येणार आहे. या सोहळ्याचे मुख्य आकर्षण म्हणजे ९ हजार ३३ दिव्यांच्या या भव्य दीपोत्सवात अवघ्या ९० सेकंदांत संपूर्ण ज्ञानेश्वरी ग्रंथाचे पारायण पूर्ण करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

या अभूतपूर्व सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर संत ज्ञानेश्वर महाराज संस्थान नेवासा येथे नुकतीच एक महत्त्वपूर्ण नियोजन बैठक पार पडली असून सोहळ्याची जय्यत तयारी सुरू झाली आहे. संस्थानच्या नियोजन बैठकीस ह.भ.प. वैराग्यमूर्ती देविदासजी महाराज म्हस्के, संस्थानचे अध्यक्ष माजी आमदार पांडुरंग अभंग, ह.भ.प. रामेश्वर महाराज कंठाळे, ह.भ.प. गंगाधर महाराज गाडेकर यांच्यासह संस्थानचे सर्व विश्वस्त मंडळ, शिंगवे दत्ताचे येथील गुरुदत्त तरुण मंडळाचे पदाधिकारी आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सोहळा निर्विघ्न आणि शिस्तबद्ध रीतीने पार पाडण्यासाठी विविध समित्यांची स्थापना करून जबाबदाऱ्यांचे वाटप करण्यात आले आहे.या सोहळ्यासाठी महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांतून आणि गावोगावीतून पायी दिंड्यांसह हजारो भाविक नेवासा नगरीत दाखल होणार आहेत.

ज्ञानेश्वरी ग्रंथातील एकूण ९ हजार ३३ ओव्यांना अनुसरून ९३३ वाचक एकत्र बसून हे पारायण करणार आहेत.यामध्ये प्रत्येक भाविकाला १० ओव्या वाचनासाठी दिल्या जाणार असून, अवघ्या ९० सेकंदांमध्ये संपूर्ण ज्ञानेश्वरी पारायण पूर्ण होण्याचा हा अद्भुत सोहळा पार पडेल. तसेच, एका ओवीस एक याप्रमाणे तब्बल ९ हजार ३३ दीप प्रज्वलित करून भव्य दीपोत्सव साजरा केला जाणार आहे.

२ शुक्रवार, दिनांक ऑक्टोबर रोजी दुपारी ३ वाजता

मंदिरात भाविकांचे आगमन होईल. दुपारी ३ ते ४ या वेळेत ज्ञानेश्वरी वाचकांचे मनोगत पार पडल्यानंतर ४ ते ५:३० या वेळेत नेवासा शहरातून ज्ञानेश्वरी ग्रंथाची भव्य व नयनरम्य मिरवणूक काढण्यात येईल.त्यानंतर सायंकाळी ६ वाजता ९,०३३ दिव्यांच्या दिव्य प्रकाशात ९० सेकंदांचे ऐतिहासिक पारायण व दीपोत्सव संपन्न होईल.

सोहळ्यानंतर उपस्थित सर्व भाविकांसाठी प्रवरासंगम येथील दानशूर बेल्हेकर परिवार व त्यांच्या आप्तेष्टांच्या वतीने महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले असून, या संपूर्ण महाप्रसादाचे नियोजन व व्यवस्थापन श्री क्षेत्र शिंगवे दत्ताचे येथील गुरुदत्त तरुण मंडळ व ग्रामस्थ सांभाळणार आहेत. या सोहळ्यात सहभागी होणाऱ्या सर्व भाविकांनी येताना स्वतः सोबत 'ज्ञानेश्वरी ग्रंथ' आणि दीपोत्सवासाठी 'निरंजन' सोबत आणावे आणि या ऐतिहासिक सोहळ्याचा व महाप्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन श्री संत ज्ञानेश्वर महाराज संस्थानच्या वतीने करण्यात आले आहे.



हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर - ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर - ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे - ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : अ-१, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)/
कोकण विभागीय कार्यालयाचा पत्ता : शकुंतल बिल्डिंग, गाळा क्र. २, सेक्टर ५, कोपरखैरणे, नवी मुंबई ४००७०९

# महाराष्ट्रातील रबी हंगामासाठी केंद्राकडे विशेष उपाययोजनांची मागणी

**नवी दिल्ली (समर्थ गांवकरी)**

महाराष्ट्रातील विविध भागांत यंदा कमी व असमान पावसामुळे निर्माण झालेली परिस्थिती आणि आगामी रबी हंगामातील संभाव्य अडचणी लक्षात घेऊन राज्यासाठी विशेष उपाययोजना करण्याची मागणी कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी केंद्र सरकारकडे केली.

राष्ट्रीय कृषि संमेलन –रब्बी अभियान २०२६ च्या दुसऱ्या दिवशी केंद्रीय कृषी व शेतकरी कल्याण मंत्री शिवराजसिंह चौहान यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या परिषदेत त्यांनी महाराष्ट्राची भूमिका मांडली. या परिषदेला केंद्रीय कृषी व शेतकरी कल्याण राज्यमंत्री रामनाथ ठाकूर व भागीरथ चौधरी, केंद्रीय कृषी सचिव अतीश चंद्रा, भारतीय कृषी अनुसंधान परिषदेचे महासंचालक डॉ. एम. एल. जाट यांच्यासह विविध राज्यांचे कृषिमंत्री, वरिष्ठ अधिकारी, वैज्ञानिक आणि कृषी क्षेत्रातील संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

महाराष्ट्रातील शेतकरी कमी पावसाच्या परिस्थितीमुळे सध्या अडचणीत असून, त्यांच्या समस्या जाणून घेण्यासाठी केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान यांनी पाहणी दौरा करण्याचे ठरवले आहे. त्यांनी लवकरात लवकर हा पाहणी दौरा करावा, अशी विनंती कृषिमंत्री भरणे यांनी यावेळी केली. तसेच शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन परिस्थितीची प्रत्यक्ष पाहणी करून केंद्र शासनाने आवश्यक ती मदत करावी, अशी मागणीही त्यांनी केली आहे.

महाराष्ट्रातील विशेषतः पावसावर अवलंबून असलेल्या शेतकऱ्यांसमोर आगामी रबी हंगामात जमिनीतील ओलाव्याच्या कमतरतेचे आव्हान राहणार आहे. या पार्श्वभूमीवर उपलब्ध पाणी आणि जमिनीतील ओलावा यानुसार पिकांची निवड करून शेतकऱ्यांना वेळेवर मार्गदर्शन करणे आवश्यक असल्याचे श्री. भरणे यांनी यावेळी सांगितले.

राज्यातील परिस्थितीमुळे हरभरा, गहू, रबी ज्वारी, करडई तसेच विविध तेलबियांच्या उत्पादनावर परिणाम होण्याची शक्यता त्यांनी व्यक्त केली. हवामान बदल, पावसातील खंड, वाढते तापमान आणि अचानक उद्भवणाऱ्या नैसर्गिक आपत्तींचा कृषी उत्पादनावर थेट परिणाम होत असल्याने हवामान व उपलब्ध नैसर्गिक संसाधनांच्या आधारे कृषी नियोजन करण्याची गरज त्यांनी अधोरेखित केली.

यंदा पावसातील मोठ्या खंडामुळे काही पिके वरून हिरवी दिसत असली तरी त्यामध्ये अपेक्षित उत्पादन नसल्याचे निदर्शनास येत आहे. त्यामुळे यंदा पीक विमा योजनेत केवळ उपग्रह प्रतिमांच्या अहवालाच्या आधारे उत्पादनाचा अंदाज न घेता प्रत्यक्ष पीक परिस्थितीचा विचार करावा, अशी मागणी कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी केली.

**कृषी यांत्रिकीकरणासाठी ५०० कोटींचा अतिरिक्त निधी**

महाराष्ट्रातील कृषी क्षेत्राला चालना देण्यासाठी यांत्रिकीकरण योजनेअंतर्गत किमान ५०० कोटी रुपयांची अतिरिक्त तरतूद उपलब्ध करून देण्याची मागणी करण्यात आली. या निधीतून अधिकाधिक शेतकऱ्यांना बीबीएफ (इइऋ) यंत्रणा उपलब्ध करून देणे शक्य होईल, असे त्यांनी सांगितले.

**सूक्ष्म सिंचन योजनेसाठी ५०० कोटी रुपयांचा निधी**

तसेच सूक्ष्म सिंचन योजनेसाठी ५०० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्याची मागणीही करण्यात आली. राज्यातील पाण्याची उपलब्धता आणि सध्याची हवामान परिस्थिती लक्षात घेता सूक्ष्म सिंचनाचा विस्तार शेतकऱ्यांसाठी महत्त्वाचा ठरणार आहे.

**१० लाख रबी ज्वारी बीज मिनी किट्सची मागणी**

महाराष्ट्रातील पावसाअभावी निर्माण झालेली परिस्थिती लक्षात घेऊन आगामी रबी हंगामासाठी १० लाख रबी ज्वारी बीज मिनी किट्स मंजूर करण्याची मागणी कृषिमंत्री भरणे यांनी केली. यामुळे ज्वारीचे उत्पादन वाढविण्यासोबतच पशुधनासाठी चाऱ्याची उपलब्धता करण्यासही मदत होईल, असे त्यांनी स्पष्ट केले. शेती वाचेल तर शेतकरी वाचेल, शेतकरी समृद्ध होईल तर गाव समृद्ध होईल आणि गाव समृद्ध होईल तर देश समृद्ध होईलया शब्दांत महाराष्ट्राचे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी शेतकरी–केंद्रित आणि शाश्वत कृषी विकासाची भूमिका अधोरेखित केली.

**टीम ग्रीकल्चर च्या भावनेने काम करण्याचे केंद्रीय कृषिमंत्र्यांचे आवाहन**

या परिषदेला संबोधित करताना केंद्रीय कृषी व शेतकरी कल्याण मंत्री शिवराजसिंह चौहान यांनी देशाची अन्नसुरक्षा आणि शेतकऱ्यांचे हित लक्षात घेऊन केंद्र व राज्यांनी 'टीम ग्रीकल्चर'च्या भावनेने एकत्रितपणे काम करण्याचे आवाहन केले. शेतकरी आणि देशाच्या हिताला सर्वोच्च प्राधान्य देत केंद्र व राज्यांमध्ये अधिक प्रभावी समन्वय आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. केंद्र–राज्य सहकार्य अधिक मजबूत करण्यासाठी दर महिन्याला राज्यांसोबत नियमित आभासी आढावा बैठका घेण्यात येणार असल्याचे त्यांनी जाहीर केले. राज्यस्तरावर कृषिमंत्री, कृषी सचिव, कृषी विद्यापीठे, आयसीएआर संस्था, कृषी विज्ञान केंद्रे, आत्मा, एफपीओ, प्रगतिशील शेतकरी, प्रक्रिया उद्योग, निर्यातदार आणि केंद्र सरकारचे नोडल अधिकारी यांना सहभागी करून राज्य कृषी टीम तयार करण्यात येणार आहे. जिल्हास्तरावरही संबंधित विभाग, वैज्ञानिक, बँका आणि शेतकऱ्यांच्या सहभागातून मासिक बैठका घेण्यात येणार आहेत.खरीप व रबी हंगामाच्या पूर्वतयारीसाठी निश्चित वेळापत्रकानुसार जिल्हा व राज्यस्तरीय बैठका घेण्याचे निर्देशही त्यांनी दिले.

मृदा आरोग्य आणि पर्यावरण संरक्षणासाठी यंदा २२ ऑक्टोबर ते ३० नोव्हेंबर या कालावधीत देशभर 'खेत बचाओ अभियान' राबविण्याचे आवाहन श्री. चौहान यांनी केले. मृदा आरोग्य पत्रिकेच्या आधारे संतुलित खतांचा वापर, जमिनीची सुपीकता कायम राखणे आणि उपयुक्त कीटकांचे संरक्षण यावर अभियानात भर देण्यात येणार आहे.

- **यांत्रिकीकरण व सूक्ष्म सिंचनासाठी प्रत्येकी ५०० कोटींचा निधी; १० लाख रबी ज्वारी बीज मिनी किट्सची मागणी**
- **पीक विम्यात यंदा केवळ उपग्रह प्रतिमांवर आधारित उत्पादन अंदाज न घेण्याची कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांची मागणी**

आगामी रबी हंगामात जमिनीतील ओलावा आणि पाण्याची उपलब्धता लक्षात घेऊन पिकांची व सुधारित बियाण्यांची निवड करण्याचा सल्ला देण्याबरोबरच पिकांचे रोग व किडींपासून संरक्षण, पात्र शेतकऱ्यांना किसान क्रेडिट कार्डचा लाभ आणि पीक विमा योजनेतील पारदर्शक पीक कापणी प्रयोगांवरही त्यांनी भर दिला.

कीटकनाशकांविरोधात कठोर कारवाई करण्याच्या सूचना देतानाच नैसर्गिक शेती, एकात्मिक शेती प्रणाली आणि पीक विविधीकरणाला मिशन मोडवर प्रोत्साहन देण्याचे आवाहन त्यांनी केले.

शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादनाला योग्य व लाभदायी दर मिळावा यासाठी काढणीनंतरचे व्यवस्थापन, वैज्ञानिक साठवणूक आणि सक्षम बाजारव्यवस्था मजबूत करण्यावर केंद्र सरकारचा भर असल्याचे श्री. चौहान यांनी सांगितले. तूर, उडद आणि मसूर यांची किमान आधारभूत किमतीवर शंभर




टक्के शासकीय खरेदी आणि ४८ तासांत देयकाची व्यवस्था करण्याबाबत त्यांनी माहिती दिली.

आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील संधींचा लाभ घेत भारतीय कृषी उत्पादने, फळे, भाजीपाला आणि धान्याच्या निर्यातीला चालना देण्यावरही केंद्राचा भर असल्याचे त्यांनी नमूद केले.

दरम्यान, देशातील कृषी विकास दर २०१५ नंतर ३ टक्क्यांवरून ४.५ टक्क्यांपर्यंत वाढल्याचे आणि वार्षिक खाद्यान्न उत्पादनातील सरासरी वाढ ४० लाख टनांवरून ८४ लाख टनांपर्यंत पोहोचल्याचे केंद्रीय कृषिमंत्र्यांनी सांगितले. २०२३–२४ ते २०२५–२६ या कालावधीत रबी खाद्यान्न उत्पादनात २०५ लाख टनांची वाढ झाल्याचेही केंद्रीय कृषिमंत्री श्री श्री. चौहान यांनी नमूद केले.

# जिल्हा परिषद ठाणे व महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद अभियंता संघटना, शाखा ठाणे यांच्या संयुक्त विद्यमाने अभियंता दिन उत्साहात साजरा

**अभियंते हे जगाचे निर्माते; तांत्रिक ज्ञान व कल्पकतेच्या माध्यमातून समाजाच्या जीवनमानात सुधारणा घडवावी : मुख्य कार्यकारी अधिकारी रणजित यादव**

**ठाणे (समर्थ गांवकरी)**

जिल्हा परिषद, ठाणे आणि महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद अभियंता संघटना, शाखा ठाणे यांच्या संयुक्त विद्यमाने अभियंता दिनाचा कार्यक्रम दि. २८ सप्टेंबर, २०२६ रोजी समिती सभागृह, बी. जे. हायस्कूल, ठाणे येथे उत्साहात संपन्न झाला. कार्यक्रमात गुणवंत अभियंता यांचा पुरस्कार देऊन सत्कार करण्यात आला. तसेच पदोन्नती प्राप्त व सेवानिवृत्त अभियंतांना पुरस्कार देण्यात आला.

मुख्य कार्यकारी अधिकारी रणजित यादव यांनी अभियंत्यांना अभियंता दिनाच्या शुभेच्छा देताना सांगितले की, थश रीश ींहश ारङ्गशीी ेष ींहश ुेीश्रव. मणसाचे जीवनमान उंचावण्यासाठी अभियंते महत्त्वाची भूमिका बजावत असतात. समाजाच्या गरजा लक्षात घेऊन अभियंत्यांनी आपल्या कल्पकतेचा आणि तांत्रिक ज्ञानाचा वापर करून नवीन व दर्जेदार बांधकामे उभारण्यासाठी काम करावे, असे त्यांनी सांगितले.

जिल्हा परिषद प्रशासन आणि अभियंता संघटना यांनी एकत्रितपणे काम करून



विकासकामांना अधिक गती देण्याची गरज असल्याचेही त्यांनी नमूद केले.

जिल्हा परिषदेच्या अभियंत्यांना विविध प्रकारच्या कामांमध्ये सहभागी होण्याची संधी मिळत असून, निवडणुकीच्या कामकाजासह विविध प्रशासकीय जबाबदाऱ्या पार पाडताना तळागाळातील नागरिकांपर्यंत पोहोचून काम करण्याची संधी मिळते, असे त्यांनी सांगितले.

सेवानिवृत्त तसेच पदोन्नती झालेल्या अभियंत्यांच्या प्रदीर्घ अनुभवाचा उपयोग नवीन काम काजासाठी आणि मार्गदर्शनासाठी होऊ शकतो.

त्यांच्या अनुभवातून नवीन पिढीतील अभियंत्यांना निश्चितच फायदा होईल, असेही मुख्य कार्यकारी अधिकारी रणजित यादव यांनी नमूद केले.

अभियंत्यांच्या तांत्रिक कौशल्यवृद्धीसाठी आवश्यक प्रशिक्षण आयोजित करण्यासाठी प्रशासनाच्या वतीने प्रयत्न करण्यात येतील, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

अभियंत्यांनी तांत्रिक बदलांबाबत अद्ययावत राहावे – अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी अजिंक्य पवार

यावेळी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी अजिंक्य पवार यांनी अभियंत्यांना मार्गदर्शन केले.

ते म्हणाले की, अभियंता हा केवळ पदावरून नव्हे, तर आपल्या कृतीतून दिसून येतो. अभियंते हे निर्माते असून, त्यांच्या तांत्रिक ज्ञानाच्या माध्यमातून सक्षमपणे विविध कामे पूर्ण केली जातात.

# मोबाईल कमी वापरून पुस्तकाशी मैत्री करा

**संगमनेर (समर्थ गांवकरी)**

संगमनेर शहर व तालुका ही सांस्कृतिक व वैचारिक अशी समृद्ध भूमी आहे. नवी पिढी ही अधिक समृद्ध होणे गरजेचे आहे. मात्र सध्या मोबाईलच्या अतिवापराचे दुष्परिणाम जास्त असल्याने विद्यार्थ्यांऐवजी पालकांना संस्कार देण्याची गरज आहे. जीवनाचा पाया अधिक समृद्ध करण्यासाठी विद्यार्थ्यांनी मोबाईल कमी वापरून पुस्तकाशी मैत्री करावी असा सल्ला ज्येष्ठ साहित्यिक व वक्ते डॉ संजय कळमकर यांनी विद्यार्थ्यांना दिला आहे. तर १०१ वे साहित्य संमेलन संगमनेर मध्ये आयोजित करण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे सौ दुर्गाताई तांबे यांनी म्हटले आहे.

महाराष्ट्र साहित्य परिषद,व अखिल भारतीय मराठी बालकुमार साहित्य संस्था संगमनेर यांच्या संयुक्त विद्यमाने मातोश्री लॉन्स येथे बालकुमार साहित्य संमेलन मोठ्या उत्साहात संपन्न झाले. यावेळी संमेलन अध्यक्ष पदावरून ते बोलत होते. तर व्यासपीठावर स्वागत अध्यक्ष सौ दुर्गाताई तांबे, उद्घाटक ज्येष्ठ पत्रकार व साहित्यिक डॉ. स्वाती महाळंक, कार्यवाह प्रसाद मिरासदार, श्रीमती सुवर्णाताई मालपाणी, डॉ. नितीन संगमनेरकर ,प्रा. बाबा खरात, संगमनेर शाखेचे अध्यक्ष अनिल देशपांडे, अनिल सोमणी, अरविंद गाडेकर, दर्शन जोशी, ओंकारनाथ बिहानी,अरुण लेले , डॉ .विवेक वाकचौरे, प्रा शशांक गंधे,चारुदत्त काटकर, प्रा. प्रकाश पारखे,प्राचार्य एस एम खेमनर, उपप्राचार्य सुरेखा दिघे, यांच्यासह विविध पदाधिकारी उपस्थित होते.

दीप प्रज्वलन करून या बालकुमार साहित्य संमेलन व पुस्तक जत्रेचे उद्घाटन करण्यात आले.

यावेळी बोलताना संमेलनाअध्यक्ष डॉ संजय कळमकर म्हणाले की, संगमनेरला मोठी साहित्यिक परंपरा लाभली आहे. ६४ कला असून त्यापैकी कोणतीतरी एक कला आपल्याला अवगत असते ती ओळखून त्यामध्ये तुम्हाला करिअर करता येते. सध्या मोबाईलचा अतिवापर वाढला असून त्याचे दुष्परिणाम जाणू लागले

- **साहित्यामधून जीवनाला संस्कार व समृद्धता मिळते : डॉ संजय कळमकर**
- **१०१ वे साहित्य संमेलन संगमनेर मध्ये आयोजित करण्यासाठी प्रयत्न– सौ दुर्गाताई तांबे**
- **संगमनेर मध्ये बालकुमार साहित्य संमेलन मोठ्या उत्साहात**

आहेत म्हणून खरे तर पालकांसाठी संस्कार शिबिर घेणे गरजेचे आहे.

मोबाईल मुळे संवाद होत नाही, गोष्टी बंद झाल्या. अन्न, वस्त्र ,निवारा ऐवजी मोबाईल डाटा इंटरनेट या मूलभूत गरजा झाल्या आहेत. आनंदी राहण्यासाठी मोबाईल टाळून पुस्तकांशी मैत्री करा. मोबाईलमुळे आळशीपणा, स्थूलता वाढत असून डोळे खराब होतात. झोप अधुरी राहते. तर पुस्तकांमधून आनंद मिळतो.

जुन्या काळी खरा आनंद होता शिक्षकांना विद्यार्थ्यांना मारण्याची मुभा होती विद्यार्थी घडले जायचे आजी आजोबा गोष्टी सांगायचे त्यामधून संस्कार मिळायचे वडीलधाऱ्यांचा सन्मान केला जायचा आज मात्र टीव्ही आणि मोबाईलच्या जमान्यामध्ये कुटुंब व्यवस्था अडचणीत आली आहे. गरिबी होती म्हणून फाटके कपडे असायचे ते स्वच्छ धुऊन, शिवून घातले जायचे त्यामध्ये आनंद होता आता मात्र श्रीमंती आली आणि महागडे कपडे फाडले जातात ही कुठली फॅशन अशी खंत ही त्यांनी व्यक्त केली.

तर संमेलन स्वागत अध्यक्ष सौ दुर्गाताई तांबे म्हणाल्या की, पाच नद्यांचा संगम संगमनेरला झाला असून कभी अनंत फंदी यांच्यापासून विचारवंतांची आणि साहित्यिकांची मोठी परंपरा लाभली आहे. अनेक नामवंत साहित्यिक कवी लेखक आज संगमनेरचे नाव साहित्य विश्वातून महाराष्ट्रापुढे आणत आहे.

लोकनेते बाळासाहेब थोरात व माजी आमदार डॉ.




सुधीर तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली संगमनेर मध्ये सातत्याने विविध उपक्रमांचे आयोजन होत असते. २०१० मध्ये अखिल भारतीय साहित्य संमेलनामध्ये विजया वाढ व मंगेश पाडगावकर उपस्थित होते. साहित्यामधून संस्कार आणि संस्कृतीचे शिक्षण मिळते.

सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात यांनी अमृत मंथन व अमृत गाथा ही पुस्तके लिहिली त्याबद्दल तालुक्याचा व सहकाराचा इतिहास उभा राहतो. हे साहित्य संमेलन जिल्ह्यामध्ये संगमनेर मध्ये होत असल्याचा अभिमान असून यासाठी संगमनेर साहित्य परिषदेच्या अध्यक्ष अनिल देशपांडे व सर्व सदस्यांनी मोठे परिश्रम घेतले. शंभरावे साहित्य संमेलन पुण्यामध्ये होत असून १०१ वे.साहित्य संमेलन संगमनेर मध्ये घेण्यासाठी आपला प्रयत्न असल्याचा त्या म्हणाल्या.

तर डॉ स्वाती महाळंक म्हणाल्या की, शंभरावे साहित्य संमेलन हे पुण्यामध्ये होत आहे साहित्य संमेलनाची शंभरी होणे हे महाराष्ट्रासाठी अत्यंत आनंदी असून राज्यभरात ९९ नांदी साहित्य संमेलन घेतली जात आहे विद्यार्थ्यांनी स्वतःची एक गोष्ट लिहावी असे सांगताना वाचनाने व ऐकण्याने मन समृद्ध होते असे त्या म्हणाल्या. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक बालकुमार साहित्य शाखेचे संगमनेर अध्यक्ष अनिल देशपांडे यांनी केले .सूत्रसंचालन इयत्ता नववीची विद्यार्थिनी कुमारी संस्कृती नरवडे यांनी केले तर डॉ. विवेक वाकचौरे यांनी आभार मानले.

# दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना हेक्टरी रु ५० हजार तातडीची आर्थिक मदत द्या आणी रब्बीसाठी बियाणे व खते मोफत द्या

**(समर्थ गांवकरी)**

........, दि. २८ सप्टेंबर २०२६ : महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यांमध्ये यंदा पावसाचे अत्यल्प व असमान वितरण झाल्याने खरीप पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. मराठवाडा, पश्चिम विदर्भ, सोलापूर, अहिल्यानगर तसेच राज्यातील जवळपास सर्वच भागांमध्ये पावसाअभावी खरीप पिके हातची गेली आहेत. या पार्श्वभूमीवर भारतीय किसान संघ, अहिल्यानगर जिल्हा, महाराष्ट्र यांच्या वतीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना विविध मागण्यांचे निवेदन देण्यात आले.

खरीप हंगामासाठी जमीन मशागत, बियाणे, खते, औषधे, मजुरी, सिंचन, फवारणी, यंत्रसामग्री आदींवर शेतकऱ्यांनी केलेला संपूर्ण खर्च उत्पादन न मिळाल्यामुळे बुडाला आहे. त्यामुळे पुढील हंगामासाठी शेतकऱ्यांच्या हातात भांडवल शिल्लक राहिलेले नाही. केवळ नेहमीच्या निकषांनुसार मिळणारी नुकसानभरपाई शेतकऱ्यांना पुन्हा उभे करण्यासाठी पुरेशी ठरणार नाही, असे किसान संघाने निवेदनात म्हटले आहे.

**हेक्टरी ५० हजार रुपयांची तातडीची मदत**

खरीप हंगामातील बुडालेल्या भांडवलासाठी हेक्टरी ५० हजार रुपये तातडीची आर्थिक मदत देण्यात यावी, अशी प्रमुख मागणी करण्यात आली आहे. ही मदत पारंपरिक नुकसानभरपाईपुरती मर्यादित न ठेवता खरीप हंगामात शेतकऱ्यांनी केलेल्या प्रत्यक्ष उत्पादन खर्चाची भरपाई करण्याच्या उद्देशाने विशेष पॅकेज म्हणून थेट ऊइढ पद्धतीने शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करावी, अशी मागणी आहे.यामुळे शेतकऱ्यांना पुढील हंगाम सुरू करण्यासाठी किमान कामासाठीभांडवल उपलब्ध होईल, असे भारतीय किसान संघाने स्पष्ट केले आहे.

**रब्बी हंगामासाठी बियाणे, खते मोफत देण्याची मागणी**

खरीप हंगाम पूर्णपणे हातातून गेल्याने अनेक शेतकऱ्यांकडे रब्बीची पेरणी करण्यासाठी आर्थिक क्षमता राहिलेली नाही. त्यामुळे रब्बी हंगामासाठी बियाणे, रासायनिक खते, सूक्ष्म अन्नद्रव्ये व आवश्यक कृषी निविष्ठांचा मोफत पुरवठा करावा, अशी मागणी करण्यात आली आहे. रब्बीची पेरणी करण्याची वेळ निघून जाण्यापूर्वीच ही सामग्री शेतकऱ्यांच्या गावपातळीवर उपलब्ध करून द्यावी, असेही या निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

**पीक विमा व पंचनाम्याची प्रक्रिया तातडीने पूर्ण करण्याची मागणी**

पीक नुकसानीचे पंचनामे आवश्यक असल्यास प्रशासकीय प्रक्रियेमुळे शेतकऱ्यांना तातडीची मदत मिळण्यास विलंब होऊ नये, याची दक्षता घेण्याची मागणी किसान संघाने केली आहे. तसेच पीक विम्याची नुकसान भरपाई प्रक्रिया तातडीने पूर्ण करून शेतकऱ्यांना पिक विमा भरपाई मिळवून द्यावी, असे निवेदनात म्हटले आहे.

**कर्ज माफी निकषात न येणार्या कर्जवसुलीस स्थगिती आणि कर्जाचे पुनर्गठन**

खरीप उत्पादन पूर्णपणे हातातून गेल्याने शेतकऱ्यांची परतफेड करण्याची क्षमता मोठ्या प्रमाणात घटली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या कर्जमाफी निकषात न येणार्या कर्जाच्या वसुलीस स्थगिती, कर्जाचे पुनर्गठन आणि नवीन रब्बी पीक कर्ज उपलब्ध करून देण्याची मागणी करण्यात आली आहे. तसेच पीक कर्जावर यापुढे काही काळ व्याज आकारणीस स्थगिती देण्याची मागणी करण्यात आली आहे.

निवेदनात कर्जमाफी योजनेतील प्रोत्साहन अनुदानाची रक्कम नियमित थकित असलेल्या सर्व शेतकऱ्यांना ₹२ लाखांपर्यंत देण्याचे काम कासवगतीने सुरू असल्याबद्दल नाराजी व्यक्त करण्यात आली असून, ही प्रक्रिया गतिमान करण्याची मागणी करण्यात आली आहे.

**पाणी, चारा आणि रोजगारासाठीही उपाययोजना**

दुष्काळाची परिस्थिती आणखी गंभीर झाल्यास टप्प्याटप्प्याने उपाययोजना करण्याची मागणीही भारतीय किसान संघाने केली आहे. त्यामध्ये पिण्याचे पाणी, पशुधनासाठी चारा पाणी , बहुवार्षिक फळबागांच्या

**भारतीय किसान संघाचे, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना श्री दादासाहेब गिते निवासी उपजिल्हा अधिकारी अहिल्यानगर आणि अप्पर जिल्हा अधिकारी शिर्डी यांचे मार्फत निवेदन देण्यात आले.**

जतनासाठी धरण जलसाठ्यातील पाण्याची विशेष राखीव तरतूद, तसेच शेतीला प्रथम प्राधान्य देऊन त्यानंतर औद्योगिक व इतर क्षेत्रांना पाणी देण्याची मागणी करण्यात आली आहे.

याशिवाय पशुधन वाचवण्याची व शेती रोजगाराची हमी देण्याची तसेच नदी–नाले खोलीकरण आणि व्यापक जलसंधारणाची कामे हाती घेण्याची मागणी करण्यात आली आहे.

**'शेतकरी केवळ सहानुभूतीचा नव्हे, तर परिणामकारक मदतीचा हक्कदार'**

सणउत्सवाचे दिवस सुरू झाले असताना अनावृष्टीमुळे शेतकरी मात्र आर्थिकदृष्ट्या अडचणीत सापडला



आहे. उत्पादनासाठी केलेले भांडवल आणि शेतीश्रम नष्ट झाले असल्याने शेतकऱ्याला केवळ सहानुभूतीची नव्हे, तर तातडीच्या आणि परिणामकारक आर्थिक मदतीची गरज असल्याचे किसान संघाने म्हटले आहे.

राज्याचा अन्नसुरक्षेचा आधार असलेल्या शेतकऱ्याला या संकटातून बाहेर काढण्यासाठी महाराष्ट्र शासनाने विलंब न करता खरीप हंगामातील बुडालेल्या भांडवलासाठी विशेष आर्थिक मदत जाहीर करावी आणि रब्बी हंगामासाठी बियाणे व खते मोफत उपलब्ध करून द्यावीत, अशी मागणी भारतीय किसान संघाच्या वतीने करण्यात आली आहे.सदरील मोर्चात व निवेदन देताना श्री दिलीप अमृतराव गोंदकर अध्यक्ष भारतीय किसान संघ जिल्हा अहिल्यानगर, सौ सिंधू वाणी उपाध्यक्ष, निलेश राजाराम चिपाडे जिल्हामंत्री, अनिल मच्छिद्र मते जिल्हा सहमंत्री, उषा शिंदे, अँड अरुण गायखे, किरण काळे, गंगाधर चौधरी, अशोक कोते, शिवाजी कातोरे, दिलीप कुलकणी, संभाजी शिंदे, अ.नि. चौधरी, रामभाऊ मुजमुले आदी शेतकरी उपस्थित होते.